

# सावित्रीबाई फुले - समग्र वाङ्मय

संपादक : डॉ. मा. गो. माळी

महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि
संस्कृती मंडळ

# सावित्रीबाई फुले

## समग्र वाङ्मय

संपादक

**डॉ. मा. गो. माळी**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

वाय ६८४-१

पहिली आवृत्ती : ऑगस्ट, १९८८
द्वितीय आवृत्ती : मार्च, १९९८
तृतीय आवृत्ती : २००३
चतुर्थ आवृत्ती : ऑक्टोबर, २००६
पाचवी आवृत्ती : जुलै, २०११

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, १७२, ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर (पूर्व), मुंबई ४०० ०१४.

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय
व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क,
कोल्हापूर.

किंमत : रुपये १४६/-

## निवेदन

**सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय** या डॉ. मा. गो. माळी यांनी संपादित केलेल्या व मंडळाने १९८८ मध्ये प्रसिद्ध केलेल्या पहिल्या आवृत्तीला वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यानंतर मार्च १९९८ मध्ये या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध करण्यात आली व २००३ साली तिचे पुनर्मुद्रण करण्यात आले. आज त्यापैकी सर्वच प्रतींची विक्री झालेली असल्याने आता ही पाचवी आवृत्ती प्रसिद्ध करण्याचे मंडळाने ठरविले. महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या दांपत्यांचे महाराष्ट्रावर अनंत उपकार आहेत. एकोणिसाव्या शतकातल्या अशिक्षित, अज्ञानी, पीडित अशा महाराष्ट्रातील बहुजन समाजाला त्यांनी ज्ञानदीप दाखवून चिरंतन स्वरूपाचे मार्गदर्शन केले. आजचा ज्ञानवंत व सुशिक्षित महाराष्ट्र म्हणजे, सावित्रीबाई व जोतिबा यांच्या सेवेची फलश्रृती होय. या दांपत्यांचे वाङ्मय आजही प्रेरक वाटते.

याआधी प्रसिद्ध केलेल्या पाच आवृत्त्यांप्रमाणे या आवृत्तीचेही स्वागत महाराष्ट्रातील वाचक अगत्याने करतील असा मंडळाला विश्वास वाटतो.

**मधु मंगेश कर्णिक**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,

मुंबई,
दिनांक १४ जुलै, २०११.

वाय ६८४-२

## निवेदन

**ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले** यांच्या स्मृतीशताब्दी वर्षानिमित्त मंडळातर्फे डॉ. मा. गो. माळी संपादित "सावित्रीबाई फुले-समग्रवाङ्मय" हे पुस्तक पुनर्मुद्रित होत आहे याचा मंडळास आनंद होत आहे. हे पुस्तक प्रा. व . द. देसाई यांनी तपासून दिल्याबद्दल त्यांचे आभार तसेच श्री. हरि नरके, समन्वयक, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन यांनी या ग्रंथाच्या मुखपृष्ठासाठी महाराष्ट्र शासनाने अधिकृतपणे मान्यता दिलेले सावित्रीबाई फुले यांचे छायाचित्र उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचेही आभार. मंडळाचे सचिव, श्री. चंद्रकांत वडे तसेच या पुस्तकाचे मुद्रक, स्नेहेश प्रिंटर्स यांनी हे पुस्तक लवकर व उत्तम प्रकारे निघावे म्हणून बरेच परिश्रम घेतले आहेत. मंडळ त्यांचेही आभारी आहे.

**डॉ. मधुकर आष्टीकर**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,

मुंबई,
दिनांक २७ मार्च, ९८

# प्रस्तावना

माझे मित्र डॉ. मा. गो. माळी यांनी अत्यंत परिश्रमाने सावित्रीबाई फुले यांचे वाङ्मय शोधून काढले. तेच आज 'सावित्रीबाई फुले समग्रवाङ्मय' या नावाने प्रसिद्ध करण्याचा योग येत आंहे.

भूतकाळ हा पडक्या किल्ल्यासारखा असतो. त्यात केव्हा काय सापडेल हे सांगता येत नाही. विंचू, सर्प आणि गोमा या तर त्यात सापडतातच, पण शिवाजीसारख्या महापुरुषाला तोरण्यासारख्या एखाद्या किल्ल्यांची डागडुजी करताना मोहोरांचा खजिना पण सापडतो. डॉ. माळी यांना सावित्रीबाई फुले यांच्या साहित्याचा असाच एक खजिना सापडला आहे.

मोहोरा कोणत्याही राज्याच्या असल्या तरी सोने म्हणून त्यांचे मूल्य असतेच. ते खरे की खोटे म्हणून आपण विचारीत नाही. ते सर्वमान्य कसोटीवर पडताळून पाहता येते. विंचू, सर्प खरे की खोटे याबद्दलसुद्धा आपण शंका घेत नाही. पण शिवाजीमहाराज केव्हा जन्मले, त्यांच्या नावाने प्रसिद्ध असलेली तसबीर ही त्यांची की आणखी कोणाची, भवानी तलवार खरी की खोटी आणि ती कोठे आहे किंवा आहेच का, कालिदास एक की दोन, परंपरेप्रमाणे इसवी सन ७८ मध्ये सुरू झालेला शालिवाहन शक हा खरोखरच त्याच वेळी झाला की पुढे केव्हा तरी झाला, युधिष्ठिर शक खरोखरच युधिष्ठिराने सुरू केला काय, मक्केहून मदिनेला महंमद पैगंबराने केलेले प्रयाण हे खरोखरच प्रयाण होते की पलायन, ख्रिसमसमध्ये साजरी करण्यात येणारी ख्रिस्तजयंती ही ख्रिस्तीचीच की सेंट निकोलसची याबद्दल वाद घालता येतो. कालामध्ये जे जे घडते त्यासंबंधी संशय घेण्यास नेहमीच जागा असू शकते. कालातीत घटना नेहमीच अनिश्चितीने भरलेल्या असतात आणि म्हणूनच कालिक संशोधनात्मक महत्त्वही असते. सावित्रीबाई फुले यांच्या वाङ्मयाचा विचार करताना आपल्या मनात त्या वाङ्मयाचा केवळ वाङ्मयीन विचार नसतो, तर त्याचा ऐतिहासिक विचार पण असतो. ते वाङ्मय ज्या व्यक्तीचे विचार असावे अशी आपली अपेक्षा असते त्याच व्यक्तीचे ते असेल तर आपल्या संशोधनाचे

चीज झाले असे आपणासच वाटते. डॉ. माळी यांना असे समाधान निश्चितच मिळावे, पण कालिक घटनांच्या अनिश्चिततेमुळे त्याबद्दल नेहमीच संशय व्यक्त केला जाऊ शकतो. खरे म्हणजें अगदी आज हयात असलेल्या व्यक्तींची स्वाक्षरीसुद्धा खरोखर कोणाची याबद्दल आणखी पन्नास वर्षांनी वाद घालता येईल आणि संशयच प्रकट करावयाचा म्हटले तर स्वाक्षरीपासून हस्ताक्षरापर्यंत सगळेच काही तुमच्याच कोणाचेही असू शकते. कारण अगदी नजिकच्या भूतकाळातील सुद्धा कोणतीही गोष्ट प्रमाणाने सिद्ध करता येत नाही.

काही वर्षापूर्वी ''क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले'' हे सावित्रीबाई फुले यांचे चरित्र डॉ. माळी यांनी प्रसिद्ध केल्यानंतर असाच संशय पंडितानी व्यक्त केला. सावित्रीबाई फुले यांचे साहित्य त्यांचे नव्हेच अशी प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागली. खरे म्हणजे कोणत्याही महान लेखकाचे नसलेले साहित्य त्याच्याच नावावर खपविण्याची परंपरा फार प्राचीन आहे. कोणत्याही सांस्कृतिक इतिहासाचे अवलोकन केल्यास प्रत्येक ठिकाणी मूळ ग्रंथात आपलेच काहीतरी घुसडून देण्याची एक प्रथा निर्माण होत असते असे म्हणता यावे. महाभारत, रामायण, भगवद्‌गीता हे ग्रंथसुद्धा याला अपवाद नाहीत. पण असे का होते? मला वाटते याचे खरे कारण हे आहे की, व्यक्तीचा विचार हा जेव्हा व्यक्तीचा म्हणून राहात नाही, तिचे कर्तृत्व जेव्हा व्यक्त होते तेव्हा ही सामाजिक संपत्ती होते आणि त्या संपत्तीवर प्रत्येकजण आपला हक्क सांगू लागतो. मग प्रत्येकजण आपल्या सोईनुसार तिला वाकविण्याचा प्रयत्न करतो आणि आपल्या विचारात जन्मलेली गोष्ट एखाद्या महापुरुषाच्या नावावर खपविण्याचा प्रयत्न होतो. याला चित्रकारांतसुद्धा अपवाद नाही. प्रथितयश चित्रकारांच्या चित्राची नक्कलही याच कारणाकरिता होते. सावित्रीबाईंच्याच वाङ्‌मयाचा विचार करू गेल्यास सावित्रीबाईनीच हे वाङ्‌मय लिहिले आहे का? असा प्रश्न सहज विचारता येईल आणि त्याबद्दल निश्चित असा निर्णय कधीही देता येणार नाही. कारण सावित्रीबाईंबद्दलचा असा प्रश्न कोणत्याही लेखकाबद्दल विचारता यावा. अशा वेळी खरा प्रश्न फक्त एवढाच विचारता येतो की, सावित्रीबाईंचे म्हणून जे वाङ्‌मय किंवा जी ग्रंथरचना आपल्यापुढे आहे तशा प्रकारची ग्रंथरचना करणे सावित्रीबाईंना शक्य होते की ते त्यांच्या आवाक्याबाहेरचे होते? उदाहरणार्थ सावित्रीबाईंना जर लिहिता येत नसेल तर त्यांनी ग्रंथरचना केलेली नसणार. तसेच जर त्यांना अक्षरओळख नसेल तर त्यांच्या नावाने सांगितले जाणारे अक्षर किंवा सही ही त्यांची नसणार ही उघड आहे. पण सावित्रीबाईना लिहिता येत असेल तर त्यांना सहीसुद्धा करता येणार आणि जर त्यांना वाचता येत असेल आणि त्यांनी काही पुस्तके विकत घेतली असतील तर त्यावर त्यांची सहीही असू शकणार. त्यांच्या नावावर खपणारी सही ही जोपर्यंत त्यांची आणखी

दुसरी वेगळी सही उपलब्ध होत नाही तोपर्यंत त्यांची म्हणून समजायला काही हरकत असू नये. कारण स्त्रियांनी सही करणे ही विसाव्या शतकातील गोष्ट आहे असे समजावयाचे काही कारण दिसत नाही. एकोणिसाव्या शतकातील चार महत्त्वाच्या स्त्रियांपैकी पंडिता रमाबाई या सह्या करीत होत्या की नव्हत्या? डॉ. आनंदीबाई जोशी यांनी अमेरिकेतून पाठविलेली पत्रे ही सहीशिवायच होती काय? की त्यांच्या नावावर दुसऱ्याच कोणीतरी ती लिहिली? रमाबाई रानडे यांनी खरी सही केली की नाही? किंवा त्यांनी जे लिहिले ते त्यांचेच हस्ताक्षर होते काय? असाही प्रश्न सहज विचारता येईल आणि एकाच वर्तमानपत्राची दुसरी प्रत ज्याप्रमाणे त्या वर्तमानपत्रातील खऱ्याखोट्याचा पडताळा पाहण्याकरिता उपयोगात आणता येत नाही, त्याप्रमाणेच एकाच वळणाच्या अक्षरातील अनेक रचना या असाव्यात असेही निश्चितपणे सांगता येत नाही. फार तर त्या एकाच्याच एवढेच सांगता येईल. पण ज्या काळांत सावित्रीबाई झाल्या त्या काळातल्या कागद आणि शाई याबद्दल जर निश्चितपणे आपल्याला शास्त्रीय पद्धतीने ठरविता येत असेल तर सावित्रीबाईंच्या नावाने खपली जाणारी सही किंवा हस्ताक्षर हे सावित्रीबाईंचेच असे मानावयाला हरकत असू नये. अर्थात त्याही काळात सावित्रीबाईंची कोणी नक्कल केलीच नसेल असे छातीठोकपणे सांगता येणार नाही. पण तशी नक्कल करायचे कारण तरी काय? तर्कशास्त्रदृष्ट्या जरी आपणाला काही सिद्ध करता आले नाही तरी आपण असा पुरावा दुर्लक्षित करीत नाही हेही लक्षात ठेवले पाहिजे. सावित्रीबाईंनी लिहिलेले पुस्तक, शिळाप्रेसवर छापलेले म्हणून दुसऱ्याचे असे समजा म्हटले तर जोतीबा फुले यांची ग्रंथरचना त्यांचीच का असा प्रश्न विचारता येईल आणि प्रतिपच्चंद्रलेखेव इत्यादी अक्षरे असेलली मुद्रा शिवाजीचीच का असावी असा प्रश्न विचारता येईल. शिवाजीमहाराजांची आणखीही एक वेगळी मुद्रा हल्ली काही संशोधकांना सापडली आहे हे पण येथे लक्षात ठेवले पाहिजे.

सावित्रीबाई फुले यांनी दलितांच्याकरिता आणि स्त्रियांच्याकरिता शाळा चालविल्या होत्या ही गोष्ट खरी की खोटी? जर ती खरी असेल तर त्यांनी ''सावित्री जोतीबा''अशी सही करावयाला काय हरकत आहे? त्यांनी ''सावित्री नवजें जोतीबा'' किंवा ''सावित्री भ्रतार जोतीबा'' अशीच सही केली पाहिजे काय? न्यायमूर्ती महादेव० गोविंद रानडे यांच्या पत्नी ''रमाबाई भ्रतार महादेव'' अशी सही करीत असत का? आणि डॉ. आनंदीबाई जोशी ''आनंदीबाई नवजे गोपाळ'' अशा प्रकारची स्वाक्षरी करीत होत्या का? जर करीत नसतील तर सावित्रीबाईनी ''सावित्री जोतीबा'' अशी सही करायला काय हरकत आहे? ब्राह्मण बाईला जे करता येते ते माळी बाईला करता येऊ नये असा काही विधिलिखित नियम दिसत नाही. किंबहुना अव्वल इंग्रजीत इंग्रजी शिक्षण किंवा

इतर शिक्षण घेणाऱ्या बायांना पुरुषांप्रमाणेच आपल्यापेक्षा अधिक ''सुसंस्कृत'' लोकांचे अनुकरण करण्याची सवय असते आणि त्या प्रसिद्ध समाज शास्त्रात श्रीनिवास संस्कृतायझेशनचा नियम म्हणून संबोधतात. या नियमास अनुसरून शिकल्या सवरलेल्या सावित्रीबाईंना ''सावित्रीबाई नवजे जोतीबा'' किंवा सावित्रीबाई भ्रतार जोतीबा'' अशी स्वाक्षरी करण्यात कसेकसेच वाटावे हे साहजिक नाही काय? सावित्रीबाईंच्या नावाने खपणारे लिखाण याबद्दल आणखीही एक आक्षेप उत्पन्न केला जाऊ शकतो. १९ व्या शतकातील भाषा ही २० व्या शतकातील भाषा नव्हे आणि म्हणून सावित्रीबाईंच्या नावाने खपविले जाणारे साहित्य हे सावित्रीबाईंचे नव्हतेच. ते दुसरेच कोणीतरी त्यांच्या नावावर आता लिहिले आहे असे सांगणे, पण हा शुद्ध पंडिती थाटात लिहू शकतात तर केवळ माळी कुळात जन्मल्यामुळेच सावित्रीबाईंना तसे लिहिता येऊ नये ही एक समजुतीला न पटणारी गोष्ट वाटते. ''अहा कैसा झाला अवचित विधि निष्ठुर असा प्रिया एकाएकी अमर सदना गेली सरसा'' ही भाषा १९ व्या शतकातील की२०व्या? पं. कृष्णशास्त्री चिपळूणकर ही ती लिहितात आणि त्याच्याही मागे जर थोडेसे डोकावून पाहिले तर १७ व्या शतकात झालेल्या पंडित जगन्नाथाची ही भाषा आहे. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी जगन्नाथाच्या कवितेचे केवळ भाषांतर केले आहे हे पण ध्यानात घ्यावे. संस्कृतायझेशनच्या नियमाप्रमाणेच माळ्याच्या कुळात जन्मलेल्या स्त्रीने शिक्षण घेतल्याबरोबर पड़िली गोष्ट जर कोणती करायला हवी असेल तर सुशिक्षित ब्राह्मणाचे किंवा सुशिक्षित स्त्रियांचे अनुकरण करणे किंवा त्यांच्या सारखेच वाक्प्रयोग करणे. सावित्रीबाई फुले यांची भाषा अर्थातच बहिणाबाई किंवा जनाबाईंच्या भाषेसारखी राहणार नाही, ती ब्राह्मणाऊ राहणार, कारण हा काळाचा आणि शिक्षणाचा महिमा आहे.

श्री. माळी यांच्या संशोधनात त्यांना सावित्रीबाईंनी रचलेला ''काव्यफुले'' नावाचा काव्यसंग्रह सापडला. त्या संग्रहाकडे विचाराच्या दृष्टीकोणातून पाहिले पाहिजे. काव्याच्या दृष्टीकोणातून नव्हे. रामदासांनी ज्याप्रमाणे ''गुणवंतां'' च्या ऐवजी ''गूणवंता'' असे लिहिले, ''रघुनायका'' ज्या ऐवजी ''रघूनायका'' लिहिले त्याचप्रमाणेच सावित्रीबाईंनीही आपल्या काव्यात अशा अनेक चुका केल्या आहेत. पण त्याकडे पद्यमय विचार म्हणून पाहावयाला पाहिजे. काव्य म्हणूनच नव्हे. आणि अशा रीतीने पाहिले तर या प्रकारची रचना सावित्रीबाईंनी करावयाला काय हरकत आहे, असाही विचार येथे करण्यासारखा आहे. कलेकरिता कला इत्यादी ज्या नवीन घोषणा आता आकारास येऊ लागल्या आहेत त्या सावित्रीबाईंच्या काळात नव्हत्या. कवितांचा त्यांनी माध्यम म्हणून उपयोग केला हे पण लक्षात घ्यावयाला पाहिजे. त्यात वृत्तभंग असतील पण कविता करणे हे सावित्रीबाईंचे ध्येय असावे असे दिसत नाही आणि सावित्रीबाईंचे जे शिक्षण झाले आणि त्यांचा जो

दृष्टीकोण होता त्याकडे पाहता पाहता सावित्रीबाईंनी जी रचना केली तशीच ती कर : योग्य दिसते आणि म्हणून ती सावित्रीबाईंनीच केली असे वाटावयाला लागते. उदाहरणार्थ खालील कविता पाहा. ती अनुष्टुभ छंदात आहे. पण त्यातील दुसऱ्या ओळीत केवळ सहाच अक्षरे आहेत. पण वृत्तबद्ध कविता करणे हे त्यांचे ध्येय नव्हते. तर शिक्षणाचे महत्त्व सांगणे, माणसाला माणूस म्हणून जगावयाला सांगणे हे त्यांचे ध्येय होते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. म्हणूनच ही कविता त्यांची असली पाहिजे असे वाटावयाला लागते. सावित्रीबाई म्हणतात:-

"शूद्रांना सांगण्याजोगा शिक्षणमार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हाटते पाहा"

यातील "शिक्षणमार्ग हा" हा मोठा वृत्तदोष आहे. पण त्यांना जो उपदेश करावयाचा आहे त्याकडे पाहता हा दोष ठरत नाही. अर्थात वर सांगितल्याप्रमाणे सावित्रीबाईंच्या लिखाणात मागून कोणीतरी मजकूर प्रक्षिप्तपणे घातलाच नसेल असे अर्थात म्हणता यावयाचे नाही. उदाहरणार्थ खालील कवितेत "लेखनिक" हा शब्द आहे. १९ व्या शतकात जो खरेच निर्माण झाला होता की नाही यांची शंका. पण तो निर्माण झालाच नसेल असेही म्हणता यावयाचे नाही.

उदाहरणार्थ या पंक्ती पाहा-

"आभार मानते साहाय्यकरी यांचे
मिशनरी छापाचे लेखनिक मदतीचे"

त्या काळची स्त्री "मानते" असे म्हणत नसेल, "मानत्ये" च्या ऐवजी "मानते" हे प्रक्षिप्त असू शकते. पण पुढे पन्नास वर्षांनी मानते हे रूप जर रूढ होते तर कोणीतरी त्याची सुरुवात करावी लागेलच ना. तसेच दुसऱ्या ओळीतील लेखनिक हा शब्दही प्रक्षिप्त असू शकतो. महात्मा फुले यांनी ईश्वराऐवजी निर्मिक हा नवीन शब्द तयार केला हेही येथे लक्षात ठेवले पाहिजे. लेखनिक या शब्दाचे कर्तृत्व सावित्रीबाईंकडे का असू नये? पण कदाचित काही शब्द कोणी घातले म्हणून सावित्रीबाईंनी काव्यरचना केलीच नाही असे कसे म्हणता येईल? सावित्रीबाईंनी आणखी एक शिवप्रार्थना म्हणून ओवीबद्ध कविता केली आहे त्याची पहिली ओवी अशी:

"सत्य सुंदर शिव थाट शिरी शोभे जटाजळपट
वाहती गंगाधारा उत्कट चतुर्दश विद्येच्या"

ही शिवाची प्रार्थना असल्यामुळे या ओवीत सत्य आणि सुंदर असाही प्रयोग केलेला आढळतो. "सत्यं शिवं सुंदरम्" हा आपला वाक्प्रयोग नसून Truth, Beauty and Goodness याचे ते भाषांतर आहे. १९ व्या शतकातील इंग्रजी शिकलेल्या माणसाने

Truth, Beauty and Goodness या शब्दांना संस्कृत किंवा मराठी वेष द्यावा हे स्वाभाविक दिसते. सावित्रीबाईही त्याला अपवाद दिसत नाही. ही आणखी एक कविता पाहा. ही बावन्नकशी सुबोधरत्नाकर यातील कविता होय.

जयाचेमुळे मी कविता रचीते
जयाचे कृपे ब्रह्मआनंद चित्ते

ही कविता मला पुन्हा एकदा रामदासांची आठवण आणून देते. या सर्व कवितेत रोखठोक व्यवहार दिसतो. रामदासांचा सावित्रीबाईंवर फार मोठा प्रभाव होता असे दिसते. तसेच त्यांनी रामदासांना उत्तरही देण्याचा प्रयत्न केला यात मला शंका दिसत नाही. वानगीदाखल खालील कविता पाहा-

जगी सर्व सूखी असा एक आहे
विचारी मना तूच शोधून पाहे
मना त्वाचि रे ज्ञान संचीत केले
तया सारखे भोगणे प्राप्त झाले

ही कविता रामदासांच्या मूळ कवितेत पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या ओळीत एक एक शब्द बदलवून केलेली आहे. रामदासांची कविता अशी

जगी सर्व सूखी असा कोण आहे.
विचारी मना तूच शोधून पाहे
मना त्वाचि रे ज्ञान पूर्व संचीत केले
तया सारखे भोगणे प्राप्त झाले

ही आणखी एक कविता पाहा

ज्ञान नाही विद्या नाही
ते घेण्याची गोडी नाही
बुद्धी असुनी चालत नाही
तयास मानव म्हणावे का?

या सर्व रचनेवरून रामदासांप्रमाणेच सावित्रीबाईंनासुद्धा आपल्या काव्यरचनेचा उपयोग लोकशिक्षणाकरिता करावयाचा होता हे दिसते. पण याचा अर्थ सावित्रीबाईंना काव्यदृष्टी नव्हती असा मात्र नाही. सावित्रीबाईंनी 'फुलपाखरू व फुलाची कळी'', ''गुलाबाचे फूल'', जाईचे फूल'', ''पिवळा चाफा'' अशासारख्या नितांत सुंदर कवितापण केल्या आहेत. या सर्व कविता सावित्रीबाईंच्या नाहीत असे समजावयाचे कारणच काय? पण समजा उद्या त्यातील काही कविता सावित्रीबाईंच्या नाहीत असे जरी सिद्ध झाले तरी त्यामुळे सावित्रीबाईंनी काव्यरचना किंवा ग्रंथरचना केलीच नाही

असे मात्र सिद्ध होऊ नये.

जसे काव्याबद्दल तसेच विचारसंपदेबद्दल पण म्हणता येईल. काव्यातून शिक्षण थोडे आडमार्गाने तरी मिळते. भाषण किंवा लेखनाचे तसे नसते. त्यांच्या भाषणाचे विषय आहेत 'उद्योग', 'विद्यादान', 'सदाचरण', 'व्यसने', 'कर्जे', अशा प्रकारचे. या भाषणांच्या विषयावरून त्यांच्या मनात कोणती मूलगामी आंदोलने होत होती हे स्पष्ट व्हावे. बुद्धिवाद व शास्त्रीय दृष्टिकोण हे जणू त्यांच्या जीविताचे सारच होते. त्यामुळेच ग्रहलाघवासारख्या विषयातही त्यांनी रस घेतला व चंद्रग्रहण अथवा सूर्यग्रहणाचे कोडे पण समजावून घेतले.

अशा या सावित्रीबाई फुले महात्मा जोतिबांच्या खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी. म. फुल्यांचा त्यांच्या हयातीत [illegible] झाला. मग सावित्रीबाईंची उपेक्षा झाली किंवा अजून होत असावी यात काय आश्चर्य? पण म्हातारीने कोंबडे झाकले तरी सूर्य उगवायचा थोडाच राहतो! माझे मित्र डॉ. माळी यांनी कोंबड्यावर झाकलेली टोपली उचलण्याचा प्रयत्न केला हा मात्र कौतुकाचा विषय. हे संशोधन निश्चितच लोकांना मान्य होईल, हळूहळू तरी मान्य होईल यात मला तरी शंका नाही. ज्यांनी महाराष्ट्राला क्रांतीकारी विचार दिला आणि भारतीय भगिनीला ज्ञानामृत पाजले त्या सावित्रीबाई फुल्यांना मी अभिवादन करतो आणि डॉ. माळी यांनी सावित्रीबाईंचे विचारधन सामान्य जनतेपर्यंत पोचण्याचा मार्ग मोकळा केला याबद्दल त्यांचे अभिनंदन करून हे चार शब्द पुरे करतो.

४२ यशोधन, मुंबई
१ मे १९८३, महाराष्ट्र दिन

सुरेंद्र बारलिंगे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

# संपादकाचे मनोगत

''क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले'' हा माझा चरित्रग्रंथ १९८० मध्ये प्रसिद्ध झाला आणि महाराष्ट्रातील वाचकवर्गाने माझ्या या छोट्याशा कृतीचे आवर्जून स्वागत केले. अवघ्या दोन वर्षांच्या आत या ग्रंथाच्या तीन आवृत्त्या निघाल्या. या ग्रंथाला जसा बुद्धिजीवी वाचकवर्ग मिळाला तसाच अल्पशिक्षित शेतकरी आणि मजूर असा श्रमजीवी वाचकवर्गही लाभला; याचा मला विशेष आनंद वाटतो. या ग्रंथाचे सारे श्रेय मी माझ्याकडे न घेता ते सावित्रीबाई फुले आणि त्यांचे एकोणिसाव्या शतकातील क्रांतीकार्य यालाच देतो. या ग्रंथासाठी केलेले संशोधन मी पुढेही चालू ठेवले आणि आता ''सावित्रीबाई फुले : समग्रवाङ्मय'' हा ग्रंथ मी प्रकाशित करीत आहे.

## सावित्रीबाई : व्यक्तित्व

भारतातील पहिल्या शिक्षिका-स्त्रीमुक्ती चळवळीच्या पहिल्या नेत्या, पददलितांच्या कैवारी आणि प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या म्हणून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्थान अढळ आहे. एका अशिक्षित स्त्रीने शिक्षण घेऊन शिक्षिका बनावे आणि वर्षानुवर्षे अज्ञानाच्या अंधकारात चाचपडणाऱ्या स्त्री-शुद्रांना ज्ञानाचा प्रकाश दाखवावा ही गोष्ट भारताच्या दोन हजार वर्षांच्या इतिहासात अपूर्व अशी आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रातून सामाजिक क्षेत्रात पदार्पण करावे, दुष्काळात अन्नान्न करून तडफडणाऱ्या हजारो जिवांच्या मुखांत घास भरवावा, शेतकरी-सामाजिक सुधारणांसाठी वाङ्मयाचे साधन हाती घेऊन कवयित्री आणि लेखिका बनावे, सर्व गाव, सर्व समाज सुशिक्षित, सुसंस्कृत करण्याचे, जनावरांप्रमाणे जिणे जगणाऱ्या स्त्री-शूद्रांना माणसात आणण्याचे वेड घ्यावे, पतीच्या निधनानंतरही शोक करीत न बसता सत्यशोधक समाजाच्या तत्त्वप्रसाराचे कार्य करण्याचे सतीचे वाण घेऊन अविश्रांत काम करावे, दीनदलितांसाठी, दीनदलितांच्या मुलांसाठी रोगांच्या साथीत दिवसा-रात्री घराबाहेर धावावे,. त्यांची सेवा करावी, प्लेगच्या साथीत त्यांना कडेवर घेऊन आपल्या दत्तक

मुलगा डॉ. यशवंतराव फुले यांच्या दवाखान्यात घेऊन जावे, तेथे प्लेगच्या रोगाला आपण बळी पडत असल्याची जाणीव होऊनही रुग्णांची सेवा करीत राहावी आणि ही सेवा करता करता अनंतात विलीन होऊन जावे. अशा या व्यक्तिमत्त्वास केवळ अलौकिक हे एकच विशेषण योजिता येईल.

सावित्रीबाईंच्या कार्यकर्तृत्वाच्या या पटावरून अशी सहज ओझरती नजर जरी टाकली तरी या स्त्रीचे व्यक्तित्व हे सामान्य नव्हते, हे सहज लक्षात येते. एका समाजसुधारकाची पत्नी म्हणून त्यांचे एक सवंग अस्तित्व होते, असे म्हणता येणार नाही. सावित्रीबाईंनी जोतीरावांना त्यांच्या इहलोकातील आयुष्याच्या अखेरच्या प्रवासापर्यंत साथ केली. परंतु ही साथ केवळ एका पतिपरायण स्त्रीची नव्हती, तर त्यांची प्रेरणा स्वतंत्र अशी होती.

सावित्रीबाईंचा जन्म एका गरीब शेतकरी कुटुंबात झालेला. शिरवळजवळच्या एका खेड्यात जेथे सबंध गावात शंभर-दीडशे उंबरा सापडणे कठीण! गावाला वर्षानुवर्षे दुष्काळाची परंपरा लाभलेली, शिक्षणाचे संस्कार नाहीत, अशी ही निरक्षर कुटुंबात जन्मलेली-वाढलेली स्त्री जोतीरावांच्या हाताखाली शिक्षणाचे धडे गिरविते, शिक्षक-प्रशिक्षण घेते, आणि ज्ञानदानाचे व्रत घेऊन ज्ञानयोगिनी बनते.

फुले दांपत्याने शाळा काढल्या. १८४८ ते १८५२ या चार वर्षांच्या कालावधीत पुणे आणि पुण्याच्या ग्रामीण परिसरात एकूण अठरा शाळा काढल्या आणि त्या यशस्वीपणे चालविल्या. या शाळा चालविण्यासाठी त्यांनी अविश्रान्त परिश्रम केले. त्यांनी दिवस पाहिला नाही की रात्र पाहिली नाही, तहानभूक विसरून या दांपत्याने ह्या परोपकारी कृत्याचा पिच्छा न सोडता[१] हा ज्ञानदानाचा यज्ञ अहोरात्र प्रज्वलित ठेवला. फुले दांपत्याचे हे कार्य म्हणजे या दांपत्याने घडवून आणलेला एक चमत्कार होता. कारण त्या काळात अशा शाळा चालविणे या अशक्य कोटीतील गोष्टी होत्या.

### मनुष्यत्वासाठी शिक्षण

फुले दांपत्याने शाळा काढल्या, परंतु शाळांची जाळी विणीत ते बसले नाहीत. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे. केवळ साक्षर करण्यासाठी त्यांना शिक्षण द्यावयाचे नव्हते, शिक्षणातून त्यांना समाजजागृती करावयाची होती. जुनाट रुढी-अंधश्रद्धा, जुन्या परंपरा, भोळ्या समजुती नाहीशा करावयाच्या होत्या. सामान्य लोक पशुतुल्य जीवन जगत होते, त्यांच्यात मनुष्यत्व कसे आणता येईल याचा सावित्रीबाईंनी विचार केला होता. आपल्या 'काव्यफुले' या काव्यसंग्रहात त्या म्हणतात-

''शुद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा।
शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हाटते पहा'' ॥

मनुष्यत्वासाठी शिक्षण हा मूलभूत विचार सव्वाशे वर्षांपूर्वी मांडणाऱ्या सावित्रीबाई फुले ह्या भारतातील थोर शिक्षणतज्ज्ञ होत. लोकांना माणूस बनविणे, ताठ मानेने उभे राहायला लोकांना शिकविणे, स्वत्व जपण्यास शिकविणे आणि त्याहीपलीकडे माणसांबद्दल प्रेम निर्माण करण्यास शिकविणे एवढा शिक्षणविषयक व्यापक दृष्टिकोण ह्या लोकोत्तर स्त्रीच्या ठिकाणी होता.

म. फुल्यांनी १८५५ साली 'तृतीय रत्न' नावाचे नाटक लिहिले होते. परंपरा आणि अंधश्रद्धा यांनी जखडलेल्या निरक्षर कुटुंबाची धर्माच्या नावाखाली लुबाडणूक आणि नागवणूक कशी होते याचे प्रत्ययकारी चित्र; यात जोतीरावांनी रेखाटले आहे. या नाटकात शेवटी सावित्रीबाईंनी प्रौढ स्त्रियांसाठी जी रात्रीची शाळा सुरू केली आहे; त्या शाळेत प्रौढ स्त्रियांनी जावे असा उपदेश केला आहे. रूढी, परंपरा आणि अज्ञान यांचे उच्चाटन करण्यासाठी या दांपत्याने आपले जीवनसर्वस्व ऐन तारुण्यात कसे समर्पित केले होते याची कल्पना यावरून येते.

सावित्रीबाईंनी शिक्षणाचे कार्य केले. त्यानंतर सामाजिक कार्यही केले. दुष्काळात फुले दांपत्याने अन्नछत्रे उघडली, आणि हजारो जीवांचे प्राण वाचविले.

## जिवंतपणी मरणाचे भोग

ज्याप्रमाणे मृत्युपंथाला लागलेल्या जिवांना त्यांनी जसे जीवदान दिले तसेच जिवंतपणी मरणाचे भोग भोगणाऱ्या जिवांनाही त्यांनी नवजीवन दिले. त्या काळी विधवा स्त्रियांची स्थिती अत्यंत अनुकंपनीय होती. अकाली वैधव्य आलेल्या तरुण विधवा स्त्रिया घराच्या सांदी-कोपऱ्यात फुटक्या कपाळाला दोष देत, उभे जळते आयुष्य अश्रू ढाळत. मनाची आणि शरीराची भडकलेली आग विझवू पाहात. त्या काळात विधवांची स्थिती भयानक होती, हे तत्कालीन आकडेवारीवरून लक्षात येईल. सन १८९१ च्या खानेसुमारीनुसार महाराष्ट्रात केवळ शून्य ते चार वर्षे वयाच्या विधवा झालेल्या, आईचे स्तनपानही न सुटलेल्या-शैशवावस्थेतील निरागस, कोमल बालिकांची संख्या १३,८७८ अशी होती. धर्माच्या नावाखाली रुढी-परंपरा यांनी स्त्रियांचे भावविश्वच उद्ध्वस्त करून टाकले होते. स्त्रीजीवनावर वर्षानुवर्षे मनूचा अंमल चालला होता. स्त्रिया; मग त्या उच्चकुलीन ब्राह्मण स्त्रिया असोत किंवा शूद्रातिशूद्र स्त्रिया असोत; या ठिकाणी मनूने उच्चनीच अशी विषमता निर्माण केली नव्हती! समाजात बालविवाह, जरठविवाह ह्या चाली सर्रास रुढ होत्या. हुंडा देऊ न शकणारा एखादा अगतिक बाप आपल्या सात-आठ वर्षांच्या कोवळ्या मुलीस साठ-सत्तर वर्षांच्या एखाद्या वृद्धाच्या गळ्यात बांधून मोकळा होई तेव्हा-

काहो अण्णा मी तुमची लाडकी ।
का करिता मला बोडकी ।।

असा पोटच्या मुलीने फोडलेला टाहो त्या जन्मदात्या पित्यास-ऐकू जात नसे.

''लेकीचा जन्म । जन्म घालून चुकला ।।
बैल घाण्याला जुंपला । जन्मवैरी ।।
लेकीचा जन्म । नको देऊ सख्याहरी ।।''

अशी स्त्रीजन्माची कर्मकहाणी होती.

### ब्राह्मण सुधारकांची अगतिकता

वास्तविक केशवपनासारख्या दुष्ट रुढी उच्चवर्णीय स्त्रियांमध्ये होत्या. ह्या रुढी नष्ट व्हाव्या अशी आच ब्राह्मण समाजाला असणे स्वाभाविक होते. यासाठी ब्राह्मण सुधारकांनी प्रयत्न केले नाहीत असे नाही. परंतु त्या सुधारकांना अंगभूत परंपरानिष्ठ मर्यादा पडल्या. रानड्यांनी पहिली पत्नी वारल्यानंतर विधवेशी विवाह केल्यास वडिलांना अपार दुःख होईल म्हणून अकरा वर्षे वयाच्या बालिकेशी लग्न केले. सासुरवाशीण मुलीला सासूचा जाच होईल म्हणून लोकहितवादीनी बिनबोभाट प्रायश्चित्त घेतले. भारतीय राजकारणात लोकमान्य टिळकांची प्रतिमा विलक्षण दीप्तीने झळकली. परंतु विचारात ठामपणा असणाऱ्या या नेत्याने चहा-ग्रामण्य प्रकरणात कच खाल्ली, पुनर्विवाहाबाबत रानड्यांनी दाखविलेली अगतिकता, शुद्धीकरणाच्या प्रश्नावरून लोकहितवादीनी सनातन्यांपुढे घातलेले लोटांगण, पहिली पत्नी जिवंत असता गोखल्यांनी केलेला दुसरा विवाह या पार्श्वभूमीवर जोतीरावांची आणि सावित्रीबाईंची तत्त्वनिष्ठा उजळून निघते, यात शंकाच नाही. जोतीराव आणि सावित्रीबाई या दांपत्याने आपला चूलबोळक्यांचा संसार न मांडता दीनदुबळ्यांचे संसार थाटण्यासाठी स्त्री-शूद्रांच्या सेवेच्या यज्ञकुंडात आपली आहुती दिली. हे दांपत्य काशीबाईसारख्या पतित विधवांसाठी अनाथाश्रम आणि बालहत्याप्रतिबंधक गृह स्थापन करून पतितोद्धार करीत होते, पतित स्त्रीच्या अनौरस अपत्यास आपले अपत्य मानून त्यास कायदेशीररीत्या दत्तक घेऊन त्याचे पालनपोषण करीत होते. त्याला वैद्यकीय शिक्षण देऊन स्वावलंबी करीत होते, आपल्या मालमिळकतीचा सर्व हिस्सा त्याला मिळावा म्हणून-

''आमचे उभयतांचे पश्चात् आमचा मुलगा यशवंत हा आमचे स्थावर व जंगम वगैरे हरप्रकारचे मालमिळकतीचा मालक असून, तो जाणता व सज्ञान झाल्यावर त्याजला केवळ तशी वहिवाट मात्र करून त्याने आपले वंशपरंपरेने सुखरुप उपभोग घेऊन मालकी करावी. आमचे मालमिळकतीवर आमचे भाऊबंद व पुतण्या गणपतराव राजाराम

फुले वगैरे हरकोणाची मालकी अथवा वारसा अथवा दावा नाही व माझे मिळकतीवर कोणतेही प्रकारचा बिलकूल कोणाचा हक्क नाही.''[२] असे मृत्युपत्र तयार करीत होते; त्याच काळात आणि त्याच पार्श्वभूमीवर उच्चवर्णीय सुधारक ''स्त्रियांनी जाकिटे घालावीत की न घालावीत'' असे सोज्ज्वळ लेख लिहिण्यात किंवा स्त्रियांना आपल्या शिक्षणसंस्थेत प्रवेश देताना स्वजातीची लक्ष्मणरेषा आखून घेण्यात धन्यता मानीत होते!

१८९० साली म. फुले यांचे निधन झाल्यानंतर सावित्रीबाईंनी त्यांच्या पश्चात सत्यशोधक समाजाची धुरा वाहिली. ही धुरा समर्थपणे वाहिली. चूल आणि मूल ही पारंपरिक विचारसरणी झटकून ही स्त्री सार्वजनिक कार्यासाठी बाहेर पडली. असे कार्य करणारी सावित्रीबाई फुले ही महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील पहिली स्त्री! त्या काळी उच्चवर्णीय सुशिक्षित स्त्रिया नव्हत्या असे नाही. परंतु त्यांच्या समाजजागृतीच्या कार्यालाही पारंपरिक मर्यादा होत्याच. हळदीकुंकवाचे सामुदायिक समारंभ साजरे करण्यापलीकडे त्यांच्या सुधारणा उंबरठा ओलांडून पुढे गेल्या नाहीत. माजघर आणि दिवाणखाना यातच त्या रेंगाळत राहिल्या.

सावित्रीबाईंनी पुणे आणि पुण्याच्या ग्रामीण परिसरात-सासवड, ओतूर, जुन्नर या ठिकाणी व्याख्याने दिली. सार्वजनिक सत्यधर्माचा प्रसार केला. सामाजिक सुधारणांचा हिरीरीने पुरस्कार करणारे आणि स्वत: ब्राह्मण असून ब्राह्मणांना शिव्या देऊन त्यांना आत्मपरीक्षण करावयास उद्युक्त करणारे लोकहितवादी, १८९२ साली निधन पावले. सासवड येथे सत्यशोधक समाजाच्या सभेत त्यांना श्रद्धांजली वाहिली गेली. या थोर समाजसुधारकाच्या कार्याचे मूल्यमापन करताना सावित्रीबाई या वेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात परखडपणे म्हणतात, ''आपल्या जातीचे दोष काढून टाकण्याचा त्यांनी (सरदार गोपाळराव हरी देशमुख) सदुपदेश केला. परंतु तत्कालीन ब्राह्मणांना जोतीबांची चळवळ समजून घेण्याची जशी पात्रता नव्हती, तशी देशमुखांचे बोलणे ऐकून घेण्याची अक्कल नव्हती.'' निर्भीडपणा, निर्भयता, अंगीकृत कार्यावरील अविचल निष्ठा आणि त्यासाठी समाजाकडून अपमान, छळ सोसण्याची जिद्द हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गुण असाधारण होते. त्यांचा आपल्या कार्यावरील आत्मविश्वास असामान्य होता. याबाबत त्या म. फुल्यांपेक्षा काकणभर सरसच होत्या. सावित्रीबाईंनी जोतीरावांपासून प्रेरणा घेतली हे खरेच. परंतु हे प्रेरणा घेण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी होते, हा त्यांचा विशेष. हे प्रेरणेचे शिवधनुष्य त्यांनी पेलले याला महत्त्व आहे. नायगावहून पुण्यास जोतीरावांना लिहिलेल्या दिनांक १०-१०-१८५६ च्या एका पत्रात त्या म्हणतात, ''पुण्यात आपल्या विषयी दुष्टाचा माजविणारे विदूषक पुष्कळ आहेत. तसेच येथेही (नायगाव) आहेत. त्यांना भिऊन आपण हाती घेतलेले कार्य का सोडून द्यावे? सदासर्वकाळ कामात गुंतावे.

भविष्यातले यश आपलेच आहे.'' सावित्रीबाईंचे हे विचार पाहता सावित्रीबाईंच्या प्रेरणेत कस कसा होता आणि त्यात केवढे सामर्थ्य होते याचा प्रत्यय येतो. म. फुल्यांनी समाजपरिवर्तनाचा प्रवाह उलट दिशेला फिरवून जी क्रांती केली त्याचे श्रेय या क्रांतिज्योतीला देणे कसे अटळ ठरते हे या उद्‌गारावरून लक्षात येते. जोतीबांना प्रेरणा, धैर्य आणि आशावाद देण्याचे सामर्थ्य या स्त्रीच्या ठिकाणी होते. याचे आश्चर्यकारक दर्शन घडते.

म. फुल्यांच्या कार्याबद्दल जसा त्यांचा सनातनी लोकांकडून छळ, अपमान होत होता, तसा त्यांना आपल्या आप्तांकडून खुद्द मेहुण्यांकडूनही होत होता. या संदर्भात सावित्रीबाई आपल्या भावाची निर्भर्त्सना करताना म्हणतात, ''तुला स्मरत असेल की, माझ्या नवऱ्याचा गुणग्राही इंग्रज सरकारने एक समारंभ घडवून त्यात त्यांच्या कार्याचा गौरव करून आदरसत्कार घडवून दुर्मती, दुर्जनास लाजविले. तुला मी खात्रीपूर्वक बोलते, माझा नवरा तुझ्यासारखा वारकऱ्याप्रमाणे नुसते हरिनाम घेत वाऱ्या करीत नसून प्रत्यक्ष हरीचे काम करीत आहे. त्याला मी मदत करते. हे काम इतके अल्हादकारक होते की, त्यायोगे मला परमानंद होतोच होतो.''

**काळापुढे धावणारी स्त्री**

जोतीरावांचे निधन १८९० साली झाले. निधनसमयी अंत्यायात्रेच्या वेळी जोतीरावांचे भाऊबंद समस्त फुले मंडळी आडवी आली. दत्तकपुत्र यशवंत हे कडू बेणे! त्याला प्रेतयात्रेपुढे टिटवे (मर्तिकाचे मडके) धरू देण्यास फुलेमंडळींनी एकजात विरोध केला. त्या प्रसंगी सावित्रीबाईच्या धैर्याचा कस लागला. उरावर धोंडा ठेवून बाईनी पुरुषाच्या हिमतीने प्रेतयात्रेपुढे हातात टिटवे धरले. बाईच्या एका बाजूस यशवंत, दुसऱ्या बाजूस गजानन (जोतीरावाचा आप्त) अशी अंत्ययात्रा स्मशानभूमीवर पोहोचली.[३]

विचाराने आणि आचाराने ही स्त्री काळाच्या किती अनेक दशके, शतके पुढे गेली होती आणि या क्रांतिज्योतीच्या व्यक्तित्वातील विचारांच्या ज्वाळांची स्फुलिंगे कशी धगधगत होती याची कल्पना येण्यास उपरोक्त घटना पुरेशा आहेत.

१८५० ते १८९० या कालखंडात सुधारणांचा जो रथ अंधश्रद्धा, रुढी परंपरांच्या काट्याकुट्यांच्या, खाचाखळग्यांच्या, डोंगरकपाऱ्यांच्या मार्गावरून धावत होता, त्या कृतिनिष्ठ सुधारणा रथाचे एक चक्र होते-महात्मा जोतीराव फुले तर दुसरे चक्र होते सावित्रीबाई जोतीराव फुले.

जोतीरावांसारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या वटवृक्षाखाली सावित्रीबाईंची प्रतिमा अस्पष्ट दिसणे हे स्वाभाविक असले किंवा त्यांचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्य अद्भुत

व अशक्य कोटीतील वाटले. तरी ते एक वास्तव आहे हे आता सिद्ध झाले आहे. मुलींसाठी व महारमांगांसाठी शाळा काढणे, वाट चुकलेल्या स्त्रियांच्या पोटी जन्मलेल्या अर्भकांसाठी बालहत्या प्रतिबंधक गृह काढणे, गोरगरीब मजुरांसाठी रात्रशाळा काढणे, संकरित बी-बियाणे पेरून आधुनिक पद्धतीने शेती करण्याचे तंत्र शेतकऱ्यांना शिकविणे, दुष्काळात अन्नान्न करणाऱ्या गरिबांच्या मुखात, अन्नछत्र उघडून घास भरविणे, केशवपन, विधवाविवाहबंदी, देवदासीपद्धती, दारुडेपणा इत्यादी दुष्ट प्रथांचे उच्चाटन करणे ही गोष्ट सोपी नव्हती. एकोणिसाव्या शतकातील तो एक चमत्कार होता. भयाण काळोख्या रात्री अंगावर कोसळू पाहणाऱ्या कडाडणाऱ्या विजांच्या लोळांनी दिपून जाऊन क्षणभर डोळ्यांसमोर अंधारी यावी; तद्वत फुले दांपत्याच्या या कार्याने सर्व समाज दिङ्मूढ झाला. असा या दांपत्याच्या कार्याचा सारा इतिहास रोमांचकारी आहे.

## विपर्यास आणि उपेक्षा

तत्कालीन समाजाने म. फुल्यांच्या कार्याचा जसा विपर्यास आणि उपेक्षा केली, तीच उपेक्षा या स्त्रीच्या वाट्यास आली आहे. फुल्यांच्या कार्यांचे मूल्यमापन आज गेले अर्धपाव शतक होत आहे, होत राहील. परंतु सावित्रीबाईंचे कार्य आजही समाजाला ज्ञात नाही. अतिशय दुर्मिळ साधनसामग्री परिश्रमपूर्वक मिळवून या थोर व्यक्तित्वाच्या कार्य-कर्तृत्वाचे मूल्यमापन करणारा "क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले" हा ग्रंथ मी लिहिला. या संदर्भात आणखीही संशोधन होणे आवश्यक आहे आणि होत राहील. हे व्यक्तित्व आजही विस्मृतीच्या खोल गर्तेत पडले आहे. परंतु जसजसा समाज सुविद्य आणि प्रबुद्ध होत जाईल, तसतसे सावित्रीबाईंच्या कार्याचे आकलन होत जाईल आणि समाज त्यांचा सदैव कृतज्ञ राहील. कारण ऋणभाराने वाकावे एवढे डोंगराएवढे उपकार फुलेदांपत्याने समाजावर केले आहेत.

सावित्रीबाईंचा चरित्रग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्रातील विचारवंत, लेखक, समीक्षक आणि वृत्तपत्रे यांनी माझ्या या संशोधनकार्याची प्रशंसा केली आणि अद्यापपर्यंत काळाआड झाकून राहिलेले सावित्रीबाई फुले यांचे क्रांतिकारी जीवनकार्य प्रकाशात आणल्याबद्दल धन्यवाद दिले. अशासकीय व शासकीय पातळीवर या कार्याचा विविध प्रकारे गौरवही झाला. त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझ्या चरित्रग्रंथाचा संदर्भ धरून सावित्रीबाईंच्या लोकोत्तर कार्याने प्रभावित झालेल्या अनेक साहित्यिकांनी चरित्र, नाट्य, काव्य, कादंबरी, लघुपट या माध्यमांच्या कुंचल्यांनी सावित्रीबाईंची प्रतिमा जिवंत केली. सावित्रीबाईंच्या जीवनावर अनेक लहानमोठी पुस्तके प्रकाशित झाली व होत आहेत.

काहींनी पुन्हा चरित्रे लिहिली, तर काहींनी कादंबऱ्या, काहींनी नाटिका लिहिल्या, काहीजण लघुपट काढण्यास प्रवृत्त झाले, अनेकांनी लेख लिहून सावित्री– ............

ψ कोडोली (जि. कोल्हापूर) येथील एक वृद्ध स्वातंत्र्य सैनिक व कवी कै. मिरगुंडे यांच्या वाचनात माझा चरित्रग्रंथ आला. सावित्रीबाईंच्या लोकविलक्षण कार्याने भारावून जाऊन त्यांनी माझ्या ग्रंथावरून पद्यात्मक चरित्र लिहिण्याचा संकल्प सोडला. मृत्युशय्येवर असताही त्यांच्या ध्यानीमनी सावित्रीबाईंचाच काव्यविषय होता. त्यांच्या निधनानंतर त्यांनी लिहिलेले सावित्रीबाईंचे ओवीबद्ध अपूर्ण चरित्र मी संपादित केले आहे. (कविवर्य शंकर अनंत मिरगुंडेकृत सावित्रीबाई फुले यांचे ओवीबद्ध चरित्र- संपादक डॉ. मा. गो. माळी, आशा प्रकाशन, गारगोटी, १९८२).

बाईंच्या या क्रांतिकार्याचा पुनरुच्चार केला. यामुळे सावित्रीबाईंच्या १९व्या शतकातील लोकोत्तर कार्याची अधिकाधिक महती स्पष्ट होण्यास मदतच झाली.

माझ्या या चरित्रग्रंथाची जशी प्रशंसा झाली, तशी जहरी टीकाही माझ्या वाट्यास आली. चरित्रग्रंथाची टर उडविण्याचा प्रयत्न झाला. चरित्रलेखनाचा सर्वच मामला तोतयेगिरीचा, धादांत बनावटपणाचा असल्याचा कांगावखोरपणा झाला, सावित्रीबाईंचे विचारवंतांना मान्य झालेले कार्यकर्तृत्व नाकारून पतीच्या आज्ञेत राहणारी केवळ एक सामान्य गृहिणी अशी सावित्रीबाईंची संभावना केली गेली. या अस्थानी, अनुदार आणि शिवराळ टीकेबद्दल माझ्या अनेक टीकाकार, संशोधक मित्रांनी याबद्दल नापसंती व्यक्त केली. ही टीका कशी निराधार आहे याचे विवेचन पुढे आले आहेच. असो.

## साधनांची उपलब्धी

महात्मा फुल्यांच्या शैक्षणिक कार्यावर पी.एच.डी. साठी संशोधन करणाऱ्या माझ्या एका विद्यार्थिमित्राबरोबर मी अभ्यास करीत असता सावित्रीबाईंचे पुसट उल्लेख अधूनमधून वाचनात येत. परंतु सावित्रीबाईंच्या संदर्भात येणाऱ्या या त्रोटक, निसटत्या उल्लेखांचे धारेदोरे जेव्हा मी जुळवून मनातल्या मनात एकत्र गुंफू लागलो; तेव्हा त्या उभ्या-आडव्या धाग्यांच्या पटावर सावित्रीबाईंची जी प्रतिमा उमटली त्या प्रतिमेच्या दर्शनाने मी स्तिमित झालो. ही स्त्री सामान्य नाही, महात्मा फुल्यांना कोणी शिक्षिका मिळेना म्हणून तिने शिक्षिका बनून पतीस सहाय्य केले, इतके सवंग या स्त्रीचे व्यक्तिमत्त्व नाही, ही खूणगाठ मनाशी बांधली आणि अधिक पुरावे गोळा करावयास सुरुवात केली. आणि त्यातून या थोर स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाच्या झाकलेल्या पैलूंचे दृष्टी दिपविणारे दर्शन घडले.

सावित्रीबाई चरित्राची व वाङ्मयाची साधने गोळा करण्यासाठी मी महात्मा फुल्यांवर संशोधन करीत असलेले माझे सहकारी प्रा. चंद्रकांत घुमटकर यांच्यासह अनेक ठिकाणी

भ्रमंती केली. सावित्रीबाईंचे घराणे आणि त्यांचे माहेर याविषयी म. फुले चरित्रात चुकीची माहिती असल्याचे आढळून आले होते. पुणे-कोल्हापूर मार्गावरील शिरवळनजीकच्या नायगाव या सावित्रीबाईंच्या जन्मगावी आम्ही गेलो. तेथे त्यांच्या माहेरच्या नेवसे-पाटलांच्या वंशजांना भेटलो. माहिती घेतली. सावित्रीबाईंच्या माहेर घराचे छायाचित्र घेतले. वाई, सातारा, पुणे, मुंबई या ठिकाणी गेलो. ग्रंथालये, सरकारी दप्तरखाने धुंडाळले, अन्यत्र अनेकांच्या गाठीभेटी घेतल्या. चर्चा निरसन झाले. माहिती व साधने गोळा करीत,असता साधनांचा, माहितीचा खरेखोटेपणा मी पारखून पाहिला. त्यासंबंधी प्रा. गं. बा. सरदार, डॉ. रा. चिं. ढेरे, डॉ. भालचंद्र फडके व डॉ. य. दि. फडके, प्राचार्य मंगुडकर,डॉ.बाबा आढाव, रा. ना. चव्हाण आदी महाराष्ट्रातील विचारवंतांना समक्ष भेटून किंवा प्रश्नावली पाठवून माझे निष्कर्ष त्यांच्यापुढे ठेवले. मी मांडलेल्या शोध-निष्कर्षाची त्यांनी मोठ्या आनंदाने भलावण केली.

सावित्रीबाईंचे साहित्य मिळविण्यात ज्या व्यक्तींनी मला साहाय्य केले त्यांत पुण्याच्या ''गावगाडा'' मासिकाचे संपादक श्री. द. स. ऊर्फ दादासाहेब झोडगे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. फुलवंताबाई झोडगे यांचा मोठा वाटा आहे. सौ. झोडगे यांनी सावित्रीबाईंचे छोटेसे चरित्र यापूर्वी लिहिले होते. त्यांनी यासंबंधी अधिक माहिती मला दिली. श्री. झोडगे यांनी पूर्वी ''मजूर'' पत्रात उपसंपादक म्हणून काम केले आहे. दादासाहेब म्हणजे सत्यशोधक समाजाच्या चळवळीचा चालताबोलता इतिहास! त्यांच्यामुळेच मला मूळ छायाचित्रे, त्यांच्या निगेटिव्हज्, सावित्रीबाईंची पत्रे, त्यांच्या काव्यसंग्रहातील उतारे, त्यांचे हस्ताक्षर हा मौल्यवान ऐवज मिळाला.

मला उपलब्ध झालेल्या सामग्रीत खालील साहित्याचा समावेश आहे.

### (१)काव्यफुले

सावित्रीबाई फुले यांचा सन १८५४ सालचा हा काव्यसंग्रह होय. शिलाप्रेसवर हा छापलेला असून मुखपृष्ठावर शंकरपार्वतीचें चित्र आहे. मिशनरी छापखान्यात याची छपाई झाल्याचे नमूद आहे. शिळाप्रेसवर छापलेल्या काव्यसंग्रहातील जेवढी पाने हाती लागली तेवढ्यांची छायाचित्रे घेऊन या पुस्तकात ती जशीच्या तशी देण्यांत आली आहेत. योगायोगाने या संग्रहातील १२ कवितांचे सावित्रीबाईंनी मोडी लिपीत केलेले कच्चे टाचण उपलब्ध झालेले आहे. यामुळे या काव्यसंग्रहातील कविता म्हणजे सावित्रीबाईंची स्वरचना आहे हे नि:संशय सिद्ध होते. मोडी हस्ताक्षरात मूळ स्वरुपात उपलब्ध झालेले हे कागद श्री. कृष्णाजी गोरे, मुंबई यांच्याकडून उपलब्ध झालेले आहेत.

## (२) बावन्नकशी सुबोध रत्नाकर

सावित्रीबाईंचा हा दुसरा काव्यसंग्रह असून तो १८९१ साली प्रसिद्ध झालेला आहे. सन १८९० साली महात्मा जोतीराव फुले यांचा मृत्यु झाला आणि बरोबर एक वर्षाने.....

* "अग्निफुले"चे लेखक डॉ. कृ. पं. देशपांडे सावित्रीबाईचे चरित्र प्रथमत: १९५३ मध्ये (लेखिका-प्रा. लीला पांडे) लिहिले गेले असे म्हणतात. (अग्निफुले) परंतु त्यापूर्वी १९३९ मध्ये शांताताई रघुनाथराव बनकर नावाच्या लेखिकेने सावित्रीबाईचे चरित्र लिहिल्याचे आढळून येते. (समाजभूषण कै. सौ. सावित्रीबाई जोतीराव फुले यांचे अल्पचरित्र-लेखिका व प्रकाशिका कु. शांताबाई रघुनाथराव बनकर, मुंबई, १९३९ राधा भुवन, होरयनी एडनवाला रोड, किंग्ज सर्कल, माटुंगा, मुंबई-१९) सावित्रीबाईंनी आपल्या पतीचे चरित्र काव्यस्वरुपात या संग्रहात दिले आहे. "सावित्री जोतीबा विरचित अथ बावन्नकशी सुबोध रत्नाकर" असे या काव्यपुस्तकाचे नाव आहे. महात्मा फुल्यांचे अधिकृत असे हे पहिलेच काव्यमय चरित्र होय. याची मराठी हस्तलिखित मूळ प्रत उपलब्ध झाली असून त्याच स्वरुपात या ग्रंथात समाविष्ट केली आहे. यामध्ये बावन्न कडवी असल्याने "बावन्नकशी" असे नाव दिले असावे. हे हस्तलिखित काव्यसंग्रहाच्या शेवटी सावित्रीबाईंनी मोडीत स्वाक्षरी केली आहे.

## (३) सावित्रीबाईंनी जोतीबांना लिहिलेली पत्रे

या पत्रांची संख्या तीन असून त्यांतील पहिले पत्र १०-१०-१८५६, दुसरे पत्र २९-८-१८६८ आणि तिसरे पत्र २०-४-१८७७ सालचे आहे. पहिली दोन पत्रे मोडीत असून ती मूळ स्वरुपात आहेत. ही दोन्ही पत्रे नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा या सावित्रीबाईंच्या माहेरगावी त्यांच्या घराण्यातील श्री. रघुनाथराव नेवसे-पाटील यांच्याकडून उपलब्ध झाले आहे. श्री. दादासाहेब झोडगे यांनी या पत्रातील मजकूर मूळ पत्रावरून यथामूल उतरवून घेतला आहे.

## (४) मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे व गाणी

हे छोटेसे पुस्तक १८९२ साली प्रसिध्द झाले आहे. श्री. झोडगे यांनी ते उतरवून घेतले. कै. डुंबरे गुरुजी यांच्याकडे ते हयात असेपावेतो जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या संबंधात । पुष्कळ मौलिक साहित्य होते. परंतु त्यांच्या निधनानंतर त्या साहित्याची वाताहात झाल्याचे समजते. या पुस्तकातील गाणी मिळू शकली नाहीत.

## (५) जोतिबांची भाषणे

हे पुस्तक मिसेस मिचेल व रेव्ह. मिचेल यांच्या प्रोत्साहनामुळे सौभाग्यवती सावित्रीबाई

फुले हिने तयार करून पुणे येथे शिळाछापावर छापून प्रसिद्ध केले. लेखनिक चार्लस् जोशी, ता. २५ डिसेंबर १८५६. ही चार भाषणे एका स्वतंत्र वहीत लिहिलेली होती. ती नायगाव येथे श्री. रघुनाथराव नेवसे यांच्याकडे उपलब्ध झाली.

### (६) शिव महिम्नस्तोत्र

शंकराचे वर्णन समाविष्ट असलेली ही संस्कृत पोथी अनेकांच्या माहितीची आहे. या मूळ पोथीची एक प्रत सावित्रीबाईंच्या संग्रही होती. या संस्कृत पोथीवर सावित्रीबाईंनी मोडीमध्ये स्वाक्षरी केलेली आहे. या पोथीची रचना शिखरिणी वृत्तामध्ये आहे. सावित्रीबाईंनी या संस्कृत पोथीचे रुपांतर केल्याचा पुरावा मिळालेला आहे. अशा स्वरुपांतराची दोन पाने मोडी लिपीत उपलब्ध झाली आहेत. हे अक्षर सावित्रीबाईंचे आहे. ही रचना ओवीबद्ध आहे.

### (७) सावित्रीबाईंच्या संग्रहातील उपलब्ध झालेले इतर साहित्य

#### (१) ग्रहलाघव

ले. श्री. भास्कर नारायण गोडबोले, आवृत्ती तिसरी (५-१२-१८८७) जोतिष व खगोल शास्त्रावरील एक महत्त्वपूर्ण व दुर्मिळ ग्रंथ-मुखपृष्ठावर सावित्रीबाईंचे नाव, तारीख, पान ६७ वर त्यांनी काढलेली चंद्रग्रहण आकृती व मोडी स्वाक्षरी, पान ७९ वर त्यांनी काढलेली सूर्यग्रहण आकृती, इंग्रजी शब्दप्रयोग व इंग्रजी सही. या आकृत्या पुस्तकातील गणितावरून सावित्रीबाईंनी काढल्या आहेत. त्यामुळे सावित्रीबाईंचा या विषयातील अभ्यास दिसून येतो. इंग्रजी हस्ताक्षर उत्तम होते हेही समजून चुकले.

#### (२) म्हणीविषयी चार शब्द

ले. विद्याधर वामन भिडे (१ जुलै, १८९१ रत्नागिरी) या छोट्या पुस्तकात पान १० वर सावित्रीबाईंची इंग्रजी सही (१-९-१८८२), पान २१ वर स्वत: रचलेली म्हण व ''सावित्री'' अशी संक्षिप्त सही. पान ३८ वर रामदासांचा दुरुस्त केलेला खालील श्लोक आहे-

एक जगी सर्व सुखी असा कोण आहे?
विचारी मना! तूंच शोधोनि पाहे
ज्ञान मना त्वांचि रे पूर्व संचीत केले
सौख्य हे तया सारिखे भोगणे प्राप्त झाले

तीन शब्द बदलून श्लोकाच्या अर्थात व्यापकता आणून शिक्षणाचे जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व सावित्रीबाईंनी स्पष्ट केले आहे.

**(३) शुकबहात्तरी**

विठ्ठल सखाराम अग्निहोत्री (१८४९) मुखपृष्ठावर सावित्रीबाईंची मोडीत सही व १-३-१८५३ ही इंग्रजीत तारीख, पान १०, ३१, ९४, ९६, ९८, १०७, १३१ वर खुणा, शेवटी कापडी कव्हरवर सही.

**(४) हिंदुस्थानचा इतिहास (१८६१)**

मूळ लेखक मरेसाहेब-अनुवाद विष्णू परशुराम शास्त्री, मुखपृष्ठावर सावित्रीबाईंची इंग्रजीत सही, पान २३८, २३९, २४० वर खुणा व ३१० वर मोडीत सही.

**(५) नीतिशतक (१८८२)**

बा. मा. समर्थ, पहिल्या पानावर सावित्रीबाईंची मोडीत सही व वाचताना केलेल्या काही खुणा (पान ८) १-८-८८ अशी इंग्रजीत तारीख.

**(६) अथ सांगरुद्र प्रारंभ (१८८०)**

नारो बाप्पाजी गोडबोले. संस्कृत पोथी, पहिल्या पानावर सावित्रीबाईंची सही.

**(७) भूगोल पत्रक (मुंबई इलाख्याचे) (१८८९)**

पहिल्या पानावर सावित्रीबाईंचे नाव, तारखा व काही खुणा.

**(८) शालापत्रक- (ऑगस्ट १८६४)- अंक ४**

मुखपृष्ठावर सावित्रीबाईंचे नाव व आतील पानावर वाचताना केलेल्या काही खुणा.

**(९) सिंहासनबत्तिशी (१८९२)**

पहिल्या पानावर सावित्राबाईंची सही.

**(१०) गद्य रत्नमाला (१८८८)**

ले. गोविंद शंकर शास्त्री बापट या पुस्तकात पान क्रमांक २३, २५, २८, ४७, ५७, ६०, १२३, १२५, १३२, १३४ व १४१ वर वाचताना केलेल्या खुणा.

**(११) इसापनीति (१८४८)**

पान क्रमांक ६५, ७१,८४, ८८, ९०, ११५, १५७, २१३ व २५४ वर वाचताना केलेल्या खुणा, पान क्रमांक १५७ वर कानडी शब्द व पान २५४ वर उर्दू शब्द लिहिले आहेत. हे सावित्रीबाईंनी लिहिले असावेत असे मला वाटते. अधिक शोध घ्यावा लागेल.

**(१२) साक्रेतिसाचे चरित्र (१८७३)**

कृष्णशास्त्री चिपळूणकर, अनुक्रमणिकेच्या पानावर इंग्रजी सही. पान क्रमांक २, ३, ४, ५, ६, ७, १२, १४, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, ४२, ४३ आणि ५३ यावर इंग्रजीत व इतर खुणा.

मला उपरिनिर्दिष्ट साहित्य उपलब्ध झाले ते प्रामुख्याने तीन प्रकारचे आहे:-

(१) सावित्रीबाईंच्या हस्ताक्षरातील साहित्य,

(२) सावित्रीबाईंचे प्रसिद्ध झालेले साहित्य,

(३) सावित्रीबाईंच्या प्रसिध्द झालेल्या साहित्यातून उतरवून घेतलेले साहित्य.

'काव्यफुले' (१८५४) व बावन्नकशी सुबोध रत्नाकर या काव्यसंग्रहांपैकी ''बावन्नकशी सुबोध रत्नाकर'' हे पुस्तक ''गावगाडा'' मासिकात पूर्वी पुनर्मुद्रित झाले असुन 'काव्यफुले' संग्रहातील काही कविताही या मासिकात पूर्वी प्रसिद्ध झाल्या आहेत. तसेच सावित्रीबाईची १०-१०-१८५६ व २९-८-१८६८ ही दोन पत्रे पूर्वी या मासिकातून प्रसिद्ध झालेली आहेत. ''जोतीरावांची भाषणे'' व ''मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे'' या दोन पुस्तकांतील मजकूर श्री. दादासाहेब झोडगे यांनी उतरवून घेतला, तसेच सावित्रीबाईंचे १८७७ चे पत्र आणि सासवड येथे सत्यशोधक परिषदेच्या अध्यक्ष म्हणून सावित्रीबाईंनी केलेले भाषण हेही श्री. झोडगे यांनी नोव्हेंबर १९७१ च्या ''गावगाडा'' अंकात प्रसिद्ध केले आहे (पृ. १६) हे सर्व साहित्य अशा प्रकारे मला श्री. झोडगे यांच्याकडून उपलब्ध झाले. महिम्नस्तोत्राचे रुपांतर केलेली दोन पाने, १८६८ चे पत्र व ''काव्यफुले'' संग्रहातील बारा कविता सावित्रीबाईंच्या हस्ताक्षरात लिहिलेल्या उपलब्ध झाल्या अस्न त्याचे ब्लॉक्स परिशिष्टात दिले आहेत.

## निराधार टीका

सावित्रीबाईंच्या साहित्यसामग्रीच्या संदर्भात विश्‍वासार्हतेबद्दल शंका व्यक्त केली गेली. सावित्रीबाईंची पत्रे विश्‍वासार्ह नाहीत असे मत मांडले गेले. हे मत पत्रातील आशय, शुद्धलेखन यांसारख्या भाषिक प्रमाणावर आधारलेले आहे. एका पत्रावर ''सावित्री''आणि दुसऱ्या एका पत्रावर ''सावित्री जोतीबा'' अशी सही आहे म्हणून ही पत्रे बनावट असल्याचे मत मांडले गेले. एका पत्रावर ''सावित्री जोतीबा'' अशी सही असल्याने ही पत्रे बनावट कशी ठरतात? खाजगी पत्रे लिहिताना केव्हा पूर्ण तर केव्हा अपूर्ण म्हणजे स्वतःचे नाव लिहिण्याची प्रथा आजही आढळून येत नाही काय? दुसरा आक्षेप पत्रातील शुद्धलेखनाचा. सावित्रीबाईंनी शिक्षणाचे धडे घरीच गिरविले होते. त्यामुळे त्यांचे लेखन व्याकरणदृष्ट्या सदोष राहणे अगदी स्वाभाविक वाटते. दुसरी शक्यता संस्करणदोषाची. सावित्रीबाईंचे वाङ्मय सत्यशोधकांनी उतरवून घेताना शुद्धलेखनाच्या चुका होणे (किंवा तशाच राहून जाणे) स्वाभाविक वाटते. १८६८च्या पत्रात सावित्रीबाईंनी पुराणिक आणि एक हरिजन स्त्री यांना वाचविल्याचा उल्लेख आहे. या दोघांना ठार मारण्यासाठी मिरवणुकीने नेत असल्याचा प्रसंग अतिरंजित असल्याचा युक्तिवाद करून हे पत्र बनावट ठरविण्याचा निष्फळ प्रयत्न केला आहे. टीकेतील वरील

सर्व कारणमीमांसा तर्कविसंगत, तकलादू असून साधार असा कोणताच पुरावा पुढे केला गेला नाही.

सावित्रीबाईंच्या छायाचित्राबद्दलची स्पष्टीकरणे देणे आवश्यक आहे. पूर्वी हे छायाचित्र ''मजूर'' या पुण्यामध्ये प्रसिद्ध होत असलेल्या पत्रात प्रसिद्ध झाले आहे. हे पत्र पुण्यात १९२४ ते १९३० या काळात निघत होते. या पत्राचे संपादक कै. रा. ना. लाड हे होते. हे छायाचित्र मला श्री. द. स. झोडगे यांच्याकडून मिळाले. स्वत: झोडगे 'मजूर' पत्राचे काही काळ उपसंचालक होते. त्यांनी या छायाचित्राबाबत अधिक स्पष्टीकरण केले. लोखंडे नावाच्या एका मिशनरी गृहस्थाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात सावित्रीबींचा ग्रुप फोटो होता. तो फोटो व प्रसिद्ध झालेल्या ''मजूर'' पत्रातील फोटोत साम्य आहे. त्या ग्रुप फोटोवरून सावित्रीबाईंचे छायाचित्र काढले आहे. १९६६ साली प्रसिद्ध झालेल्या ''महाराष्ट्राच्या कर्तृत्वशालिनी'' (लेखिका : प्रा. लीला पांडे) या पुस्तकातही जे रेखाचित्र पाहावयास मिळते त्या रेखाचित्रात व या छायाचित्रात कोणताही फरक नाही. या छायाचित्रांशिवाय इतर छायाचित्रांबाबत मी शहानिशा करून घेतली आहे. पुण्यात श्री. एकनाथ पालकर यांच्याकडे काही निगेटिव्हज होत्या. श्री. झोडगे यांना त्या उपलब्ध झाल्या. त्यावरून सावित्रीबाई आणि फातिमा शेख यांचे छायाचित्र उपलब्ध झाले.

सावित्रीबाईंच्या ''काव्यफुले'' या पुस्तकात प्रारंभी शिवपार्वतीने चित्र आहे. सावित्रीबाईंनी आपल्या काव्यात एके ठिकाणी शंकराचे वर्णन केले आहे.

नमस्कार तुज शिवप्रभो।
आदि निर्मिक स्वयंभू विभो।
अज्ञान नष्ट कारी वर सर्वास लाभो।

महात्मा जोतीराव फुल्यांना देवदेवतांच्या कल्पना मान्य नसल्या तरी परमेश्वराचे अस्तित्व त्यांना अमान्य नव्हते. त्यांचा रोख हिंदू धर्मातील भोंदूगिरी, आंधळ्या रुढींवर होता. नास्तिकता आणि पाखंडीपणा हा त्यांना निषिद्धच होता. सावित्रीबाईंची शंकराच्या ठिकाणी असलेली सर्जनशील धर्मश्रद्धा ही महात्मा फुल्यांच्या निर्मिक कल्पनेशी विसंगत नसून सुसंगत वाटते.

शंकर हे प्राचीन भारतातील आद्यदैवत. हे आद्यदैवत अनार्यांचे आहे. आणि या दैवताचा संबंध आर्यांच्याही पूर्वी एक हजार वर्षे आधी होऊन गेलेल्या द्राविड संस्कृतीशी आहे. अनार्यांचे दैवत म्हणूनही सावित्रीबाईंना या दैवताविषयी आदर वाटणे शक्य आहे. दुसराही एक मुद्दा या ठिकाणी विचारात घेणे आवश्यक आहे की, हे पुस्तक १८५४ साली प्रसिद्ध झाले आहे. फुलेदांपत्याच्या १८४८-९७ पर्यन्तच्या कार्यकर्तृत्वाचा प्रदीर्घ कालखंड पाहता या दांपत्याच्या वैचारिक प्रवासातील या प्राथमिक टप्प्याचाही त्या दृष्टीने

विचार होणे आवश्यक आहे.

माझ्या चरित्रग्रंथाच्या निमित्ताने चरित्र आणि ललित वाङ्मय यांचीही चर्चा केली गेली. चरित्र म्हणजे सुरस कादंबरी नव्हे हे जसे खरे, तसेच चरित्र म्हणजे घटनांच्या आणि व्यक्तींच्या शाब्दिक छायाचित्रांचा आल्बमही नव्हे हेही खरेच. त्या दृष्टीने चरित्र वाचताना कादंबरीचा आभास निर्माण व्हावा ही लेखकाची मर्यादा ठरावी की वैशिष्ट्य? चरित्रात असा केवळ नोंदीचा कोरडेपणा येणे योग्य की अयोग्य? घटनांची केवळ छायाचित्रे टिपणे म्हणजे चरित्र नव्हे, असे मला वाटते. छायाचित्रांनाही स्वत:चे असे एक वेगळे अस्तित्व असते. वेगवेगळ्या दृष्टिकोणातून टिपलेली ही छायाचित्रे जिवंत आणि बोलकी वाटू लागतात. आणि काही वेळा सत्य हे कल्पितापेक्षाही अद्‌भुत असते सावित्रीबाईंच्या जीवनातील प्रसंग अद्‌भुत, कल्पित वाटावेत एवढे नाट्य त्यात जरूर भरलेले आहे.

साहित्यसाधनाच्या विश्वसनीयतेबद्दल शंका व्यक्त करताना सावित्रीबाईंचे क्रांतिकार्यही नाकारणे ही आश्चर्याची आणि खेदाची गोष्ट आहे. वस्तुत: सावित्रीबाईंचे कर्तृत्व स्वयंसिद्ध आहे, सावित्रीबाईंचे कार्य ज्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिले, त्यांनी त्यांच्या कार्याच्या अपूर्वतेचा मुक्त कंठाने गौरव केला... तत्कालीन सरकारी दप्तरात याची सन्मानपूर्वक नोंद केली आहे. परंतु या गोष्टीकडे डोळेझाक करून सावित्रीबाईंच्या क्रांतिकार्याची उपेक्षा आणि अवहेलना करणे आणि सावित्रीबाईंना बहिष्कृत करणे ही गोष्ट निंद्यच म्हटली पाहिजे.

श्री. धनंजय कीर आणि कै. पंढरीनाथ पाटील या साक्षेपी चरित्रकारांनी म. फुले चरित्रात सावित्रीबाईच्या कर्तृत्वशालित्वाची नि:संदिग्ध शब्दांत ग्वाही दिली आहे.

लोकोद्धाराचे लोकविलक्षण व्रत फुलेदांपत्याने कसे घेतले होते याचे वर्णन करताना श्री. धनंजय कीर लिहितात, "ती (सावित्रीबाई) आदर्श अशी भारतीय स्त्री होती. तिने आपल्या पतीबरोबर छळ आणि वनवास भोगण्याची आपल्या मनाची तयारी केली होती. ज्या समाजाची गुलामगिरीतून मुक्तता करून त्याचा उद्धार करण्याचे व्रत त्या दोघांनी घेतले होते, त्या समाजाच्या हातून अनन्वित छळ सोसण्याची त्यांनी आपली सिद्धता केली."[(४)]

कीरांना सावित्रीबाईंचे कार्य कसे युगप्रवर्तक वाटते याचे वर्णन ते करतात, "जोतीरावांनी काढलेल्या मुलींच्या शाळांत तिने अनेक वर्षे काम केले होते. ते तिचे कार्य म्हणजे हिंदुस्थानातील स्त्रियांच्या सार्वजनिक जीवनातील एक युगप्रवर्तक अशीच घटना होती. तिच्या कार्याची महत्ता केवढी अपूर्व होती ते पुढील एका गोष्टीवरून प्रत्ययास येईल. एका स्त्रीची १८७३ साली शिक्षिका म्हणून नेमणूक झाली. ही बातमी

'नेटीव्ह ओपिनियन' ह्या मुंबईतील साप्ताहिकाने मोठ्या उत्साहाने आणि अभिमानाने प्रसिद्ध केली होती. स्त्रीशिक्षणाच्या दृष्टीने अन् देशहिताच्या दृष्टीने त्या काली अशी घटना महत्त्वाची मानण्यात येई.''(५)

आपली पत्नी आपले कार्य पुढे चालू ठेवील असा म. फुल्यांना विश्वास वाटत होता. याविषयी कीर पुढे लिहितात, ''आपली पत्नी आपले कार्य चालू ठेवील नि मुलगा त्या कार्यासाठी जीवित व्यतीत करील असा त्यांना विश्वास वाटत होता. त्या साध्वीने सुमारे पन्नास वर्षे पतीसंगे कडूगोड झेलले होते. जिवापाड कष्ट केले होते. त्यांनी अपार अडचणी सोसल्या आणि जगाकडे पाहण्याची शांत आणि विरक्त दृष्टीही अंगी बाणवली होती. ती आपल्या पाठीमागे आपले कार्य सोडणार नाही अशी त्यांची खात्री होती.''(६)

सावित्रीबाईंच्या अलौकिक कार्याबद्दल कृतज्ञता दाखविणे हे भारतीय स्त्रियांचे कसे कर्तव्य आहे हे सांगताना कीर लिहितात- ''हिंदी स्त्रिया सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यस्मृतीलाही जागत नाहीत. ज्या साध्वीने भारतातील तमोयुगात शिक्षिकेचा पेशा पत्करण्याचे अलौकिक धैर्य दाखवून हिंदी स्त्रीवर लादलेली अन्यायी बंधने झुगारून दिली; आणि मुलींना शिकवून हिंदी स्त्रियांचा उद्धार साधण्यासाठी पतीबरोबर सासऱ्याचे घर सोडले, पतीसंगे हालअपेष्टा भोगल्या, शिव्याशाप सहन केले, त्या स्त्रीशिक्षणाच्या अग्रदूतीची हिंदी स्त्रियांनी स्मृती बाळगू नये, ही कृतघ्नपणाची परमावधीच नव्हे काय? एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या उद्धारासाठी व्यतीत केलेल सावित्रीबाईसारखे अन्य आदर्श उदात्त उदाहरण क्वचितच आढळून येईल.''(७)

धनंजय कीर यांच्यावरील अभिप्रायावरून सावित्रीबाई फुले यांच्या युगप्रवर्तक कार्याचे यथार्थ दर्शन घडते आणि त्यांच्या १९व्या शतकातील अलौकिक कार्याची सत्यता पटते.

१९२७ साली आणि १९३८ साली कै पंढरीनाथ सीताराम पाटील यांनी म. फुले यांची दोन वेगवेगळी चरित्रे लिहिली आहेत. त्यासाठी त्यांनी अस्सल साधने गोळा केली होती. त्यांपैकी काही साधने आज शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रात उपलब्ध आहेत. सावित्रीबाईंच्या कार्याविषयी माहिती देताना ते म्हणतात, ''पेशवाईच्या राजधानीत खुद्द पेशव्यांचे सारे भाऊबंद विरुद्ध असता स्त्रीशिक्षणासारख्या अपवित्र (?) व अधर्म (?) प्रसारक कार्यास जोतिरावांना मदत घेऊन अपमान व जनाकडून आपली छी-थू करून घेण्यास कोण तयार होणार? दुसरा शिक्षक मुळीच मिळेना. जोतीरावांच्या धर्मपत्नी सावित्रीबाई या एक रत्न होत्या.'' जोतीरावांनी सावित्रीबाईंची शिक्षका म्हणून नेमणूक केल्यावर सावित्रीबाईंना जो छळ सोसावा लागला त्याबद्दल चरित्रकार आपली कडवट प्रतिक्रिया व्यक्त करताना पुढे म्हणतात- ''काही अधम भटांनी आपल्या तोंडाचे

नरककुंड बनविले व त्यात त्यांची जीभ मनसोक्त गटांगळ्या खाऊ लागली. ब्राह्मणांनी त्या बाईच्या अंगावर दगड व खडे फेकण्यात आपली पुण्याई खर्च केली."(८)

## चक्षुर्वैसत्यम् पुरावा

सावित्रीबाईंच्या युगकार्याची महती स्पष्ट करणारा चक्षुर्वैसत्यम् पुरावा उपलब्ध आहे. तो मामा परमानंदांचा. महाराष्ट्रातील राजकीय ऋषी म्हणून मान्यता पावलेले कै. मामा परमानंद यांनी आयुष्याच्या उतरणीला लागलेल्या फुलेदांपत्याला आर्थिक साहाय्य मिळावे म्हणून महाराज सयाजीराव गायकवाड यांना दि. ३१ जुलै १८९० रोजी पत्र पाठविले होते. त्या पत्रात ते म्हणतात, "आपले सारे जीवन जनतेच्या नि:स्वार्थ सेवेसाठी वेचणाऱ्या जोतीबांच्या व त्यांच्या पत्नीच्या निष्काम सेवेची जाणीव ठेवून त्यांना जीवन वेतन मिळत जाईल अशी कृपा करून महाराजांनी व्यवस्था करावी. जोतीबापेक्षाही त्यांच्या पत्नीचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल, तिची योग्यता काय सांगावी? आपल्या पतीबरोबर तिने संपूर्ण सहकार्य केले व त्यांच्या बरोबर राहून वाट्यास येईल त्या हालअपेष्टा भोगिल्या. उच्च वर्णियांतील उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रियांतही अशा प्रकारचीं त्यागी स्त्री आढळून येणे कठीण आहे. त्या उभयतांनी लोककार्यार्थ आपले सारे जीवन खर्च केले. अशांना खरे सांगावयाचें म्हणजे आपल्यावर राज्य करणाऱ्या सरकारकडून जरूर ती मदत मिळणे आवश्यक आहे पुंरत आपण ब्रिटिश सरकारच्या म्हणजे परकीयांच्या राजसत्तेखाली वावरत आहोत. अशा गोष्टींकडे त्याचे लक्ष जावे अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे."(९)

मामा परमानंद यांनी व्यक्त केलेला हा अभिप्राय म्हणजे सावित्रीबाईंच्या क्रांतिकार्यावर केलेले शिक्कामोर्तब होय.

गोविंद गणपत काळे या गृहस्थांना फुलेदांपत्याच्या सहवासाचे भाग्य लाभले होते. म. फुल्यांचे आद्यचरित्रकार कै. पंढरीनाथ पाटील यांना पाठविलेल्या आठवणीत ते म्हणतात, "सावित्रीबाईसंबंधी लिहावयाचे म्हणजे त्या माऊलीचे एखाद्या लेखकाने स्वतंत्र चरित्र लिहिले पाहिजे. जोतिराव हे जे येवढ्या मोठ्या योग्यतेस चढले त्याचे बरेच मोठे श्रेय त्यांच्या या सुपत्नीस दिले पाहिजे... पंडिता रमाबाई व डॉ. आनंदीबाई जोशी ह्या दोन तीन वेळा सावित्रीबाईंच्या भेटीस आल्या होत्या. याशिवाय आणखी काही बाया येत."[१०]

सन १८५१ साली तत्कालीन शिक्षणमंडळाचे अध्यक्ष जॉन वॉर्डन यांनी सावित्रीबाईच्या अध्यापक महाविद्यालयास भेट दिली होती. या संदर्भात सावित्रीबाईच्या कार्याचा गौरव करताना वॉर्डनसाहेब म्हणतात- "When I first went to Poona in

1851 as judicial commissioner, I visited the first two girls schools established in the city; they were lodged in small houses and my visit to them rominded me of the account, of the assembly of the early Christians 'in an upper room with the doors shut for fear of the Jews.' The school mistress, the wife of a gardener who educated her in order that she might be the means of elevating her countrymen from their state of miserable ignorance, was with difficulty persuaded to examine a class in my presence; and a class of young matrons, who had formed themselves into a normal class refused to see me on any terms, though I am told my honourable predecessors, Sir Erskine Perry and his colleague Mr. Lumsden, were shortly after admitted to the presence of these ladies. Such was the state of matters in 1851.''(११)

या उताऱ्यावरून त्या काळात स्त्रियांवर सनातनी समाजाने कशी अन्याय्य बंधने लादली होती. हे स्पष्ट दिसते. अशा बिकट परिस्थितीत सावित्रीबाईंचे कार्य कसे लोकोत्तर होते हे येथे वॉर्डन यांना सांगावयाचे आहे. सन १८५१ साली वयांच्या अवघ्या विसाव्या वर्षी अशा बिकट परिस्थितीत नॉर्मल स्कूल चालविणे, या शाळेतील प्रौढ मुलींना सनातनी समाजाचा रोष, छळ, निंदा, सहन करून प्रशिक्षण देणे ही काय सामान्य गोष्ट होती? हे काय केवळ कोणत्याही ''शालीन गृहिणीचे'' कार्य होते? हे कार्य सावित्रीबाईंच्या धैर्याचे, धारिष्ट्याचे, धडाडीचे, बंडखोरीचे नव्हते काय? सावित्रीबाईंचे हे असामान्यत्व खोडून काढताना वॉर्डनसाहेबांचा हा उतारा सोयीस्करपणे काटछाट करून उद्ध्वस्त सावित्रीबाईंच्या केवळ शालीनतेचा पुरावा म्हणून टीकाकारांनी पुढे केला आहे! हा शालीनतेचा युक्तिवाद खरोखरी अनाकलनीय आहे! अशा प्रकारे मूळ उताऱ्यातील मजकुरात काटछाट करून सावित्रीबाई एवढ्या मोठ्या नव्हत्या हे सिद्ध करण्याचा खटाटोप केला जावा ही गोष्ट टीकाकाराच्या पूर्वग्रहदूषित मनोवृत्तीचीच द्योतक नाही काय?

## साहित्याची शहानिशा:

सावित्रीबाईचे मूळ स्वरुपातील जे साहित्य मला मिळाले त्यामध्ये ''काव्यफुले'' काव्यसग्रहातील एकूण ४१ कवितांपैकी १२ कविता सावित्रीबाईंनी मोडीत लिहिलेल्या मिळाल्या आहेत. त्याशिवाय त्यांची दोन पत्रे, ''सावित्रीविरचित अथ बावन्नकशी सुबोध रत्नाकर'' चे हस्तलिखित इ. कागदपत्रांच्या अस्सलपणाबद्दल मी अनेक संशोधकांशी

चर्चा केली.. या कागदपत्रांचा कागद, वापरलेली शाई, विशिष्ट अक्षरे काढण्याच्या पद्धती, सावित्रीबाईची सही, हस्ताक्षर, तारखा, खुणा, चिन्हे, आकृत्या इ. संदर्भात त्यांनी हे साहित्य तपासून पाहिले व अस्सल असल्याचा अभिप्राय व्यक्त केला, तथापि हे सर्व साहित्य हस्ताक्षरतज्ज्ञाकडून तपासून घ्यावे व त्यांचा रीतसर अभिप्राय घ्यावा अशी सूचना सुप्रसिद्ध संशोधक व विचारवंत डॉ. य. दि. फडके यांनी केली व त्यास अनुसरून मी हे सर्व साहित्य मुंबई येथील सुप्रसिद्ध हस्ताक्षरतज्ज्ञ श्री. हरेश टी. गज्जर यांच्याकडून तपासून घेतले. श्री. गज्जर यांनी त्यांच्याकडील अत्याधुनिक शास्त्रीय साधनांनी कागद व शाई यांचा कालखंड, वॉटर मार्क्स आणि हस्ताक्षर याबाबत परीक्षण करून मोडीतील व इंग्रजीतील सह्या आणि मोडी व मराठी हस्ताक्षर हे एकाच व्यक्तीचे आहेत असा स्पष्ट अभिप्राय दिला आहे. यावरून हे सर्व साहित्य सावित्रीबाई फुले यांचे आहे हे सिद्ध होते. त्यांचा अभिप्राय वाचकांच्या सोयीसाठी जशाचा तसा शेवटी परिशिष्टात देण्यात आला आहे.

सावित्रीबाईंच्या साहित्याबाबतची शहानिशा माझ्या परीने मी सर्वतोपरी करून घेतली आहे. मी मागे म्हटल्याप्रमाणे संशोधकांनी याची जरूर चिकित्सा करून खरे खोटे स्वच्छ मनाने तपासून पाहावे. गुणदोष दाखवावेत. शेवटी संशोधन ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. जुन्या संशोधनात नवीन संशोधनाची भर पडत जाते. काही नवे पुरावे पुढे आल्यास या अभ्यासात ती भरच ठरेल, अशा कृतीचे मी स्वागतच करेन. खऱ्या अर्थाने एकदोन वर्षांतच ज्या सावित्रीबाईंचे चरित्र प्रकाशात आले त्याचे साहित्य ''बनावट'' तयार केले असे कसे होईल? तसे कोणाला करण्याची गरजच काय? माझ्या शोधप्रयत्नाचे मूल्यमापन काळच ठरवेल यात मला शंका वाटत नाही.

## साहित्याचे मूल्यमापन

सावित्रीबाईंच्या साहित्याचे मूल्यमापन करण्यापूर्वी अव्वल इंग्रजीच्या काळातील मराठी वाङ्मयाचा थोडक्यात आढावा घेणे युक्त होईल.

एकोणिसाव्या शतकात अव्वल इंग्रजी अमदानीत मराठी भाषेत जी ग्रंथरचना झाली त्यावर इंग्रजीचा ठसा आहे हे स्पष्ट आहे. इ.स. १८२६ पासून इ.स. १८७४ या सुमारे पन्नास वर्षांच्या कालखंडात अमेरिकन मिशन, स्कॉटिश मिशन आणि बॉम्बे बुक ॲन्ड ट्रॅक्ट सोसायटी यांनी सुमारे सव्वाशे पुस्तके मराठीत तयार केली. ही पुस्तके लिहिण्यामध्ये प्रामुख्याने रे. मिचेल, रे. फरार, रे. बाबा पद्मनजी, रे. नारायण शेषाद्रि, हरि केशवजी इत्यादींचा समावेश होतो. पुनर्जन्मनिर्णय, खंडोबाची गोष्ट, तुळशीचे लग्न यासारख्या हिंदू धर्मातील भोळसर परंपरांचा परामर्श घेऊन त्याचा फोलपणा

दाखविण्याचा प्रामुख्याने यामागे प्रयत्न दिसतो. मिशनऱ्यांचा धर्मविषयक अभिनिवेश वगळता या वाङ्मयाने प्रमुख दोन गोष्टींचा एतद्देशीयांना लाभ झाला. पहिली गोष्ट म्हणजे इंग्रजी वाङ्मयातील नव्या विचारांचे दर्शन आणि दुसरी गोष्ट म्हणजे मराठी भाषा ही सोपी होणे.

इ. स. १८२० साली बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली आणि यामार्फत एतद्देशीय आणि पाश्चिमात्य विद्वानांना मदत मिळाली. मराठी भाषेत शेकडो पुस्तके तयार झाली. एतद्देशीयांच्या शिक्षणाची ही सोय असली तरी ''युरोपकडे परत जाण्याचा हा एक राजमार्ग'' आहे हे इंग्रज राज्यकर्त्यांनी ओळखले होते. बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे पहिले सेक्रेटरी जॉर्ज जर्व्हिस यांनी इ.स. १८२५ मध्ये परिपत्रक काढून ''जी देशभाषा सर्व लोक समजतात ती ग्रंथास द्यावी. प्रौढ भाषेचे शब्द घालून दाटून अवघड करू नये'' असे जाहीर केले. परिणामत: संस्कृतप्रचुरता आणि पांडित्यप्रदर्शन यांच्या धाकाने मराठी भाषेचा जो कोंडमारा झाला होता तो थोड्याफार प्रमाणावर कमी होऊन मी भाषा प्रसादपूर्ण होण्यास मदत झाली.

पेशवाईत श्रावण महिन्यात ब्राह्मणांना जी भरमसाट दक्षिणा वाटली जात होती, त्यातील काही भाग या कार्यासाठी खर्च व्हावा असे ठरविण्यात आले. त्यामुळे मराठी भाषेला चांगले दिवस आले.

केवळ भाषांतरावर समाधान न मानता मराठी भाषेत स्वतंत्र रचनेस आरंभ झाला. बाळशास्त्री जांभेकर, बापू छत्रे, हरी केशवजी, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळूणकर, भाऊ महाजन यांसारख्या मंडळींनी यामध्ये लक्षणीय भर घातली. जांभेकरांचे ''दर्पण'', भाऊ महाजनांचा ''प्रभाकर'', कृष्णशास्त्री यांचे ''विचारलहरी'' यासारख्या स्वतंत्र माध्यमांची भर पडू लागली.

ललित साहित्याच्या दृष्टीने विचार केल्यास या काळात शाकुंतल, मृच्छकटिक या संस्कृत नाटकांची भाषांतरे, सीतास्वयंवर, रामजन्म यासारखी स्वतंत्र नाटके आणि कथात्मक वाङ्मय निर्माण होण्यास मदत झाली. बाबा पद्मनजी यांनी इ.स. १८५७ मध्ये ''यमुना पर्यटन'' ही स्वतंत्र कादंबरी लिहून कादंबरी वाङ्मयाचा पाया घातला.

''लोकास त्यांची वास्तविक स्थिती कशी आहे, ती कळून त्यांना सुधारले पाहिजे.'' या उदात्त हेतूने लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख (१८२३ ते १८९२), कृष्णशास्त्री चिपळूणकर (१८२४ ते १८७८), विष्णुबुवा ब्रह्मचारी (१८२५ ते १८७१) आणि महात्मा जोतीराव फुले (१८२७ ते १८९०) यांनी वाङ्मयात भर घातली. याच श्रेयनामावलीत आता महात्मा फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले (१८३१ ते १८९७) यांचे नाव गुंफणे आवश्यक ठरते.

काव्याच्या क्षेत्रात या काळात सर्वसाधारण स्वतंत्रता आढळत असली तरी शाहिरांचे पोवाडे आणि इतर काव्य व्यक्तिमाहात्म्य आणि देवमाहात्म्य यात घुटमळलेले दिसते. सामाजिक आशयाचे प्रतिबिंब क्वचितच पाहावयास मिळते.

**प्रातिनिधिक साहित्य कोणते**

एकोणिसाव्या शतकात जे साहित्य निर्माण झाले ते सर्व मराठी साहित्य प्रातिनिधिक म्हणता येईल का? त्या शतकात जे साहित्य निर्माण झाले ते साहित्य अखिल मराठी समाजाला व्यापून राहिले का? ग्रामीण समाज हा एकूण समाजाचा गाभा. त्या ग्रामीण समाजाचे रौद्र भीषण चित्र त्या काळातील ललित किंवा वैचारिक वाङमयात उमटले का? हिमनगाच्या पृष्ठभागाप्रमाणे पांढरपेशीय, शहरी समाजाच्याचे भावनांचे चित्रण त्याच पांढरपेशीय साहित्यिकांनी केल्याने जलाच्छादित प्रचंड हिमनगाचे रौद्र विराट दर्शन घडविण्यात ते वाङ्मय असमर्थ ठरले. या काळातील साहित्याचे मूल्यमापन करणाऱ्या एकाक्षी समीक्षेसही ही दुसरी बाजू दिसली नाही. एरवी महात्मा जोतीराव फुले यांच्या वाङ्मयासाठी भाषा आणि व्याकरण यांच्या तकलादू मोजपट्ट्या वापरण्यात या समीक्षेने धन्यता मानली नसती.

ज्या साहित्यात बहुसंख्याक समाजाला सामावून घेण्याचा आवाका नसेल आणि जे साहित्य त्या समाजातील भावभावनांचे चित्रण करण्यास समर्थ नसेल, ते साहित्य प्रातिनिधिक ठरू शकत नाही. याचे प्रत्यंतर आज साहित्यक्षेत्रात जी बंडखोरी होत आहे त्यावरून दिसून येते. आज मूल्यमापनाच्या पारंपरिक मानदंडांना सुरुंग लावणारे ग्रामीण आणि दलित स्फोटक वाङ्मय निर्माण होत असून तळागाळातील रुतलेली, दबलेली जीवने उसळ्या मारून वर उफाळून येत आहेत. शतकानुशतकांच्या मुस्कटदाबीच्या प्रतिकाराचा हा तीव्रतर आविष्कार होय. या स्फोटांचा केन्द्रबिंदू महात्मा जोतीराव फुळे यांचे साहित्य हाच होय.

अनेक वर्षे साहित्याची मक्तेदारी निर्धोकपणे उपभोगणाऱ्या सुविद्य वर्गाने अविद्य वर्गाला इतर सर्व क्षेत्रांतील गुलामगिरीबरोबर सांस्कृतिक गुलामगिरीत ठेवण्यात यश मिळविले. त्यामुळे कोंडून ठेवलेल्या, मुद्दाम अडवून साठवून ठेवलेल्या विद्येची डबक्यातील साचलेल्या पाण्यासारखी अवस्था होणे अपरिहार्य होते. भाषा हे एक समाजाचे वाहन आहे. ते एक साधन आहे. ते सर्वांचे आहे, ते साध्य नव्हे.

महात्मा जोतीराव फुल्यांनी सांस्कृतिक गुलामगिरीचा कट आपल्या धारदार लोकभाषेतील रचनेद्वारा उधळून लावला. भाषा हे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी हत्यार आहे. समाजाच्या भाषेतच समाजरचना करणे हे समाजहिताचे असते हे तत्त्व प्रत्यक्षात

आणण्याचे कार्य एकोणिसाव्या शतकात फुलेदांपत्याने केले आहे. भाषा साध्य नसून ते साधन आहे याचे प्रत्यंतर'या दांपत्याच्या रचनेत दिसून येते.

सावित्रीबाईची गद्य-पद्य रचना हे शूद्रातिशूद्रांच्या जागरणाचे साधन होते. उपेक्षित समाजाच्या कल्याणाच्या ध्यासातून उफाळून आलेला तो उमाळा होता.

महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या साहित्याचे मूल्यमापन करताना आपल्यासमोर जे साहित्य आहे, तेवढ्यावरून मूल्यमापन करावे लागते. जोतीरावांनी लिहिलेल्या वाङमयापैकी काही वाङमय कालप्रवाहात वाहून गेले असल्याची शक्यता आहे. सावित्रीबाई फुले यांच्या साहित्याबाबतची असेच म्हणावे लागेल.

**सावित्रीबाईंची काव्यसंपदा :**

माझ्या हाती आलेल्या सावित्रीबाईंच्या साहित्यातून एका स्वतंत्र, प्रतिभासंपन्न व लोककल्याणास वाहून घेतलेल्या थोर समाजसेविकेच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचे दर्शन होते.

''काव्यफुले'' हा सावित्रीबाईंचा काव्यसंग्रह म्हणजे त्यांची पहिली साहित्यिक रचना. या संग्रहात एकुण ४१ कविता समाविष्ट आहेत. या कविता स्थूलमानाने सात प्रकारच्या आहेत:-

(१)निसर्गविषयक.
(२)सामाजिक.
(३)प्रार्थनापर.
(४)आत्मपर.
(५)काव्यविषयक.
(६)बोधपर. आणि
(७)इतिहासविषयक आणि स्फुट कविता.

**(१) निसर्गविषयक कविता**

यामध्ये (१) पिवळा चाफा. (२) जाईचे फूल (३) जाईची कळी (४) गुलाबाचे फूल (५) फुलपाखरू आणि फुलाची कळी. (६) मानव सृष्टी आणि (७) मातीची ओवी.

''पिवळा चाफा'' या कवितेत हळदीच्या रंगाचे पिवळ्या चाफ्याचे फूल म्हणजे सृष्टीचा सुंदर अलंकार असे म्हटले आहे. हे फूल मनाला भुरळ पाडते आणि काव्य रचण्यास उद्युक्त करते. रसिक माणसाला तृप्त करून स्वत: मरून पडते. मानवी सौख्यासाठी केलेल्या त्यागाचे चाफ्याचे फूल हे प्रतीक आहे.

गूढपणे तो मनात शिरुनी।
काव्य कराया उन्मुख करतो।।
नेत्र नासिका रसिक मनाला।
तृप्त करुनि मरून पडतो।।

''जाईचे फूल'' व ''जाईची कळी'' याही अशाच प्रकारच्या दोन कविता आहेत.

फूल जाईचे पहात असता
ते मज पाही मुरका घेऊन
किंवा
रात्री बनते जणू रती ती
सुगंध खेळवी कळी जाईची...

या ओळींतून सावित्रीबाईंचे निसर्गप्रेम आणि त्याच्याशी झालेली समरसता स्पष्ट होते. ''गुलाबाचे फूल'' या कवितेमध्ये गुलाब आणि मानव-प्राणी यांची तुलना केली आहे. त्या म्हणतात.

गुलाबासारखा मानव हा प्राणी
सावित्रीची वाणी ध्यानी आणा

''मानव व सृष्टी'' या कवितेत पाऊस ज्याप्रमाणे मानवी जीवन सुजलाम्-सुफलाम् करतो तसेच मानवप्राण्याने केले पाहिजे असे त्यांचे मत आहे. त्या म्हणतात,

मानव प्राणी निसर्गसृष्टि।
द्वय शिक्क्यांचे नाणे।।
एक असे ते म्हणूनि सृष्टिला।
शोभवु मानव लेणे।।

**(२) सामाजिक कविता**

एकूण ४१ कवितांपैकी सामाजिक विषयावर त्यांच्या ११ कविता आढळतात त्या पुढीलप्रमाणे.

(१) शिकणेसाठी जागे व्हा.
(२) मनु म्हणे.
(३) ब्रह्मवंती शेती.
(४) शूद्रांचे दुखणे.
(५) इंग्रजी माऊली.
(६) शूद्र शब्दांचा अर्थ.

(७) बळीस्तोत्र.

(८) शूद्रांचे परावलंबन.

(९) तयास मानव म्हणावे का?

(१०) अज्ञान

(११) सावित्री व जोतीबा संवाद.

सावित्रीबाईंच्या जास्तीत जास्त कविता सामाजिक विषयावर असणे अगदी स्वाभाविक आहे. त्यांच्या इतर काही कविता सुद्धा बोधपर, उपदेशपर अशा स्वरुपाच्या आहेत. कवितांच्या शीर्षकावरून कवितांचे विषय आपोआपच स्पष्ट होतात. शूद्र अतिशूद्र समाजाच्या जागृतीसाठी ही काव्यरचना असल्यामुळे त्या दृष्टिकोनातूनच सावित्रीबाईंच्या काव्याकडे पाहणे आवश्यक आहे.

नांगर धरती शेती जे करिती।
मठ्ठ ते असती मनु म्हणे

या ओळींमधून 'मनुस्मृती'तील कोते विचार त्यांनी स्पष्ट केले आहेत.

इंग्रजी माऊली तोडते पशुत्व।
देई मनुष्यत्व शूद्र लोकां॥

या ओळींवरून पेशवाईतल्या अन्यायी राजवटीला विटलेल्या समाजविचारांचे दर्शन घडते.

"शिकणेसाठी जागे व्हा" या कवितेत सावित्रीबाई म्हणतात-

"असे गर्जूनी विद्या शिकण्या जागे होऊन झटा।
परंपरेच्या बेड्या तोडुनि शिकण्यासाठी उठा।

"तयास मानव म्हणावे का"? ही एक प्रभावी अशी उपदेशपर कविता आहे.

"ज्ञान नाही विद्या नाही
ते घेण्याची गोडी नाही
बुद्धि असुनि चालत नाही
तयास मानव म्हणावे का?"

याप्रमाणे प्रश्न उभे करून खरे मनुष्यत्व प्राप्त करण्याबा त्या उपदेश करतात. "सावित्री व जोतीबा संवाद" या अभंगपर कवितेत आपले पती जोतीबा यांच्या कार्याचे महत्व चित्रित केले आहे. त्या म्हणतात-

"काळरात्र गेली अज्ञान पळाले।
सर्व जागे केले सूर्याने या॥
शूद्र या क्षितिजी जोतीबा हा सूर्य।

तेजस्वी अपूर्व उगवला॥
जाऊ चला गाठू मानवता-केन्द्र।
''मनुष्यत्व'' इंद्र पदीं जाऊ॥

यावरून सावित्रीबींची ध्येयधारणा आणि त्यातील व्यापर्कता स्पष्ट होते.

सामाजिक कवितांपैकी सर्वच कविता विषय व आशयाच्या दृष्टीने ताज्यातवान्या वाटतात.

**(३) प्रार्थनापर कविता**

या प्रकारच्या सहा कविता आहेत यामध्ये...

(१) प्रास्ताविका.

(२) अर्पणिका.

(३) शिवप्रार्थना.

(४) शिवस्तोत्र.

(५) स्वागतपर पद्य व

(६) ईशस्तवन या कवितांचा यात समावेश होतो.

विशेष म्हणजे सावित्रीबाईनी या आपल्या संग्रहाला काव्यातच प्रस्तावना लिहिली आहे. ''प्रास्ताविका'' या कवितेच्या शेवटी त्या म्हणतात...

आभार मानते सहाय्यकारी यांचे।
मिशनरी छापाचे लेखनिक मदतीचे॥
प्रास्ताविक असे हे पुढे ठेविते वाचा।
स्वीकार करा तुम्ही या नजराण्याचा॥

शंकर हे सावित्रीबाईचे आराध्य दैवत असल्याचे दिसते. म्हणूनच त्यांनी सुरुवातील शिवप्रार्थना केली आहे, तसेच मुखपृष्ठावर शंकर-पार्वतीचे चित्र रेखाटले आहे.

''ईशस्तवन'' व ''स्वागतपर पद्य'' या काव्यरचनेवरून असे दिसून येते की, सावित्रीबाई यांनी स्वत: केलेली काव्यरचना त्या शाळेत मुलांसाठी उपयोगात आणत असल्या पाहिजेत.

**(४) आत्मपर कविता**

यामध्ये

(१) जोतीबांना नमस्कार.

(२) जोतीबांचा बोध.

(३) आमची आऊ.

(४) माझी जन्मभूमी आणि

(५) संसाराची वाट.

या कविता आहेत.

आदिशक्ती शंकरानंतर त्या जोतीबांना नमस्कार करून, आपल्या कार्यास प्रेरणा घेतात. विशेष म्हणजे ''माझी जन्मभूमी'' या कवितेत त्यांनी आपल्या नायगाव या माहेरगावचे वर्णन अतिशय हृद्य असे केलेले आहे. त्या म्हणतात-

''नायगाव हे माझे माहेर जुनाट गाव खेडे
तयाचे छान गीत पवाडे ॥

त्या पुढे म्हणतात :

''नायगाव खेडे सुखसमृद्धीचे असे ।
चालवी पाटीलकी, कारभारी नेवसे॥
याच कुलामध्ये मी नारी जन्म घेतसे।
असी जन्मभू मला वंदनीय प्रेम तियेवर जडे।
गातसे तिचे गीत चहुकडे

''आमची आऊ'' ही कविता सगुणाबाई क्षीरसागर या विधवा नातेवाईक स्त्रीवरील आहे. तिनेच जोतीबांचा सांभाळ केला आणि जोतीबा व सावित्रीबाई यांच्या कार्याच्या मोठेपणात त्यांनी सार्थकता मानली.

**(५) काव्यविषयक कविता**

यामध्ये

(१) द्रष्टा कवी आणि

(२) खुले काव्य. अशा फक्त दोन कविता आहेत. ''द्रष्टा कवी'' या कवितेच्या शेवटी त्या म्हणतात-

दिव्य सृष्टीचे काव्य हे तयाचे।
जीणे राहते सुंदर शिव साचे॥

यावरून कविविषयक आधुनिक संकल्पना सावित्रीबाईंनी त्या वेळी म्हणजे १९ व्या शतकात आपल्या काव्यात केली आहे हे दिसून येते.

**(६) बोधपर कविता**

या कवितांमध्ये-

(१) जोतीबांचा बोध.

(२) तेच संत.

(३) श्रेष्ठ धन.

(४) बाळास उपदेश

(५) नवस.
(६) बोलकी बाहुली.
(७) इंग्रजी शिका आणि
(८) सामुदायिक संवाद पद्य.
या कवितांचा समावेश होतो.
बाळास उपदेश करताना त्या म्हणतात-

''क्षणानंतरचे काम या क्षणिच कर ठोकुन।
झालं का काम की नाही न पुसे मृत्यू कारण।।

''नवस'' या कवितेत त्या अज्ञजनांना उपदेश करतात. त्या म्हणंतात-

''धोंडे मुले देती। नवसा पावती।
लग्न का करती। नारी नर।।
सावित्री वदते। करूनि विचार।।
जीवन साकार। करुनि घ्या।।

यावरून सावित्रीबाईंच्या विचारांचा पल्ला सुस्पष्ट होतो.

**(७) इतिहासविषयक कविता**-यामध्ये
(१) छत्रपती शिवाजी.
(२) राणी छत्रपती ताराबाई.
या दोन कवितांचा समावेश होतो.

''छत्रपती शिवाजी'' या कवितेत शूद्रादि ''अतिशूद्रांचा प्रभू'' म्हणून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. हा वैशिष्ट्यपूर्ण उल्लेख लक्षात घेण्यासारखा आहे.

## बावन्नकशी सुबोध रत्नाकर

इ.स. १८९१ साली जोतीरावांच्या मृत्यूनंतर ही रचना झाली असून पुस्तकरुपाने १८९२ मध्ये यास प्रसिद्धी मिळाली आहे. या काव्यसंग्रहाबाबत मूळ हस्तलिखित संग्रहात व उतरवून घेतलेल्या संग्रहात काही श्लोकांच्या क्रमात फरक आहे. हस्तलिखित काव्यातील १ ले कडवे उतरवून घेतलेल्या काव्यात ५ वे आहे. शब्दरचनेत थोडा फरक आहे, तीच गोष्ट ४९ व्या कडव्याबाबत आहे. सावित्रीबाईंच्या काव्याचे एक समीक्षक डॉ. कृ. पं. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे ''हे पाठभेद प्राचीनत्वाचे, प्रसाराचे आणि अनेक वेळा झालेल्या संस्करणाचे द्योतक असावेत.''१२ यामध्ये सावित्रीबाईंनी आपणास जोतीरावाकडून कशी प्रेरणा मिळाली हे व्यक्त करुन देशाचा प्राचीन काळापासून

सामाजिक इतिहास काव्यस्वरुपात थोडक्यात परंतु अचूक सांगितला आहे. प्राचीन मध्ययुगीन कालखंडाचा इतिहास सांगून पेशवाईच्या रावबाजीचे व किडल्यासडल्या समाजाचे विदारक चित्रण यात केले आहे. जोतीरावांनी शूद्र अतिशूद्रासाठी आपले सर्वस्व कसे अर्पण केले याचे वर्णन पाहिले की, सावित्रीबाईंच्या प्रतिभासंपन्नतेची जशी प्रचीती येते, तसेच जोतीराव आणि सावित्रीबाई या दांपत्यांच्या विचारसृष्टीचे, जीवनदृष्टीचे आणि समर्पित जीवनाचे दर्शनही या काव्यात घडते जोतीरावांनी सावित्रीबाईंच्या व्यक्तित्वाची जी जडणघडण केली त्याबद्दल सावित्रीबाईंच्या कृतज्ञ मनाचे विलोभनीय दर्शनही या काव्यात घडते. त्या उपोद्घातात म्हणतात-

''जयाचे मुळे मी कविता रचीते।
जयाते कृपे ब्रह्म आनंद चित्ते।
जयाने दिली बुद्धी ही सावित्रीला।
प्रणामा करी मी यती जोतीबाला।।

## सावित्रीबाईंची विचारसंपदा

''सावित्रीबाईंची भाषणे व गाणी'' या पुस्तकात सावित्रीबाईंची भाषणे आहेत. त्यांच्या भाषणांचे विषय ''उद्योग'' ''विद्यादान'', ''सदाचरण'', ''व्यसने'' आणि ''कर्ज'' असे आहेत. नावावरून त्या त्या विषयाचे महत्त्व आणि त्यामध्येच आपल्या देशाचे भवितव्य कसे अवलंबून आहे हे स्पष्ट केले आहे. ''उद्योग'' या भाषणात त्या म्हणतात-

''यासाठी न थकता दिवसभर उद्योग करणे हा मनुष्याचा उत्तम धर्म असून तो त्याचा खरा कल्याण करणारा मित्र होय. या मित्राशिवाय कल्याण करणारा दुसरा कोणी मित्र जगाच्या पाठीवर नसतो याची प्रत्येकाने खूणगाठ बांधून ठेवावी. आपल्या देशात थोडेसे इंग्रज लोक व्यापाराला आले आणि त्यांनी एक प्रचंड राज्य स्थापन केले. हा दृढ उद्योगाचा व बुद्धिशक्तीचा चमत्कार आहे. त्यात दैवाचा संबंध नाही. दैव, प्रारब्ध यावर विश्वास ठेवणारे लोक आळशी व भिकारी असून त्यांचा देश नेहमीच दुसऱ्यांच्या गुलामगिरीत राहतो. याचे ढळढळीत उदाहरण म्हणजे आपला हिंदुस्थान होय.''

''विद्यादान'' या आपल्या विचारप्रवर्तक निबंधात सावित्रीबाई म्हणतात-

''आळस, परावलंबन वगैरे दुर्गुण न वाढविण्यास व मनुष्याच्या अंगचे सद्गुण वाढण्यास उपयुक्त असा कोणता धर्म असेल तर विद्यादान होय. विद्या देणारा व विद्या घेणारा असे दोघेही या धर्माच्या योगाने खरीखुरी माणसे बनतात. या धर्माच्या शक्तीमुळे मनुष्यातील पशुत्वाचा लोप होतो. विद्या देणारा धैर्यशाली निर्भय बनून विद्या घेणारा सामर्थ्यशाली शहाणा बनतो.

इंग्रज सरकारने ज्ञानदानासाठी शाळा काढल्या. पण त्या थोड्या असून त्या तेवढ्यावरच राहिल्या तर सारा हिंदुस्थान शिकलेला होण्यास आणखी दीडशे वर्षे लागतील अशी ठाम समजूत आहे. तरी देखील मी म्हणते की, सरकारने शिक्षण प्रसाराचा आपला वेळ वाढवून सारे लोक विद्या शिकल्याशिवाय येथून जाऊ नये."

यावरून सावित्रीबाईच्या दूरदृष्टीची, मूलगामी स्वतंत्र विचारांची व प्रज्ञेची यथायोग्य कल्पना येईल. १८९१ साली सावित्रीबाईनी केलेली विधाने आजची देशाची शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय शोचनीय स्थिती लक्षात घेता तंतोतंत खरी ठरल्याचे दिसून येतात.

जोतीबांची भाषणे सावित्रीबाईनी संपादित केलेली आहेत. जोतीराव शेकडो सभांतून व परिषदांमधून विचारप्रवर्तक अशी भाषणे करीत व लोकशिक्षण करण्याचा प्रयत्न करत. जोतीरावांबरोबर सावित्रीबाईही बहुतेक ठिकाणी जात. जोतीरावांचे लेखनिक महाघट पाटील (ओतूर) हेही त्यांच्याबरोबर असत. ते जोतीरावांची भाषणे उतरून घेत. काही महत्त्वाच्या भाषणांची स्वत: सावित्रीबाईही टाचणे घेत. त्यांचे विषय पुढील प्रमाणे... (१) अतिप्राचीन काळी (प्राचीन भारताचा इतिहास) (२) इतिहास (३) सुधारणूक (४) आडदांड - पशु कुत्र्याची एक गोष्ट. सुधारणूक या निबंधात म्हटले आहे की, मानवाचे कर्तृत्व हे ईश्वरकृत नसून ते त्याच्या दीर्घकालीन अनुभवाने, दीर्घदर्शी प्रयत्नांनी आणि बुद्धिमत्तेने केलेल्या सुधारणुकीचे फलित होय...

"त्यांनी (ब्राह्मणांनी) लादलेली गुलामगिरी झुगारून देण्यास इंग्रज लोकांचे राज्य उपयुक्त असून शूद्रांनी ताबडतोब जागे होऊन विद्या शिकण्याची जलदी करून हजारो वर्षांचे पशुजीवनाचे जिणे टाकून द्यावे व सुधारलेला माणूस म्हणून जगण्याचा चंग बांधावा. असे आपण न करू तर पशूत आणि आपल्यात काही एक फरक राहणार नाही." या सावित्रीबाईनी संपादित केलेल्या वाङ्मयावरूनही त्यांच्या साक्षेपी अभ्यासू आणि वैचारिक प्रगल्भतेचे दर्शन घडते.

सावित्रीबाईंनी महिम्नस्तोत्र या संस्कृत पोथीवर काव्य केले असून त्यांच्या हस्ताक्षरातील मोडी लिपीतील दोन पाने उपलब्ध झाली आहेत. ही दोन पाने उपलब्ध झाली असली तरी त्यावरून त्यांना संस्कृत भाषेचे ज्ञान होते हे जसे लक्षात येते तसेच त्यांच्या प्रासादिक आणि ओघवत्या शैलीचेही प्रत्यंतर येते.

### विद्याव्यासंग

सावित्रीबाईंच्या संग्रहातील काही पुस्तके मला उपलब्ध झाली, त्याचा तपशील वर आला आहेच. या पुस्तकांवर त्यांनी पानोपानी खुणा, सह्या केल्या आहेत. त्यांच्या या

संग्रहावरून त्यांच्या विद्याव्यासंगाची कल्पना येते. ''ग्रहलाघव'' या पुस्तकात ''सूर्यग्रहण'' व ''चंद्रग्रहण'' या प्रकरणात मूळ लेखकाने गणिते मांडली आहेत. त्या गणितांवरून सावित्रीबाईंनी त्या त्या पानावर सूर्यग्रहण व चंद्रग्रहण याच्या आकृत्या हाताने काढून त्या खाली सही केली आहे. यावरून सावित्रीबाईंना खगोलशास्त्रासारख्या विषयातही रस असावा हे दिसून येते. या पुस्तकांवरून विविध विषयांवर त्यांचा चांगला अभ्यास होता हे दिसून येते. ''म्हणीविषयी चार शब्द'' या छोट्याशा पुस्तकात ''जगी सर्व सुखी असा कोण आहे'' हा रामदासांचा सुप्रसिद्ध श्लोक हे. या श्लोकात काही शब्दांच्या ठिकाणी अन्य शब्द योजून मनुष्य जगात सुखी असू शकतो. असा अर्थामध्ये बदल केला आहे. जोतीरावांप्रमाणेच सावित्रीबाईंना अज्ञान अंधकारात चाचपडणाऱ्या शूद्रातिशूद्रांना ज्ञानी करण्याचा कसा ध्यास लागला होता याची यावरून कल्पना येते. आणि म्हणूनच त्या आपल्या काव्यात,''ज्ञान नाही, विद्या नाही तयास मानव म्हणावे का?'' असा प्रश्न विचारून ''लिहीणे-वाचणे शिकून घ्या रे। छान वेळ आली।'' असा उपदेशही करतात.

## आधुनिक मराठी काव्याच्या जननी

''काव्यफुले'' हा सावित्रीबाईंचा पहिला काव्यसंग्रह सन १८५४ मध्ये शिळा प्रेसवर छापून प्रसिद्ध झाला आहे. हा कालखंड केशवसुतांच्या पूर्वी तीस वर्षे आधी येतो. यावरून या काव्याचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट होते.

केशवसुतांचे काव्यविषय आणि सावित्रीबाईंचे काव्यविषय हे जवळ जवळ सारखेच आहेत असे दिसून येते. आत्मपर कविता, निसर्गवर्णनपर कविता, सामाजिक जाणिवेची कविता हे सर्व विषय दोघांच्याही काव्यात प्रकर्षाने आढळतात. या दृष्टीने विचार केल्यास सावित्रीबाईंच्या कविता संख्येने कमी असल्या तरी तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता त्यांनी ज्या विषयावर काव्यरचना केली आहे ते विषय विचारात घेत आणि सावित्रीबाईंच्या काव्यरचना ही केशवसुतांच्या दोन अडीच तपे आधीची आहे हे लक्षात घेता मराठी काव्यात क्रांती घडवून आणल्याबद्दल पहिला मानाचा मुजरा सावित्रीबाईंनाच करणे अटळ ठरते. या दृष्टीने आधुनिक मराठी काव्याच्या जननी सावित्रीबाई फुले ठरतात.

## सामाजिक जीवन

फुलेदांपत्याचे जीवन म्हणजे धगधगणारे अग्निकुंड! जोतीरावांनी चूलबोळक्याचा संसार आपल्या आयुष्यात कधी मांडलाच नाही. बाईंना देखील ती कधी मांडावासा वाटला नाही. त्यांनी समाजाचा, आप्तांचा रोष पत्करला, निधडेपणाने आल्या प्रसंगाला

तोंड दिले. सावित्रीबाई कोठेही थोड्या देखील उण्या पडल्या नाहीत.

सावित्रीबाईंच्या काव्यसंपदेविषयी, त्यांनी ज्या काळात कविता केली तो काळ लक्षात घेता, अचंबा वाटतो खरा. त्यांची रचना पाहता त्यांना प्रतिभाशक्तीचा वरदहस्त होता हे लक्षात येते. प्रतिभा ही निसर्गदत्त देणगी आहे. जोतीरावांप्रमाणे सावित्रीबाईंनाही ही देणगी प्राप्त झाली होती. तथापि या शक्तीची त्यांनी स्वान्त:सुखाय नव्हे तर बहुजन सुखाय उपयोग केला. काव्यातील प्रचारकीपणा कलेत उणेपणा आणतो हे खरे, त्या दृष्टीने पाहता काही कविता काव्यगुणांच्या कसोटीस उतरणारही नाहीत. जोतीराव काय किंवा सावित्रीबाई काय, त्यांच्या काव्याचे प्रयोजन ''बुडती हे जन न देखवे डोळा'' हेच होते. शब्द सजवून नटवून लिहिण्यासाठी शब्दांची मोडतोड करीत त्यांना घासून पुसून झिलई देत, तथाकथित कलात्मक• बनविण्याचा आटापिटा जोतीरावांप्रमाणे सावित्रीबाईंनीही कधीच केला नाही. ''दु:खितांच्या वेदनांच्या कळा उरात आमच्याही'' ही जाणीव अंत:करणांत सदैव ठेवून अस्सल अनुभूतीचे प्रामाणिक चित्रण सावित्रीबाईंनी आपल्या कवितेत केले आहे.

या संदर्भात आणखी एक ऐतिहासिक सत्य लक्षात घ्यावेसे वाटते ते म्हणजे सावित्रीबाईंचा पहिला काव्यसंग्रह ज्या काळात (इ.स. १८५४ मध्ये) प्रसिद्ध झाला; त्या काळात समकालीन अशी एकही कवयित्री झाल्याचे दिसून येत नाही. उपेक्षितांच्या जागरणांचा व समाजसुधारणेचा विषय समाविष्ट असलेली काव्यरचना या कालात केल्याचे उदाहरण महाराष्ट्र सारस्वतात सापडत नाही. त्यामुळे सावित्रीबाईंची काव्य रचना म्हणजे सामाजिक आणि साहित्य क्षेत्रातील क्रांतीच होय, हे मान्य करावे लागेल.

सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाच्या अशा पैलूंचे दर्शन मला त्यांच्या उपलब्ध साधनसामग्रीत घडले. अज्ञाताच्या सरितेत तळागाळात हरविलेल्या या महान स्त्रीचे साहित्यभांडार जनसामान्यापर्यंत पोहोचवावे म्हणून हे साहित्य मी ग्रंथबद्ध केले आहे.

### तरीही सावित्रीबाई काळाच्या पडद्याआड का?

जोतीराव फुले यांच्याबरोबर सर्वच क्रांतिकार्यात तितक्याच समर्थपणे सहभागी झालेल्या सावित्रीबाई फुले या आजपर्यंत काळाच्या पडद्याआड कशा राहिल्या हा एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. जोतीरावांची त्यांच्या हयातीत व नंतरही उपेक्षा झाली. त्याहीपेक्षा प्रचंड उपेक्षा या थोर स्त्रीच्या वाट्यास आली.

इंग्रजी राजवटीच्या अव्वल काळात इंग्रजी राजवटीची झूल पांघरलेल्या ब्राह्मणी राजवटीत जीवनाची सर्वच क्षेत्रे ब्राह्मणांनी व्यापली होती. साहित्यक्षेत्रही त्याला अपवाद नव्हते. जातिव्यवस्थेने जन्मसिद्ध जातिवर्चस्वाचे मुक्त अनिर्बन्ध अधिकार या वर्गाला

मुक्त हस्ताने बहाल केले होते. शिवाय या अधिकारास इंग्रज राजवटीत शासकीय अधिकारांची जोड मिळाली होती. या वर्गातील काही सुधारणावादी व पुरोगामी विचारांच्या व्यक्तींचा सन्मान्य अपवाद वगळल्यास इतरांनी जोतीराव फुले, सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते यांच्या साहित्यकृतींची उपेक्षा आणि हेटाळणीच केल्याचे आढळून येते. शूद्रातिशूद्र व स्त्रिया यांच्या जागृतीचे साहित्य "नावडतीचे मीठ आळणी" या न्यायाने उपेक्षेच्या खोल गर्तेत लोटले गेले म्हणून साहित्याच्या इतिहासात या साहित्याला अद्यापि योग्य स्थान मिळाले नाही. जोतीरावांच्या ज्या साहित्यकृती आज मोलाच्या मानल्या जातात. त्या कृतींची साहित्याच्या इतिहासात कशी बोळवण करण्यात आली आहे हे पाहण्यासारखे आहे.

"तृतीय रत्न" हे जोतीरावांनी लिहिलेले मराठीतील पहिले स्वतंत्र आणि सामाजिक नाटक. परंतु या नाटकाची कशी वासलात लावली गेली याविषयी जोतीराव म्हणतात-"भटजोशी आपल्या मतलबी धर्माच्या थापा देऊन अज्ञानी शूद्रास कसकसे फसवून खातात व ख्रिस्ती उपदेशक आपल्या नि:पक्षपाती धर्माच्या आधाराने अज्ञानी शूद्रास खरे ज्ञान सांगून त्यास कसकसे सत्य मार्गावर आणितात, या सर्व गोष्टींविषयी म्या एक लहानसे नाटक करून सन १८५५ सालात "दक्षणा प्राईज कमिटीस" सादर केले. परंतु तेथेही असल्या भिडस्त भटसभासदांच्या आग्रहामुळे युरोपियन सभासदांचे काही चालेना, तेव्हा त्या कमिटीने माझी चोपडी नापसंत केली. अरे ही दक्षणा प्राईज कमिटी ही म्युनिसिपालटीचीच धाकटी बहीण म्हणण्यास काही हरकत नाही, कारण तिने या कामी शूद्रास उत्तेजन देण्याकरिता किती ठिकाणी शूद्रात दिवा लावून उजेड पाडिला आहे ते दाखीव. अखेरीस मी ते पुस्तक एकीकडे टाकून काही वर्षे लोटल्यानंतर दुसरी लहानशी ब्राह्मणांच्या कसबाविषयी नवीन चोपडी तयार करून आपल्या स्वत:च्या खर्चाने छापून प्रसिद्ध केली. तेव्हा एका माझ्या पुणेकर स्नेह्याने आग्रह करून त्या चोपडीच्या काही प्रती एकंदर सर्व शाळा खात्याकडे मुख्य अधिकाऱ्यांनी विकत घ्याव्यात म्हणून त्याने मजकडून त्या सर्व अधिकाऱ्यांस सूचनापत्रे पाठविली. परंतु यातील एकाही अधिकाऱ्याने भटांच्या भयास्तव एकसुद्धा चोपडी खरेदी करून आपल्या नावास बट्टा लावून घेतला नाही."

जेथे जोतीरावांच्या साहित्याची अशी वासलात लागत होती तेथे सावित्रीबाई काय किंवा सत्यशोधक कार्यकर्ते काय यांच्या साहित्याची काय परवड झाली असणार याची कल्पनाच केलेली बरी. या सर्वच कृतींची शिवताशिवत न होईल याची कटाक्षाने दक्षता घेतल्याचे दिसून येते. विद्येची किंवा साहित्याची मक्तेदारी शेकडो वर्षे अबाधितपणे उपभोगणाऱ्या उच्चभ्रूंनी आपली प्रतिक्रांतिवादी बैठक पक्की क्रांतीवादी विचारावर मात

केल्याचे प्रकर्षाने जाणवते. हे विधान कटू असले तरी सत्य असल्याचे मोकळ्या मनाने मांडीत आहे. इतिहासातील अनेक घटना याच्या साक्षीदार आहेत. क्रांतीवादी आणि प्रतिक्रांतीवादी विचार यांच्या संघर्षात क्रांतिवादी विचारांना अनेकदा पराभव पत्करावा लागतो. जोतीरावांना आपल्या आयुष्यात जे कटू आणि विदारक अनुभव आले होते त्याची कडवट प्रतिक्रिय त्यांच्या उद्गारात व्यक्त झाली आहे. ते म्हणतात-

"जेव्हा मला अतिशूद्रांच्या मुलांमुलींकरिता शाळा असण्याची फार जरुरी दिसल्यावरून, मी त्या कामी अनेक भट सभासद करून त्या सर्व शाळा त्यांच्या स्वाधीन करून, अतिशूद्रांच्या मुलामुलींकरिता शाळा काढल्या, तेव्हा एकंदर सर्व युरोपियन गृहस्थांनी मला द्रव्याद्वारे फार मदत केली. त्या उदार गृहस्थापैकी रेव्हिन्यु कमिशनर रीव्हज्साहेब यांनी जी मदत केली ती मी कधी विसणार नाही त्या उदार गृहस्थाने फक्त द्रव्यांद्वारेच मदत केली इतकेच नाही, परंतु त्या अतिशूद्रांच्या शाळात आपली धंदा सांभाळून वरचेवर येऊन मुलांची गती विद्येमध्ये किती झाली, याविषयीची चौकशी वारंवार करीत असे व मुलांस विद्या शिकण्याविषयी उत्तेजन यावे, म्हणून तो फार झटत असे. त्याचे उपकार अतिशूद्रांच्या मुलांच्या हाडामध्ये खिळले आहेत. त्याजबद्दल त्यांनी आपल्या शरीराची चर्मी जोडे करून त्यांच्या पायात घातले तथापि ते त्यांचे उत्तराई होणार नाहीत: त्याचप्रमाणे दुसरे काही युरोपियन गृहस्थानी मला या कामी फार मदत केली याजबद्दल मी त्यांचे फार आभार मानितो. त्या वेळेस त्याही कामी मला भट सभासद घेण्याची जरुरी पडली, याची आतली कारणे पुढील एखादे प्रसंगी कळवीन, परंतु पुढे जेव्हा मी त्या शाळांत भटाच्या पूर्वजांच्या कृत्रिमी पुस्तकांतील लबाड्या उघड्या करून मुलास दाखवू लागलो. तेव्हा त्यांचा माझा आतल्या आत बोलण्याचालण्यामध्ये बेबनाव होऊ लागला. त्यांचे म्हणण्याचा कल असा दिसून आला की, या अतिशूद्रांच्या मुलांस विद्या मुळीच देऊ नये. जर कदाचित त्यास शिकविणेच भाग पडले, तर त्यांची अक्षरओळख मात्र करून घ्यावी. माझे म्हणणे असे होते की, त्यांना चांगल्या प्रतीची विद्या देऊन तिजपासून त्यास आपले बरेवाईट समजण्याची शक्ती यावी. आता त्यांचा अतिशूद्रांस विद्या न द्यावी याचा हेतू हा, की ते लोक विद्वान होऊन आपणास ज्या सरकारच्या योगाने विद्या मिळाली व तेणेकरून खरे कोणते हे समजू लागले, त्या सरकारचे परमनिष्ठ सेवक होऊन आपले पूर्वजांनी त्याच्यावर केलेल्या जुलमाची आठवण होऊन आपला सर्वस्वी धिक्कार करतील किंवा कसा, हे बरोबर सांगता येत नाही असा जेव्हा माझे व त्यांचे मतामध्ये भेद पडू लागला तेव्हा मी त्यांचे सर्व कृत्रिम समजून त्या दोन्ही खात्यांतून एका बाजूला झालो."[१२]

मालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी स्वत:ला "मराठी भाषेचे शिवाजी" म्हणवून

घेतले. परंतु राष्ट्रवादाचा उदोदो करीत असताना परक्या इंग्रजी भाषेचे दूध प्राशन करून आणि डॉ. जॉन्सनच्या शैलीची सही सही नक्कल करूत या शब्द शिवाजीने जोतीरावांच्या अस्सल मराठमोळ्या भाषेवर शब्दांचे पट्टे फिरवून त्या भाषेची हेटाळणी केली. जोतीरावांच्या भाषेवर असे हल्ले चढविताना जोतीरावांच्या विचारगर्भ आशयाचे शिवधनुष्य या शब्दप्रभूला पेलले नाही.

भूतकाळात आणखी डोकावू लागलो तरी काय दिसते? उपेक्षित वर्गातील चोखामेळा, गोरा कुंभार या गोरा संतांचीही अशीच उपेक्षा झाल्याचे आणि रामदासांना राष्ट्रगुरू मानण्याची प्रवृत्तीचे पुढे सरसावल्याचे दिसून येते. अगदी अलीकडे घडलेली एक घटना येथे नमूद करण्यासारखी आहे. महात्मा फुले जन्मशताब्दीच्या निमित्ताने पुणे नगरपालिकेत कै. जेधे यांनी महात्मा फुले यांचा पुतळा उभा करण्याचा प्रस्ताव मांडला आणि त्यास आपल्या परंपरेला जागून सनातनी मंडळींनी एकजात विरोध करून तो प्रस्ताव फेटाळून लावला. विसाव्या शतकात अगदी अलीकडे अशी घटना घडू शकते तर एकोणिसाव्या शतकातील अशा प्रवृत्तीबद्दल आश्चर्य वाटावयास नको. सावित्रीबाईंच्या कार्याची व साहित्यकृतींची का उपेक्षा झाली असावी याची यावरून सहज कल्पना करता येते.

या संदर्भात आणखी एक महत्त्वाची बाब या ठिकाणी मला स्पष्ट करावीशी वाटते. एकोणिसाव्या दोन विचारप्रवाह किंवा प्रवृत्ती दिसून येतात. एक पहिला पुरोगामी विचारांना सामोरे जाऊन स्वागत करणारा आणि दुसरा, पुरोगामी विचारांना कडाडून विरोध करणारा. पुरोगामी विचारांचे स्वागत करणाऱ्याची संख्या अर्थातच अल्पशी आढळते. दुसरा वर्ग प्रतिगामी सडलेल्या प्रवाहातच डुंबत राहण्यात धन्यता मानतो. हा वर्ग बहुजन समाजाच्या चळवळीशी फटकून वागतो. बहुजन समाजातील व्यक्तीचे कार्यकर्तृत्व, लेखनकर्तृत्व या वर्गाच्या टीकेच्या मान्यात सापडते. हे हल्ले मोर्चे बांधून अचूक वेळी धूर्तपणे केले जातात. जोतीराव आणि सावित्रीबाई यांचे वाङ्मय या हल्ल्यात सापडले तर त्यात नवल वाटण्याचे कारण नाही. आताशा कोठे जोतीरावांचे वाङ्मय हे वाङ्मय म्हणून मान्यता पावत आहे. सावित्रीबाईंच्या वाङ्मयाला आणि कार्यकर्तृत्वाला तशी मान्यता अद्यापि मिळावयाची आहे. ही मान्यता देताना खळखळ झाली तरी ती नजिकच्या काळात मिळणे अपरिहार्य आहे.

भारतीय समाजक्रांतीचे जनक म्हणून आज महात्मा जोतीराव फुले यांचे यथार्थपणे वर्णन करण्यात येते. सावित्रीबाई फुले यांच्या कार्यकर्तृत्वाचा भव्य, विशाल पट पाहिल्यानंतर त्याचे वर्णनही ''भारतीय समाजक्रांतीच्या जननी'' असेच करता येईल.

हा ग्रंथ संपादन करीत असता अनेकांचे साहाय्य झाले. त्याचा निर्देश करणे हे माझे कर्तव्य समजतो. मा. दादासाहेब झोडगे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. फुलवंतीबाई

झोडगे यांचे साहाय्य आणि प्रेरणा याबद्दल पुनरुक्तीचा दोष पत्करूनही मी मुद्दाम उल्लेख करीत आहे. त्यांच्याशिवाय सावित्रीबाईंचे वाङ्मय ग्रंथबद्ध होणे अशक्यच होते. झोडगेदांपत्याला कृतज्ञतापूर्वक धन्यवाद.

या ग्रंथासंबधी मी महाराष्ट्रातील अनेक विचारवंतांशी, साहित्यकांशी अनेकवार चर्चा केली. त्यात प्रा. गं. बा. सरदार, प्राचार्य मंगुडकर, डॉ. बाबा आढाव, डॉ. रा. चिं. ढेरे, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. य. दि. फडके, डॉ. सुरेंद्र बारलिंगे, डॉ. कृ. पं. देशपांडे, श्री. महेश जोशी आदींचा समावेश होतो. या सर्वांनी मला आपला अभिप्राय सांगून मार्गदर्शनही केले. याबद्दल मी त्यांचे ऋण कृतज्ञतापूर्वक नमूद करतो.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे हा ग्रंथ प्रकाशित होत आहे ही माझ्या दृष्टीनें आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. याबद्दल मंडळाचे व मंडळाचे विद्यमान अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे व मंडळाचे सर्व सदस्य तसेच अधिकारी व कर्मचारी त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. हे साहित्य प्रसिद्ध होऊ नये म्हणून प्रयत्न झाले, तरी सुद्धा मंडळाचे अध्यक्ष डॉ. बारलिंगे विचलित झाले नाहीत. त्यांनी आपली वास्तव भूमिका कायम ठेवली व तसे सहकार्य दिले.

हा ग्रंथ संपादन करण्याच्या कामी माझे सहकारी प्रा. चंद्रकांत घुमटकर यांचे मला हरघडी मौलिक साहाय्य झाले आहे. या कार्यास त्यांच्यामुळेच चालना मिळाली व हे कार्य वेळेस पूर्ण होण्यास मदत झाली.

माझे विद्यार्थी श्री. जयवंत बर्गे, यांनी मुद्रणप्रत तयार करण्यात मदत केली. याशिवाय माझे सहकारी प्रा. बी. बी. सोळसे, प्रा. बी. एम. बोबे आणि माझे विद्यार्थी सर्वश्री श्री. आर. बी. गुरव, श्री. व्ही. जी. जाधव, श्री. जी. एम. भोसले, श्री. बी. एस. शेलार, श्री. सावेकर, श्री. तळावळेकर व महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. सी. बी. कलावंत यांनी मुद्रणप्रत तयार करण्यात व तपासून देण्यात चांगले सहकार्य केले आहे. तसेच टंकलेखनाचे काम श्री. बी. आर. सावंत यांनी केले आहे. या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

शेवटी महाराष्ट्रातील माझ्या ज्या हितचिंतकांनी मला हे कार्य पूर्ण करण्याचा आग्रह केला व प्रोत्साहन दिले त्यांच्यासह मी सर्वांचा ऋणी आहे.

गारगोटी

**डॉ. मा. गो. माळी**
संपादक.

## संदर्भ

१. ना. वि. जोशी: पुणे शहराचे वर्णन (संपा. गं दे. खानोलकर) १९७१, पृ. ८७
२. धनंजय कीर- स. गं. मालशे (संपा): महात्मा फुले समग्रवाङ्मय दु. आ. (१९८०), म. फुले यांचे मृत्युपत्र.
३. पुरोगामी सत्यशोधक, जुलै-डिसेंबर, १९८१, पृ. ६५
४. धनंजय कीर : महात्मा जोतीराव फुले, १९७५, पृ.३२
५. तत्रैव : पृ. १०१
६. तत्रैव : पृ. ३००
७. तत्रैव : पृ. ३११
८. पंढरीनाथ पाटील : म. फुले यांचे चरित्र, १९२७, पृ. २७-२८
९. पु. बा. कुलकर्णी : मामा परमानंद आणि त्यांचा कालखंड पृ. २६८
१०. पुरोगामी सत्यशोधक : जुलै-डिसेंबर १९८१, पृ. २०
११. रिपोर्ट ऑफ दि बोर्ड ऑफ एज्युकेशन, १९५३-५४, पृ. १००-१
१२. डॉ. कृ. पं. देशपांडे : अग्निफुले, १९८२,
१३. धनंजय कीर- स. गं. मालशे (संपा) म. फुले समग्रवाङ्मय १९६९, पृ. १४०
१४. तत्रैव : पृ. १४१.

# दुसऱ्या आवृत्तीसाठी संपादकाचे मनोगत

"सावित्रीबाई फुले समग्रवाङ्मय" या मी संपादित केलेल्या ग्रंथाची पहिली आवृत्ती महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने ऑगस्ट १९८८ मध्ये प्रसिद्ध केली. सदर ग्रंथाला फार चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे थोड्याच कालावधीत या ग्रंथाची पहिली आवृत्ती संपली. अनेक लोकांनी सदर ग्रंथासाठी माझ्याकडे आणि मंडळाकडे मागणी केली. परंतु प्रती शिल्लक नसल्याने त्यांना त्या उपलब्ध करता आल्या नाहीत. सन १९९७ हे सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथी शताब्दीचे वर्ष असल्याने राज्यात व राज्याबाहेर सावित्रीबाईंच्या स्मृतीशताब्दी निमित्ताने अनेक कार्यक्रम आयोजित केले जाणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्रात तर हे स्मृतीशताब्दी वर्ष अर्थपूर्ण व भावपूर्ण स्वरूपात साजरे होईल यात शंका नाही. या पार्श्वभूमीवर "सावित्रीबाई फुले समग्रवाङ्मय" (आवृत्ती २री) याच वर्षात मंडळ प्रकाशित करून एक चांगला योग साधत आहे, याबद्दल संपादक या नात्याने मला समाधान वाटते. याबद्दल मी मंडळाचे अध्यक्ष, सर्व सदस्य आणि महाराष्ट्र शासन यांचे हार्दिक आभार मानतो.

सदर ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीत 'संपादकाचे मनोगत' यामध्ये मी सावित्रीबाईंच्या कार्याचा साधारण आढावा घेऊन ती काळापुढे धावणारी एक थोर स्त्री होती. आपले पती महात्मा जोतीराव फुले यांच्या खांद्यास खांदा लावून शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य कसे लोकोत्तर होते ते स्पष्ट केले आहे. १९व्या शतकातील आद्य शिक्षिका, आद्य मुख्याध्यापिका, समाजसेविका, कवयित्री, विचारवंत म्हणून त्यांचे व्यक्तिमत्व किती समृद्ध होते हे मी पुराव्यानिशी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. खरे पाहता तत्कालीन मान्यवरांनी सावित्रीबाईंची थोरवी विविध स्वरूपात स्पष्ट केली आहे. हे सर्व पुरावे आजही उपलब्ध आहेत.

सावित्रीबाई फुले समग्र ग्रंथाच्या अगोदर म्हणजे सन १९८० मध्ये "क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले" हा चरित्रग्रंथ लिहून मी प्रसिद्ध केला. या ग्रंथाचे प्रचंड स्वागत झाले. लागोपाठ तीन आवृत्त्या निघाल्या. तथापी काही मोजक्या टीकाकारांनी सावित्रीबाईंच्या या ग्रंथावर टीका केली. त्यामध्ये सावित्रीबाईंच्या छायाचित्राबद्दल जो आक्षेप घेतला गेला, त्याप्रमाणे ते छायाचित्र संस्कारित स्वरुपाचे असल्याने त्याऐवजी रेखाचित्र समाविष्ट करण्याचा मंडळाने निर्णय घेतला व तो मी मान्य केला. तसेच सावित्रीबाई फुले यांचे जे साहित्य म्हणून या ग्रंथात समाविष्ट केलेले आहे त्या सर्व साहित्याची शहानिशा हस्ताक्षर तंज्ञ आणि हायकोर्ट मान्य श्री. गज्जर यांचेकडून करून घेतली. त्यांनी हे सर्व साहित्य, त्याचा कागद, शाई, सह्या इत्यादी सर्व बाबी आधुनिक

वैज्ञानिक साहित्याच्या माध्यमातून तपासून पाहून मला जो तपशीलवार अहवाल दिला, तो आता दुसऱ्या आवृत्तीत शेवटी परिशिष्ट स्वरुपात समाविष्ट केला आहे. यावरून या साहित्याबाबत शंका घेण्यास वाव राहिलेला नाही.

मी लिहिलेल्या चरित्रगंथावर आमच्या टीकाकार मित्रांनी जे आक्षेप घेतले त्यांचा मी काळजीपूर्वक अभ्यास केला. यासाठी राज्यातील कांही मान्यवर संशोधक, साहित्यिक आणि इतरांशी सखोल चर्चा केली आणि त्याप्रमाणे समग्र वाङ्मयात समाविष्ट असलेल्या माझ्या छापील ३५ पानी संपादकाचे मनोगत यामध्ये सर्वच बाबींचा साधार परामर्ष घेतला असल्याने या ग्रंथावर कोणत्याही प्रकारची टीका झाली नाही. याचा अर्थ यापुढे टीका होणार नाही असे नाही. विधायक टीका झाल्यास त्याचे स्वागत करावे असे माझे मत आहे. तथापी कांही मंडळी व्यक्तिद्वेषापोटी किंवा असूयेपोटी विकृत स्वरुपाची टीका करताना आढळतात. त्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देणे अपरिहार्य ठरते. मी माझ्या प्रदीर्घ संपादकीयामध्ये चरित्रग्रंथावर झालेल्या सर्व आक्षेपांचा पुराव्यासह परामर्ष घेतला असल्याने सर्वांचे समाधान होईल अशी आशा बाळगतो.

दुसरी एक महत्त्वाची बाब म्हणजे ''सावित्रीबाई फुले समग्रवाङ्मय'' या मंडळाने प्रकाशित केलेल्या ग्रंथास त्यावेळचे मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी टीकाकारांच्या सर्व आक्षेपांचा अभ्यासपूर्ण असा परामर्ष घेतल्याने बहुतेकांचे शंका-समाधान झाले आहे. यातून काही कोणाच्या शंका किंवा कोणाचे आक्षेप असतील तर प्रथम माझे या ग्रंथातील संपादकीय आणि मा. डॉ. बारलिंगे यांची प्रस्तावना वाचावी असे मी सर्वांना आवाहन करतो. तसेच अशा प्रकारच्या संशोधनपूर्ण ग्रंथासंबंधीचे संशोधन हे शेवटचे असे नसते; या विषयात भर घालण्यास आणखी वाव आहे असे माझे मत आहे. कारण संशोधन ही सतत चालणारी अशी प्रक्रिया असून त्यादृष्टीने आपण सर्वांनी विचार करण्याची गरज आहे. मी संपादित केलेल्या ग्रंथाबद्दल पुराव्यानिशी एखादी सूचना पुढे आल्यास मी त्या सूचनेचे मनापासून स्वागत करीन आणि मी माझ्या दृष्टीने ती तपासून पाहून जरूर तर त्या सूचनेचा स्विकार करुन त्याप्रमाणे कार्यवाही करीन असो.

''सावित्रीबाई फुले समग्रवाङ्मय'' या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध करण्यासाठी अलिकडेच ज्यांचे आकस्मिक दु:खद निधन झाले ते मंडळाचे अध्यक्ष कै. मा. विद्याधर गोखले यांचे मी प्रथम नम्रतापूर्वक आभार मानतो. तसेच विद्यमान अध्यक्ष मा. डॉ. मधुकर आष्टीकर, सचिव आणि मंडळाचे सर्व सदस्य आणि महाराष्ट्र शासन यांचे मी पुन्हा आभार मानतो आणि धन्यवाद देतो.

३ जानेवारी १९९७ **डॉ. मा. गो. माळी**



## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले

जन्म - ३ जानेवारी १८३१ निधन - १० मार्च १८९७

वाय ६८४-३ (A)



महात्मा जोतीराव फुले व दत्तकपुत्र चि. डॉ. यशवंत




युगपुरूष जोतीराव फुले व युगस्त्री सावित्रीबाई फुले



सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख त्यांच्या
शाळेतील दोन विद्यार्थिनींसह
(शंभर वर्षांपूर्वी निगेटिव्हवरून तयार केलेले दुर्मिळ छायाचित्र)




सावित्रीबाई फुले यांच्या ‘ काव्यफुले ’
या काव्यसंग्रहावरील मुखपृष्ठ




सावित्रीबाईनी दुष्काळात उघडलेल्या अन्नछत्राचे दुर्मिळ छायाचित्र



महात्मा फुले यांनी हरिजनांसाठी खुली केलेली विहीर




नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा येथील सावित्रीबाईचे जन्मघर



अस्पृश्यांसाठी म. फुले यांनी काढलेली भारतातील पहिली शाळा
अहिल्याश्रम



तात्यासाहेब भिडे यांचा बुधवार पेठेतील वाडा.
फुले दांपत्याने भारतातील पहिली मुलींची शाळा याच वाड्यात सुरु केली.



पुणे येथील विश्रामबाग वाडा. या ठिकाणी इ. स. १८५२ मध्ये ब्रिटीश सरकारकडून
म. जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांचा सत्कार करण्यात आला.

# काव्य फुले

रचयित्री

**सावित्री जोतीबा**

१८५४

वाय ६८४-४

१

## ''प्रास्तविका''

अर्पित फुले ही तुम्हा सुगंधी साची
काव्यात ओवते माळ करुनिया त्यांची
आहेत मजेची काव्यफुले ती सारी
वासाने तयाच्या शांति मिळे अंतरी

(चाल बदलून)
मनोरंजक उपदेश हे.....गाऊनी
बुद्धिगम्य रम्य आहे....गाऊनी
नीति शिक्षण सुबोध हे......गाऊनी
ज्ञान भावनाही पाहि.....गाऊनी

आभार मानते सहाय्यकारी याचे
मिशनरी छापाचे लेखनिक मदतीचे
प्रास्ताविका असे हे पुढे ठेविते वाचा
स्वीकार करा तुम्ही या नजराण्याचा

२

## अर्पणिका

**(वसंततिलका)**

मजवर सकळाची भाव भक्ति विशाला
हृदय भरुनि येते वाटते हे कशाला
उपकर कृति आहे भार होई मनाला
सुजन हितकारांना अर्पिते ही सुमाला
**—सावित्री जोतीबा**
इ.स. १८५४

३

## शिव प्रार्थना

**(ओवी)**

सत्य सुंदर शिव थाट। शिरी शोभे जटाजपळट॥
वाहती गंगाधरा उत्कट॥ चतुर्दश विद्येच्या ॥१॥

त्रिलोचन त्रितिक्षु ललाट॥ त्रिपुरांतक त्रिभुवन त्रिपट
स्कंधी सर्पनृत्याचा थयथयाट॥ चाले कर्ता कर्म क्रियेचा ॥२॥

निलकंठ षट्‌गुण सुंदर॥ विलसे गळा दिव्य हार॥
चतु:षष्ट कला संसार॥ सुशोभे मोक्ष फुलांचा ॥३॥

अज्ञानीस ज्ञान देणे पूर्ण॥ चतुर्भद्राची स्वयंभू खूण॥
करी व्याघ्रांबर वेस्टण॥ ऐसे अभिरूप शिवाचे ॥४॥

नमस्कार तुज शिवप्रभो॥ आदि निर्मिक स्वयंभुविभो॥
अज्ञान नष्ट कारी, वर सर्वा लाभो॥ प्रार्थना ही सावित्रीची ॥५॥

४

## शिवस्तोत्र

शिव तुझे जपे स्तोत्र
प्रेम भावे गातसे मी
विश्वंभरा तू महेशा
सद्भावे तुला वंदी॥
(श्लोक: वंसततिलका)
ज्याने गुणे जगत मौलिक निर्मियेले
ज्याचे कृपे सकल ब्रह्मत्रिलोक डोले
त्या शंभूला पुजुनिया वर मागते मी?
जिव्हेवरी बसुनि तू रचि काव्य नामी

५

## छत्रपती शिवाजी

**(अनुष्टुभ)**

छत्रपती शिवाजीचे। प्रात:स्मरण करावे
शूद्रादि अतिशूद्रांचा। प्रभु वंदू मनोभावे
नळराजा युधिष्ठिर। द्रौपदी ही जनार्दन
पुण्यश्लोक पुराणात। इतिहासी शिवानन

६

## स्वागतपर पद्य

सुदिन उगवला...या बाळा....आजला
हर्षे वंदुनि तुम्हाला
स्वागत करिती आजला
मुलामुलीचे पालक जमले
सुजन थोरही येथे आले
उपकृत आम्हा तुम्ही केले
प्रमुदित विनये...आपले
स्वागत करिती....या बाळा.....आजला

७

## ईशस्तवन

नमन तुला। शंकरा। श्रीधरा।।धृ।।

नीलकंठ शिवशंभू सदाशिव
तुजिया चरणी आमचा भाव
अज्ञानी लेकरा। उद्धरा।।

आम्ही लेकरे तुला प्रार्थितो
विद्या देई ज्ञान इच्छितो
दैन्यासुर संहारा। श्रीधरा।।

८

## जोतीबांना नमस्कार

(अनुष्टुभ)

जोतिबांना नमस्कार। मनोभावे करतसे
ज्ञानामृत आम्हां देई। अशा जीवन देतेस
थोर जोति दीन शूद्रा। अतिशूद्रा हाक मारी
ज्ञान ही ईर्षा देई। तो आम्हाला उद्धरी

९

## जोतिबाचा बोध

(अभंग)

स्वामी जोतीबांच्या। लागे मी चरणी
त्यांची गोड वाणी। मनी घुमे

महार मांगांची। करते मी सेवा
आवडीच्या देवा। स्मरूनिया
सेवा सत्यधर्म। देई समाधान
ठेवी शांत मन। आपले रे

जोतिबांचे बोल। मनात परसा
जीवाचा आरसा। पाहते मी
सेवेच्या भावाने। सेवा जे करिती
धन्यता पावती। मानवात

ऐसा बोध देती। अनुभवे जोती
मनात ठेविती। सावित्री मी

१०

## संसाराची वाट

(अभंग)

माझ्या जीवनात। जोतिबा स्वानंद॥
जैसा मकरंद। कळीतला॥

ऐसा भाग्यवंत। असेल तुजला।
नसे आनंदाला। पारावार॥

पोरे बाळे ऐसे। भवजंजाळाचे।
ओझे वाहण्याचे। काम तुझे॥

करून प्रपंच। आहे तो कठीण॥
बोलून हा शीण। जाईक का?॥

शांतता आपली। ठेवावी प्रपंची।
हीच वाट साची। संसारात॥

## ११

## तेच संत

(अभंग)

वाचे उच्चारी। तैसी क्रिया करी
तीच नरनारी। पूजनीय॥

सेवा परमार्थ। पाळी व्रत सार्थ
होई कृतार्थ। तेच वंद्य॥

सुख दुःख काही। स्वार्थपणा नाही
परहित पाही। तोच थोर॥

मानवाचे नाते। ओळखती जे ते
सावित्री वदते। तेच संत॥

## १२

# आमची आऊ

**(अष्ट मात्री)**

आमची आऊ। फार कष्टाळू
प्रेमळ होती। होती दयाळू

सागर वाटे। उथळ क्षणी
आभाळ ठेंगणे। तिच्याहुनी॥

आऊ आमच्या। घरी आली
टाक होऊन। पहा बैसली

मूर्तिमंत जणु। विद्यादेवी
हृदयी आम्ही। तिला साठवी॥

## १३

# राणी छत्रपती ताराबाई

**(पद्य)**

छत्रपती सिंहासनीची एक राणी ताराबाई
कोल्हापूरची जगदंबा महिराष्ट्राची अंबाई
शत्रुवर घाली छापा काळ तयाची ती होई
जेरीस शत्रूला करून करी बेफाम चढाई

न्हाऊन टाकी रणभूमी
शत्रु रक्तानी सारी
चपलता विजेची जैसी
तशीच कडाडे संहारी

ही एकच शूर रणगाजी छत्रपती ताराबाई
शिवधनू प्रतापी माझी वीरांची रणदेवाई
जयभवानी जयजयकार जय ताराराणी ललकार
तिज करी मी नमस्कार शूर देवीचा जयजयकार

चाल कटाव....

कोल्हापूरची महान राणी
छत्रपती शोभते भूषणी
शुभहस्ते तलवार भवानी
ताराबाई असुरमर्दीनी॥१॥

ताराबाई माझी मर्दीनी
भासे चंडिका रणांगणी
रणदेवी ती श्रद्धास्थानी
नमन माझिये तिचिया चरणी॥

## १४

## माझी जन्मभूमी

(पद्य)

नायगांव हे माझे माहेर जुनाट गांव खेडे
तयाचे छान गीत पवाडे॥ध्रु॥
रामकाली होती माकडे पांडवांचे कोल्हे
पुढे ते रठ्ठवंशी झाले
शिवप्रभूने राज्य स्थापिले कुणबी मराठ्यांचे
स्वराज्य झाले लोकहिताचे
नायगांव खेडे सुखसमृद्धीचे असे
चालवी पाटीलकी कारभारी नेवसे
याच कुळामध्ये मी नारी जन्म घेतसे

अशी जन्मभू मला वंदनीय प्रेम तियेवर जडे
गातसे तिचे गीत चहुकडे।।१॥

बारा बलुती बारा अलुती कितीक जाती जमाती
शिवारात या सुखे नांदती
पाऊसपाणी छान पडतसे येती पिके सारी
विहिरीवर फळेफुले गोजिरी
गुलजार पक्षी गाती मनोहर फिरती फुलपांखरे
ऐसा निसर्ग तिथे वावरे
बळी राजा थोर होई शेतकरी दानशूर
जणू माझी जन्मभूमी बळीचे कश्यपपूर
आम्ही तयांचे वंशज रडगाणे नच गाणारे
जन्मभूमिही मला सांगते फुले कराया ती
तीच उधळते मी तिजवरती।।२॥

१५

## पिवळा चाफा

(अक्षर छंद)

पिवळा चाफा
रंग हळदीचा
फुलला होता
हदयी बसतो ।।१॥

नाव तयाचे
सुवर्ण चंपक
सृष्टी दागिना
मनास पटतो ।।२॥

रंग मजेचा
ढंग दिमाखही
गंध तयाचा
शरीरिं खेळतो ॥३॥

शिव सत्याचे
सुदंशु भूषण
सुंदरतेचा
पुतळा जणू तो ॥४॥

ध्येयपूर्तीचा
रंग हळदीचा
त्याग गुणाचा
प्रतिक शोभतो ॥५॥

जैसे रतीला
मदन खेळवी
तैसे कवीचे
मन चेतवितो ॥६॥

गूढपणे तो
मनात शिरुनी
काव्य कराया
उन्मुख करतो ॥७॥

नेत्र नासिका
रसिक मनाला
तृप्त करूनी
मरून पडतो ॥८॥

१६

## जाईचे फूल

(अक्षर छंद)

फूल जाईचे
पहात असता
ते मज पाही
मुरका घेऊन ॥१॥
सफेत रंगी
गंध मनोहर
प्रफुल्ल होई
जाय हरकुन ॥२॥
हास्य गोडवे
नजर लाजरी
उठे काहूर
मज मनातून ॥३॥
पंच दलाचे
सुरेख फुलते
जणु बोलते
मनात शिरुनी ॥४॥
म्हणे त्यास मी
काय हवे तुज
एक विनंती
ते करी हसुन ॥५॥
करी आग्रह
मजला फुल ते
जवळ घेई
मजशी तोडून ॥६॥

रीत जगाची
कार्य झाल्यावर
फेकुन देई
मजला हुंगुन ॥७॥

१७

## जाईची कळी

(पद्य)

सुंदर किती ही कळी जाईची ॥ध्रु॥

छटा गुलाबी तिच्या भोवती
दिसे सुरेख कोवळी जाईची ॥१॥

तिचे तरुणपण छान विकसले
पंचदळी असे कळी जाईची ॥२॥

रात्री बनते जणू रती ती
सुगंध खेळवी कळी जाईची ॥३॥

नष्ट होऊनी जाय अखेरी
अशीच मानव कळी जाईची ॥४॥

१८

## गुलाबाचे फूल

(अभंग)

गुलाबाचे फूल आणि कन्हेरीचे
स्वरूप दोघांचे एक दिसे ॥१॥

डोंबकावळा तो नसे राजहंस
कृष्ण आणि कंस दुजे असे ॥२॥

शाम भट्टाची ती तट्टाणी इंद्राची
ऐरावत साची शोभेल का ॥३॥

तशी दोन्ही फुले असती वेगळी
योग्यता आगळी गुलाबाची ॥४॥

गुलाबासारखा मानव हा प्राणी
सावित्रीची वाणी ध्यानी आणा ॥५॥

## १९

## फुलपाखरू व फुलाची कळी

(पद्य)

फार देखणे फुलपाखरू
होते सुंदर छान मजेचे
सतेज डोळे पवळे रंगी
बोलके होते हसते त्याचे
पंख रेशमी त्यावर गोल
लहान मोठे पित रंगाचे
पाय मोडके परी भरारी
बागडणेही सुंदर त्याचे ॥१॥

त्यास पाहुनि भुलून गेली
आतुर होई कळी फुलांची
होती कोवळी भारी सुंदर
मनाने झाली प्रमिला त्याची

आपुलकीने खुणवी त्याला
मार्गप्रतिक्षा करते त्याची
ये तू धावत फुलपाखरा
मनात चिंती कळी फुलाची ॥२॥

झेप घेऊन फुलपाखरू
तिच्या जवळी वसे मजेने
भारावलेली मधूकलिका
ओढून घेई उत्कटतेने
रूप तियेचे करी विच्छिन्न
नकोसे केले तिजला त्याने
शोषून काढी मध तियेचा
चिपाड केले तिला तयाने ॥३॥

चव घेऊनि करी दूर ती
तीजकडे ते जरा न पाही
तिला टाकुनी दुसरीकडे
जावयास त्या लाजही नाही
कोण कोठली कळी फुलांची
जुनी विसर नवीन पाही
रीत जगाची उच्छृखल ही
पाहुनिया मी स्तिमित होई ॥४॥

२०

## मानव व सृष्टी

**(पद्य)**

पाऊस पडला शिवारात या निर्मल झाली सृष्टी
फळाफुलांना कडधान्यांना पोषक देई पुष्टी
झिमझिम येई पाऊस पडतो बहरली सृष्टी सारी
फळाफुलांचा वेलबुट्टीचा नेसते शालू भारी
कोकिळ गाते कहुकहुनी मोर डोलुनी नाचे
फुलाभोवती आनंदाने फिरती भुंगे चांचे
सुंदर सृष्टी सुंदर मानव सुंदर जीवन सारे
सद्भावाच्या पर्जन्याने बहरूनी टाकू ''वा'' रे
मानवी जीवन हे विकसूया
भय चिंता सारी सोडुनि या
इतरा जगवू स्वतः जगूया
मानवप्राणी निसर्गसृष्टी द्वय शिक्क्याचे नाणे
एकच असे ते म्हणुनि सृष्टीला शोभवु मानव लेणे

२१

## शूद्रांचे दुखणे

**(अनुष्टुभ)**

दोन हजार वर्षांचे। शूद्रा दुखणे लागले
ब्रह्मविहित सेवेचे। भू-देवांनी पछाडले

अवस्था पाहुनि त्यांची। होय शब्दी मन उठे
सुलभ मार्ग कोणता काय। विचारे बुद्धि अटे

शूद्रांना सांगण्याजोगा। आहे शिक्षण मार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व। पशुत्व हाटते पहा

२२

## द्रष्टा कवी

(दिंडी)

काव्य ज्ञानाचा भक्त असे मोठा
नवरसाचा तो भरलेला कोठा
ओघ काव्याचे वाहतात तोंडी
तया ''द्रष्टा'' वर देई नव-चंडी ॥१॥
देवी जिव्हेवर बसुनि काव्य गाई
धवल गंगाजल शंभु जटा धारा
काव्य वाचेतुन वाहती ''मधुरा'' ॥२॥
सरोवर मानस सुवासिक फुलांचे
तिथे बांधितो महान कमळांचे
चार विद्येची चौसष्ट कलांची
सुबक नवरत्ने त्यावर रसांची ॥ ३ ॥
कधी कल्पी मी ''विश्व'' मित्र आहे
काव्य माझे हे प्रतिसृष्टी आहे
दिव्य सृष्टीचे काव्य हे तयाचे
जीणे राहते सुंदर शिव साचे ॥४॥

२३

## खुळे काव्य व खुळा कवी

(पद्य)

कल्पित रचतो कवी काव्य
सुखदु:खे तो कधी भव्य
अनुभव घेतो स्वर्गाचा
भोग भोगतो नरकाचा

क्षणात रडतो
रडत नाचतो
देव आळवितो

अघटित रचतो खुळे काव्य
सुरात गातो कवी दिव्य
नजरेसंमोर उभी परी
प्रेम कवीवर परि करी

स्मित हसुनी
गोड बोलुनी
त्यास विनवुनी

जवळ घेऊनि चुंबितसे
कवीच्या मनी चित्र दिसे

## २४

## मनू म्हणे

**(ओवी)**

नांगर धरती। शेती जे करती।
मठ्ठ ते असती। मनु म्हणे ॥१॥

करू नका शेती। सांगे मनुस्मृती।
धर्माज्ञा करती। ब्राह्मणास ॥२॥

शूद्र जन्म घेती। पूर्वीची पापे ती।
जन्मी या फेडती। शूद्र सारे ॥३॥

विषम रचती। समाजाची रीती।
धूर्तांची ही नीती। अमानव ॥४॥

## २५

## ब्रह्मवंती शेती

**(ओवी)**

ब्रह्म असे शेती। अन्नधान्य देती।
अन्नास म्हणती। परब्रह्म ।।१।।

शूद्र करी शेती। म्हणूनिया खाती।
पक्वान्न झोडती। अहं लोक ।।२।।

दारूडे बोलती। तैसे हे वागती।
मतलब नीती। वाचाळांची ।।३।।

जे करिती शेती। विद्या संपादती।
तया ज्ञानवंती। सुखी करी।।४।।

## २६

## श्रेष्ठ धन

**(अनुष्टुभ)**

प्रात:काळी करी बाळा। शौचादि मुखमार्जन
होऊनिया शुचिर्भूत। वंदू माता पिता जन
स्मरू शंभो गुरू देव। अभ्यासी रमवू मन
घरी जाय दवडू नको। लाभदायी हे दिन
अभ्यास करी विद्येचा। विद्येस देव मानुन
घे नेटाने तिचा लाभ। मनी एकाग्र होऊन
विद्या हे धन आहे रे। श्रेष्ठ साऱ्या धनाहून
तिचा साठा जयापाशी। ज्ञानी तो मानती जन

२७

## बाळास उपदेश

(अनुष्टुभ)

करणे काम आजी ते। आताच कर खेचुन
जे दुपारी करायचे। ते आताच कर जाऊन

क्षणानंतरचे काम। या क्षणि कर ठोकुन
झालं काम की नाही। न पुसे मृत्यु कारण

२८

## इंग्रजी माऊली

(अभंग)

इंग्रजी माऊली। इंग्रजी वैखरी
शूद्रांना उद्धारी। मनोभावे॥

इंग्रजी माऊली। नाही मोंगलाई
नाही पेशवाई। मूर्खशाही॥

इंग्रजी माऊली। देई सत्य ज्ञान
शूद्राला जीवन। देई प्रेमे॥

इंग्रजी माऊली। शूद्रांना पान्हा पाजी
संगोपन आजी। करतसे॥

इंग्रजी माऊली। तोडते पशुत्व
देई मनुष्यत्व। शूद्रलोका॥

## २९

## नवस

(अभंग)

गोट्याला शेंदूर। फासुनि तेलात
वसती देवात। दगड तो ॥
म्हसोबा खेसोबा । भयंकर देव
तयावर भाव। ठेवोनिया ॥
नवस करिती। बकरू मारीन
नवस फेडीन। बाळजन्मी॥
धोंडे मुले देती। नवसा पावती
लग्न का करती। नारी नर॥
सावित्री वदते। करूनि विचार
जीवन साकार। करूनि घ्या॥

## ३०

## शूद्र शब्दाचा अर्थ

(अभंग)

शूद्र या शब्दाचा। नेटिव्ह हा अर्थ
जेते जे समर्थ। शूद्रा लावी॥
जित झाले शूद्र। इराणी भटाचे
भट इंग्रजाचे। उग्र शूद्र॥
खरे शूद्र धनी। होते इंडियाचे
नाव असे त्यांचे। इंडियन॥
होते पराक्रमी। आमचे पूर्वज
त्यांचेच वंशज। आपण रे॥

## ३१

## बळीचे स्तोत्र

(अनुष्टुभ)

बलुत्यांचे बळीराज्य। दानव दैत्य पावन
दानशूर बळी होता। सुखी त्यांचे प्रजानन
राज्यात सर्व संतोषी। त्याचे त्रिलोकी कीर्तन
स्वयंभु धर्म राज्यात। होतसे शास्त्र मंथन
यज्ञ याग सुरू होते। दान मिळते कांचन
डोई मुगुट रत्नांचा। उभयता अभिजन
विंध्यावली बळिपत्नी। उभयता अभिजन
मनोभावे बळिवंध्या। त्याचे गाऊ संकीर्तन
पूर्वज आपले हेच। गुरू त्याचे शुक्रानन
त्यांना पदोपदां बंदू। वंशज त्यांचे आपण
तू पुण्यात्मा बळीराजा। स्तोत्र गाती तुझे जन

## ३२

## इंग्रजी शिका

(अभंग)

स्वावलंबनाचा। उद्योग प्रपंच
ज्ञान धन संच। करी यत्ने॥

विद्येविण गेले। वाया गेले पशु
स्वस्थ नका बसू। विद्या घेणे॥

शूद्र अतिशूद्र। दुःख निवाराया
इंग्रजी शिकाया। संधि आली॥

इंग्रजी शिकूनि। जातीभेद मोडा
भटजी भारूडा। फेकुनिया॥

## ३३

## मातीची ओवी

(ओवी)

धरतीची माती। रंगीबेरंगी ती।
काळी पांढरी ती। शिवारात॥

काळसर माती। पिकपाणी देती।
फळे फुले शोभती। शिवारात॥

पांढरीला मळून। कौले विटा करून।
राहती घरे बांधून। शिवारात॥

मातीचा महिमा। सांगावा किती हा॥
मातीचे नाते अहा। शिवारात॥

## ३४

## शिकणेसाठी जागे व्हा

(पद्य)

उठा बंधुनो अतिशूद्रानो जागे होऊनि उठा
परंपरेची गुलामगिरी ही तोडणेसाठी उठा
बंधूनो शिकणेसाठी उठा ॥ध्रु॥

गेले मेले मनु पेशवे आंग्लाई आली
बंदी मनुची विद्या घेण्या होती ती उठली॥

ज्ञानदाते इंग्रज आले विद्या शिकुनि घ्या रे
ऐसी संधी आली नव्हती हजार वर्षे रे

मुलाबाळांना आपण शिकवू आपणसुद्धा शिकू
विद्या घेऊनी ज्ञान वाढवून नीतीधर्महि शिकू

नसानसातून इर्षा खेळवू विद्या मी घेईन
शुद्रत्वाचा डाग हा माझा निपटून काढीन

राज्यात बळीच्या आम्हास विद्या घडो
यशाची आमच्या दुंदुभी नगारे झडो
"इडापिडा टळो" या कार्यी भट न पडो॥

असे गर्जूनी विद्या शिकण्या जागे होऊन झटा
परंपरेच्या बेड्या तोडुनि शिकण्यासाठी उठा॥१॥

## ३५

## शूद्रांचे परावलंबन

(अनुष्टुप)

शूद्र आणि अतिशूद्र। अज्ञानाने पछाडले
देव धर्म रूढी अर्ची। दारिद्र्याने गळाले

सुखाची नसते हाव। दुःखास सुख मानती
विधाते निर्मिले जैसे। रहावे बोध सांगती

वैरागी भट मागोती। फिरती काम सोडुनी
करा निर्फळ चाकरी। स्वर्गीय पुण्य चिंतुनि

ज्ञानाचे नसती डोळे। म्हणोनि न दिसे दुःख
स्वावलंबी नसे शुद्र। स्विकारती पशू सुख

## ३६

## बोलकी बाहुली

(अनुष्टुभ)

सुंदर माझी बाहुली
नाव असे तिचं सोनुली
उचलुन तिला हळू घेते
नजरेपुढती मी धरते

हसू लागली
फुलून गेली
बोलू लागली

खेळ ग ताई ती वदली
फेकी मज वर मग झेली
तिचे ऐकुनि जीव भ्याला
कसं फेकू मी वर तिजला

असे खेळुनि
खाली पडुनि
जाईल मरुनि

उरी धरुनि मी तिजला
वदे गाल चुंबुनि तिला
खेळ घातकी नच व्हावा
काळ न साथी कटू दावा

असं तू खेळे
बरं का बाळे
ऐक सोनुले

माझा तुजला सुबोध हा
हितकर होईल तुला पहा

## ३७

# तयास मानव म्हणावे का?

(पद्य)

ज्ञान नाही विद्या नाही
ते घेणेचि गोडी नाही
बुद्धी असुनि चालत नाही
तयास मानव म्हणावे का? ॥१॥

दे रे हरी पलंगी काही
पशूही ऐसे बोलत नाही
विचार ना आचार नाही
तयास मानव म्हणावे का? ॥२॥

पोरे घरात कमी नाहीत
तयांच्या खाण्यासाठीही
ना करी तो उद्योग काही
तयास मानव म्हणावे का?॥३॥

सहानुभूती मिळत नाही
मदत न मिळे कोणीचीही
पर्वा न करी कशाचीही
तयास मानव म्हणावे का?॥४॥

जोतिष रम सामुद्रिक हो
स्वर्ग नरकाच्या कल्पनाही
पशुत नाही त्या जो पाही
तयास मानव म्हणावे का?॥५॥

बाईल काम करीत राही
ऐतोबा हा खात राही
पशू पक्षात ऐसे नाही
तयास मानव म्हणावे का?॥६॥

संसारी दारिद्र्य राही
पांघरून तयावर नाही
निंदिती सगळे लोकही
तयास मानव म्हणावे का?॥७॥

लिहीणे वाचणेही नाही
उपदेश पटायचा नाही
पशूंना कळे ते न कळेही
तयास मानव म्हणावे का?॥८॥

पशुत्वाची लज्जा नाही
त्यालाच मानीतो सुखही
पशुजीवाची लक्षणे ही
तयास मानव म्हणावे का? ॥९॥

दुसऱ्यास मदत नाही
सेवा त्याग दया माया ही
जयापाशी सद्गुण नाही
तयासा मानव म्हणावे का? ॥१०॥

गुलामगिरीचे दुःख नाही
जराही त्यास जाणवत नाही
माणुसकीही समजत नाही
तयास मानव म्हणावे का?॥११॥

पशुपक्षी माकड माणुसही
जन्ममृत्यू सर्वांनाही
याचे ज्ञान जराही नाही
तयास मानव म्हणावे का?॥१२॥

## ३८

## इंग्रजी माऊली

(पद्य)

पेशवाई गेली॥
इंग्रजी माऊली आली॥

निराशेचा गर्द अंधार
नरक स्वर्गाचे भय अनिवार
न्यूनगंडाचे मनी विचार
अशा या काळी, इंग्रजी माऊली आली॥

दूर फेकुनि रूढी द्वारे
परंपरेची मोडुनि दारे
लिहीणे वाचणे शिकून घ्यारे
छान वेळ आली.....इंग्रजी माऊली आली॥

भटधर्मांच्या क्लृप्त्या नाना
अज्ञानामुळे शूद्रजनांना
पिळती छळती बहु तयांना
पेशवाई मेली.....इंग्रजी माऊली आली॥

भटशाहीचे राज्य जळाले
शहाणे इंग्रज विजयी झाले
शूद्र जनांना हित हे ठरले
मनूस्मृती मेली....इंग्रजी माऊली आली॥

शूद्र जनांना ज्ञान सावली
अतिशूद्रांची पालनवाली
इंग्रज सत्ता सुखकर झाली
भयानकता गेली.......इंग्रजी माऊली आली॥

देश इंडिया नाही कुणाचा
इराणी ब्रहान यवन हुणांचा
असा खरा तो इंडि रक्ताचा
ठोक रे आरोळी....इंग्रजी माऊली आली॥

३.९

## सामुदायिक संवाद पद्य

**(पाच पाच मुलींचे पाच गट)**

पहिला गट

सरस्वतीचा हा दरबार खुला जाहला पाहू चला
शाळेमधुनि शिकुनि घेऊ ज्ञान मिळवू चला ग चला
शाळेत जाऊ चला ग चला

दुसरा गट

आहे काय ग दरबारात उगाच कटकट खेळू चला
काही नाही या शाळेत फुगडी खेळू चला ग चला
खेळायला जाऊ चला

तिसरा गट

तुमचं बोलणं पटत नाही घरची कामं करू चला
मदत आईस थोडी करूनी मोदऊ तिला चला ग चला
आईस संतोष चला ग चला

चवथा गट

थांबा थोडे काय करावे आईस विचारू आधि चला
खेळ, घरकाम की शाळा तीच सांगेल बघू चला
तिचा सल्ला घेऊ चला

आई

अभिमानाने जगण्यासाठी शिकून घ्या जा शाळेला।
मनुष्याचा खरा दागिना शिक्षण आहे घ्या चला
जा शाळेला जा शाळेला

काम पहिलं शिकायचं आहे. दुसरं काम खेळ खेळा
जमेल तेव्हा झाडणं पुसणं हात लावा घरकामाला
जा आधि जा शाळेला

सगळ्या मिळून

सरस्वतीच्या दरबारात शिक्षण घेणेस जाऊ चला
विद्यादेवीस प्रसन्न करूनि वर मागू तिजला चला
अज्ञानाची दारिद्र्याची गुलामगिरीही तोडू चला
युगायुगाचे जीवन आपले फेकून देऊ चला चला

नकोच इच्छा आरामाची
ईर्षा धरूनि शिक्षणाची
संधी घ्या तुम्ही छान आजचि
अनुकुलता बघ कालगतीची

न कुरकुरता न आळसता शाळेत जाऊ शिकू चला
गुलामगिरीची युगायुगाची बेडी तोडू चला चला

४०

## अज्ञान

(पद्य)

एकच शत्रू असे आपला
काढू पिटुन मिळुनि तयाला
त्याच्याशिवाय शत्रूच नाही
शोधूनि काढा मनात पाही

शोधला का
पाहिला का

विचार करूनी सांग लेकरा
नाव तयाचे बोल भरभरा

हरलास का
कबूलच का

सांगते पहा दुष्ट शत्रुचे
नाव नीट रे ऐक तयाचे

अज्ञान

धरूनि त्याला पिटायाचे
आपल्यामधुनि हुसकायाचे

## ४१

## सावित्री व जोतिबा संवाद

(अभंग)

सावित्री : चंद्र मावळला। उगवला सूर्य॥
उजळे अपूर्व। पूर्व दिशा ॥१॥

जोतिबास दावी। क्षितिज बोटाने।
बारीक दृष्टीने। दिशा पाहा ॥२॥

जोतिबा : चला जाऊ दोघे। जाऊ या बागेत॥
शोभाही पहात। बसू दोघे ॥३॥

सूर्याचा तो गोल। गुलाबी फिरता॥
वर येत होता। आकाशात ॥४॥

फुलपाखरे ती। फिरे फुलावरी॥
पक्षी झाडावरी। मारी शीळ ॥५॥

वारा वाहे गोड। मोहरली सृष्टी॥
रजनी ती कष्टी। झाली फार ॥६॥

सावित्री : वांछिती रजनी। सृष्टी काळोखात॥
राहो अंधारात। सर्व काळ ॥७॥

घुबडाची इच्छा। अशीच असते॥
देतसे सूर्याते। शाप शिव्या ॥८॥

विखारी रजनी। काळरात्र गेली॥
सृष्टी प्रकाशली। सूर्य तेजे ॥९॥

जोतिबा : खरे तुज बोल। हटला अंधार॥
शूद्रादि महार। जागे झाले ॥१०॥

दीनदलितांनी। अज्ञान सहावे॥
अमानुष व्हावे। घुबडेच्छा ॥११॥

कोंडला कोंबडा। तरी आरवतो॥
पहाट सांगतो। लोकांना तो ॥१२॥

सावित्री : काळरात्र गेली। अज्ञान पळाले॥
सर्वा जागे केले। सूर्याने या ॥१३॥

शूद्र या क्षितीजी। जोतिबा हा सूर्य॥
तेजस्वी अपूर्व। उगवला ॥१४॥

जाऊ चला गाठू। मानवता केंद्र॥
मनुष्यत्व इंद्र। पदी जाऊ ॥१५॥

# जोतिबांची भाषणे

"हे पुस्तक मिसेस मिचेल
व
रेव्ह. मिचेल यांच्या प्रोत्साहनामुळे
सौभाग्यवती सावित्रीबाई फुले
इने तयार करून
पुणे
येथे शिळा छापावर छापून
प्रसिद्ध केले."

लेखनिक
**चार्लस जोशी**
२५ डिसेंबर, १८५६

# १

# अति प्राचीन काळी

## १. मानव प्राण्याची उत्पत्ती

या सर्व अगम्य व अतर्क्य आकाश पोकळीत नाना प्रकारच्या तत्त्वांच्या संयोगाने अगणित सूर्यमंडळे व यांच्या ग्रह उपग्रहांची उत्पत्ती होऊन, स्थितीप्रद जाऊन कालांतराने नाश पावतात आणि ही घडामोड उत्पात्ती स्थिती व नाश या कालचक्राच्या नियमाने हरहमेश होत असून त्यास कोणी कोणी सृष्टीक्रम म्हणतात. या सृष्टीक्रमाने आकाशात असलेल्या कित्येक सूर्यमंडळाच्या ग्रहावर स्थिरचर, जलचर व खेचर वगैरे प्रकारच्या जातीचे जीव प्राणी असतील. आपल्या भूमंडलावर सर्व प्राणिमात्रात मानव प्राणी श्रेष्ठ असून शेणातील किडे सावलीत, उन्हात व पाणथळ या ठिकाणी केव्हा व कसे उत्पन्न होतात, याचा शोध घेता शेणातील द्रव्यांची रसानयक्रिया होऊन परिस्थिती आणि काळस्थिती यांच्या रहाटीने भिन्न भिन्न ठिकाणी व भिन्न भिन्न काळात एकाच शेणाच्या पोहिटीच्या तीन भागांत जे जीवन उत्पन्न झाले त्यास किडे हे नाव असून ते जसे उत्पन्न झाले त्याप्रमाणे सर्व प्राणिमात्रांचा जन्म झाला आहे. जीवसृष्टीत शेवाळ, नेचे, झाडे, मासे, मगर, वाघ, सिंह, घार, चिमणी, पोपट, माकड व मानव हे प्राणिमात्र येत असून त्यांचा एकमेकांशी निकटचा संबंध असून त्यांच्यात सृष्टीक्रमानुसार फेरफार होतात. माकड पशुजातीचा कायापालट होऊन त्यापासून नूतन व विजातीय मानवप्राणी तयार झाला असून ही गोष्ट जादूसारखी, चुटकीसरशी घडलेली नसून या क्रियेला लाखो वर्षे लागली आहेत. हे मत डार्विनने नुकतेच प्रसिद्ध केले असून ते सत्य मानावे तर निरनिराळ्या धर्मांतील मानव उत्पत्तीच्या मताला बाध येतो. वेदमत असे आहे की, ब्रह्मदेवाच्या निरनिराळ्या ठिकाणी असलेल्या जननेंद्रियापासून ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य व शूद्र या चार प्राण्यांचा जन्म झाला. पारशांच्या धर्मग्रंथात अहूरमज्द या देवाने

माणसे उत्पन्न केली. बौद्ध अथवा जैन मताप्रमाणे जुगलांच्या जुगण्यामुळे प्राणी उत्पन्न झाले. ख्रिस्ती मताप्रमाणे प्रभूने आदाम निर्माण करून त्याच्या एका कासोळापासून ईव्हा उत्पन्न केली. आदाम व ईव्हा जोडप्यापासून सारे मानव जन्मास आले. अशा तऱ्हेतऱ्हेच्या मताविषयी वाटाघाट करता व धर्मघोळात न गुरफटता त्यांपैकी कोणत्यातरी एका मार्गाने मानव प्राण्याची उत्पत्ती झाली असेल अशी कल्पना करून चालू.

### २. पशुपक्षी आणि मानव

प्राणिमात्र उत्पन्न झाले तेव्हा त्यांना जशी स्थिती मिळाली तिच्या अनुषंगाने ते जगण्यासाठी निसर्गाशी व इतर कलाकौशल्यामुळे निरनिराळ्या गोष्टी प्राप्त होत असून त्या पशुपक्ष्यास नसतात असे नसून त्यांची कोटी किंवा घरटी, केस, लोकर, लव्हाळा व रेशीम यांची विणकर चमत्कारिक रीतीने तयार केलेली असते. ती पाहून चमत्कार वाटून मन अगदी थक्क होऊन जाते. जगण्यासाठी ज्या गोष्टीची गरज आहे त्या साऱ्या गोष्टीचे ज्ञान पशुपक्ष्यांना उपजतच असून त्यास आपल्या जातीच्या व आपल्या पूर्वजाप्रमाणे सुख घेता येते. मनुष्यप्राणी उत्पन्न होऊन तो पशूप्रमाणे वागत होता. त्याचे ते वागणे आज राहिले नाही. हजारो वर्षांपूर्वी पाकोळी नावाचे पाखरू स्वत:स जशी कोठी बांधीत होते त्याचप्रमाणे आजचे पाकोळी पाखरू कोठी बांधते. हजारो वर्षापूर्वीच्या कोठीत व आजच्या कोठीत तिळमात्र फरक नाही. पशुपक्षी निर्बुद्धी असल्याने त्यास आपली सुधारणा करता येत नाही. मानवाचे तसे नाही. तो जेव्हा जन्मला असेल तेव्हा तो एखाद्या चिमणीच्या किंवा कावळ्याच्या पिलाप्रमाणे निव्वळ मांसाचा गोळा असून अनेक पडलेले गोळे कित्येक अजस्त्र पशुपक्ष्यांचे भक्ष्य बनले असतील. त्यातून कित्येक वाचले असतील. ते जीव घेऊन कोठे तरी दडून प्राणरक्षण करीत असतील. ते वाढून मोठे होऊन हिंस्त्र पशूसी दगडधोंड्याच्या किंवा झाडाच्या ट्रणक दंडुक्याच्या साहाय्याने झगडून ते आपला बचाव करीत असतील. त्यास मोठमोठ्या झाडाच्या बेचकळ्यात किंवा डोंगरकपारीच्या खोलीत झोप घेऊन जंगलातील फळे किंवा जनावरे ठार मारून त्यांचे मांस ओरबडून खाल्ल्यावर, गुडघेमेटी होऊन, हात टेकून कुत्र्याप्रमाणे चटाचटा पाणी पीत असतील. प्रजोत्पादनास पशुपक्ष्यांना जन्मदात्यांची ओळख नसून वय व नाते यांचा गुंता नसतो. अशाच प्रकारची पशुवृत्ती प्राथमिक अवस्थेत

मानवांची असून माता-पुत्र, पिता-कन्या, ही जोडपी एकमेकांस अलिंगून रतिसुख घेत असतील. युरोपातील मोठेमोठे इतिहास संशोधक सांगतात, प्रारंभीचा माणूस पशुपक्ष्याप्रमाणेच उघडा, नागडाच फिरत असे. त्यास त्याची लाज वाटत नव्हती. पशुपक्ष्यांत व मानवात खाणेपिणे, झोप घेणे, जीव रक्षणे व कामेच्छा तृप्त करणे ही स्वाभाविक लक्षणे समान असलेविषयी एका श्लोकात म्हटले आहे की

आहारनिद्राभयमैथुनंच ।
सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम्॥
ज्ञान नराणामधिको विशेषो ।
ज्ञानेनहीना: पशुभि: समाना:॥

याचा अर्थ असा आहे की, खाणे-पिणे, झोप, भय आणि मैथुन ही मनुष्यास व पशूस सारखीच आहेत. मनुष्यास ज्ञान काय ते विशेष आहे म्हणून तेवढे नसल्यास ती पशूप्रमाणे होत. पशुपक्ष्यास उपजत बुद्धी असून आपले मनोभाव प्रगट करण्याची साधने आहेत. किड्यांची भाषा म्हटली म्हणजे स्पर्शेंद्रियाच्या खुणा होत. मुद्रा व चलनवलन ही केवळ त्यांची सहज भाषा असून जनावरांची व पक्ष्यांची वेगवेगळी भाषा आहे. अशा तऱ्हेचा शोध बार्करने लावला आहे. मनुष्याची प्रारंभीची भाषा पशुपक्ष्यासारखीच विशिष्ट आवाजाची व नियमित स्वर आणि शब्द यायोगे एकमेकांचे मनोभाव प्रगट करीत असतील. परंतु मानव प्राण्यांची नवे नवे शोध घेणारी बुद्धी, पशूंची निर्बुद्धी बुद्धी, आणि सर्व सृष्टीची रचना या तिन्ही गोष्टीचा बारीक विचार केला असता इतर सर्व प्राणी मानव प्राण्याच्या कह्यात राहून त्यांच्या सुखोत्पत्तीस साधनभूत व्हावे व सृष्टीतील सर्व पदार्थ त्याचे सुखास कारणीभूत व्हावेत अशी निर्मिकाची योजना दिसते. सृष्टीतील एकंदरीत पदार्थ द्रव रूपाने अथवा करण रूपाने उत्पन्न केले असून कार्यरूपाने केले नाहीत. यास उदाहरण मनुष्याच्या उपयोगी पडणाऱ्या दळणाचे जाते. मातीची भांडी वगैरे जिनसा करण्यास दगड माती आदि करून द्रव्ये आहेत. पण कार्ये म्हणजे जाते, भांडी वगैरे जिनसा स्वत:सिद्ध उत्पन्न झालेल्या नाहीत. सृष्टीतील द्रव्यांचा अथवा पदार्थाचा हवा तो जिन्नस तयार करता करता मानवास पदार्थाचे धर्म, स्थिती, गति, महत्त्व समजून घेण्यास आजपावेतो हजारो बुद्धिमान व उद्योगी माणसांनी आपले आयुष्य खर्ची घातले आहे. या लोकांच्या अवुभवसिद्ध ज्ञानाने व प्रयोगसिद्ध

सिद्धांताने भौतिकशास्त्र तयार झाले. तसे पशूला करता येत नसून हाच भेद पशूत व मानवात आहे.

### ३. रानटी अवस्थेतील मानव

मानवप्राणी रानटी स्थितीत असताना त्यास शस्त्रास्त्रे व वस्त्रे प्रावरणे तयार करण्याची माहिती नसल्यामुळे आपल्या दाढ्या, डोक्यांच्या झिपऱ्या, जटा लोंबत सोडून हातापायांची लांब लांब नखे वाढवून निव्वळ नागवे, उघडे फिरत असेल. त्यास मातीची अथवा धातूची भांडी करण्याची माहिती नसल्यामुळे पाण्याच्या कडेला गुडघेमेटी होऊन जनावराप्रमाणे पाण्याला तोंड लावून अथवा हाताचे ओंजळीने पाणी पिऊन आपली तहान भागवीत असेल. त्यास तवे व जाती घडण्याची माहिंती नसल्यामुळे पिठाची भाकरी किंवा चपाती मिळत नसेल. त्यास मेलेल्या मेंढराची कातडी सोलून काढण्याची माहिती नसल्यामुळे त्यास बिनवहाणाने अनवाणी हिंडावे फिरावे लागत असेल. तो रानटी अवस्थेत असल्यामुळे आपल्या स्वत:च्या जगण्यासाठी व सुखासाठी दुसऱ्या निर्बल मानवास ठार मारून आपली भूक शमवीत असेल. त्यास दया, माया वगैरे काही माहीत नसल्यामुळे स्त्रीचा पाठलाग करून तिला पकडून, तिच्यावर बलात्कार करून मैथुन सुख घेत असेल. लांडगा शेळीचा काळ असतो. त्याप्रमाणेच रगदार मानव दुर्बल मानवांचा काळ असे. एकंदरीत सर्व मानवजात एकाच वंशाची असून त्यांना गोतावळा म्हणजे काय हे समजत नव्हते.

कबिला हा शब्द तयार झाला नव्हता. यामुळे ज्या मानवाने जिच्या पोटी जन्म घेतला तिच्याशी संबंध ठेवून तिला जी संतती निर्माण होई त्या संततीशीही रत होऊन कामसुख मनमुराद घेत असे. यावरून फार प्राचीन काळापूर्वी मानवामध्ये आई-बाप, बहिण-भाऊ, नवरा-बायको ही नाती तयारी झाली नव्हती. ही नाती अद्यापि पशुपक्ष्यांना बिलकुल माहीत नव्हती. या लोकांची सुधारणा करण्याकरता दयाळू व परोपकारी इंग्रज भट आज प्रयत्न करीत आहेत व त्यांना इंग्रज सरकार प्रोत्साहन देत आहे.

### ४. मानवाची सुधारणूक

मानवप्राण्याची बुद्धी पशूसारखी निर्बुद्ध व क्रमयुक्त चालणारी नसून ती

तीक्ष्ण व गतिमान असल्यामुळे त्यास कोणत्याही करणीचा सारासार विचार करता येतो आणि याच विशेष गुणामुळे तो सुधारणुकीच्या मागे लागून सुधारू लागला. एक जातीय पशु कळप करून राहतात व एक जातीय पक्षी थव्याने फिरत असतात. हे पाहून मानवप्राणी टोळी करून राहू लागला. सृष्टीतील पदार्थ, पशुपक्षी, पाण्यातले मगर, मासे वगैरे प्राणी हेच खरे मानवप्राण्याचे गुरू. त्याने प्रत्येकाला नावे दिली. पुढे यातूनच मानव टोळीची भाषा उत्पन्न झाली. दुसऱ्या टोळीची दुसरी भाषा असेल. यावरून मानवाने प्रथम काय उत्पन्न केले असेल तर ती भाषा होय. आपल्या तोंडातून ध्वनी उमटणे ही स्वाभाविक क्रिया असून त्या ध्वनीतून निरनिराळे आवाज उच्चारून शब्द तयार करणे ही मानवकृती आहे. हरणाच्या कळपात ५-२५ माद्या व २-४ नर असतात. त्याचप्रमाणे मानव प्राण्यात ५-२५ नारी व २-४ नर असून ते एकजुटीने टोळीत राहून सामुदायिकरित्या शिकार करीत असतील व शिकारीची वाटणी समसमान करीत असतील. ते रात्रीच्या वेळी समुदायाने राहण्यासाठी रानावनात किंवा डोंगरपठारीत काट्या-कुट्याच्या झोपड्या बांधून राहात असतील. ही मानव टोळी चुकून दुसऱ्या जंगलात शिकारीस गेली असेल तेथे आपल्यासारखीच मानव टोळी पाहून त्यांना नवल वाटून त्यांनी तेथील टोळीवर हल्ला केला. या लढाईत त्यांनी तेथील टोळीचा पराभव करून त्या टोळीतील नारी व नर पकडून आणले. २-४ देखणे, तगडे नर ठेवून बाकीच्या नारी, नरांना ठार करून खाऊन टाकले असेल. लढाईची कला एव्हापासून सुरू होऊन संघटित राहून एवढे मोठे वाघ, सिंह क्रूर व शूर असतानाही मानवांनी त्यांची चटणी करून टाकली. मनुष्यप्राणी उत्तम तऱ्हेने शिकार करू लागला. शिकारीच्या निमित्ताने टोळ्या-टोळ्यांची लढाई होऊन जी टोळी हरे, त्या टोळीतील पुरुष व स्त्रिया पकडून आणल्यावर व देखण्या तरुण नराबद्दल त्या टोळीतील स्त्रियांत मत्सर उत्पन्न होऊ लागल्याने टोळीतील राणीला काही तरी बंदोबस्त करणे भाग पडून तिने काही नियम घालून आपल्या टोळीत प्रचारात आणले असतील. यावरून रानटी अवस्थेत असताना मानवप्राण्याने एकमेकांशी बोलाचाली करण्यासाठी भाषा, खाण्यापिण्यासाठी शिकारीची कला, निवांतपणे झोपण्यासाठी जवळजवळ उभारलेल्या भक्कम झोपड्या, शत्रूच्या भयामुळे त्याने शत्रूस तोंड देण्यासाठी आपल्या टोळीची केलेली एकजूट आणि स्त्री-पुरुषांना मनसोक्त मैथुनसुख घेता यावे म्हणून प्रचारात आणलेल्या रूढी, वगैरे

गोष्टी मानवप्राण्याने स्वत: जगण्यासाठी व सुख भोगण्याकरता रानटी अवस्थेत शोधल्या.

जंगलास वणवा लागलेला पाहून त्याने विस्तव तयार करण्याचा शोध लावून त्यावर शिकार करून आणलेल्या प्राण्यांना पक्के भाजून त्याचे मांस खाऊ लागला. विस्तवाच्या शोधामुळे प्राचीन माणूस झपाट्याने सुधारू लागला. तो दगडाची अणकुचीदार हत्यारे बनवून शिकार करू लागला व शत्रूशी झुंजू लागला. लवकरच त्याने भांडी तयार करून त्यात खाण्याचे पदार्थ शिजवून तो खाऊ लागला. अशा प्रकारे तो दिवस काढीत असताना त्यास अचानक धान्याचा शोध लागल्याने शेती करू लागला. शेती सोयीची पडावी म्हणून ती मानवटोळी शेतीजवळच वस्ती करून राहू लागली. वस्तीने व्यापलेली जमीन समाईक गावची असून तिला पांढरी असे म्हणतात व अन्नधान्याचे पीक काढणाऱ्या जमिनीस काळी असे नाव असून तिच्यावर गावात राहणाऱ्या सर्व लोकांचा समान हक्क असे. काही आर्यभट म्हणतात, प्राचीन काळी गौरवर्णाचे पोपटी नाकाचे आर्य आले व गावात राहू लागले व त्यांनी गावातल्या लोकांस हुसकून लावले. गावात राहणारे आर्य असल्यामुळे तिला पांढरी म्हणतात. त्यांनी गावकऱ्यांना जिंकून दास करून त्यांचेकडून शेतीची कामे करून घेऊ लागले. हे दास काळे असल्यामुळे शेतील काळी म्हणण्याची त्यांनी वहिवाट पाडली. पण ही फुशारकी असून गाव हे पांढर रानात पांढऱ्या मातीनेच बांधण्यात येत असल्याने व शेती ही काळसर व थोडी तांबसर रंगाची असल्यामुळे त्यांना अनुक्रमे पांढरी व काळी ही नावे मिळाली.

### ५. बळी राजाचे बलिस्थान

हिंदुस्थान देश इंडियन मानव-वंशाचे उत्पत्तिस्थान असून फार प्राचीन काळी तेथे अखंड असलेल्या मानवसमाजाच्या अनेक टोळ्या राहात होत्या. आज ज्यांना शूद्रातिशूद्र म्हणून ओळखले जाते ते तेथील मूळचे रहिवाशी असून रानटी व क्रूर असलेले इराणी आर्य ब्राह्मणादी विप्र म्हणजे विपरित लोकांपेक्षा अधिक सभ्य, सुविचारी व सुधारलेले असून त्यांनी आपल्या स्वदेशात म्हणजे बलिस्थानात ठिकठिकाणी गावे स्थापून स्वातंत्र्याचा सुखाने उपभोग घेत होते. त्यांची स्वतंत्र राहण्याची प्रवृत्ती व शत्रूपासून बचाव होण्यासाठी घेत असलेली तत्परता या

दोन कारणांनी त्यांच्या अनेक टोळया आल्या. त्यांचेच हल्लीचे अवशेष म्हणजे कोलमुड, मालरह, महार, नांग, संताळ, गोंड वगैरे जाती असून गावकारणाने या इंडियन वंशात महार, सोनार, सुतार वगैरे व्यवसायभेद उत्पन्न झाले. कोलीचन ही एक इंडियन महावंशाची शाखा असून या शाखेतील लोकांची वस्ती छोटा नागपूर, विंध्यपर्वत, कोल्हापूर या भागात आढळते. ह्या लोकांची स्वतंत्र भाषा असून खेड्यास हे खेडे ज्या जमिनीत बसले तिला मांकी व शेत मंडी हे शब्द असून त्यांचे अर्थ मांकी म्हणजे पांढरी व मंडी म्हणजे काळी असे आहेत. हे गावकरी पांढरीत राहून रानात जाऊन शेती करीत. या सर्व इंडियन लोकांना क्षत्रिय हे उपपद असून त्याविषयी सर्वांना अभिमान वाटत असे. इंडियन लोकांचा म्हणजे हल्ली ज्यास शूद्रादी अतिशूद्र म्हणतात त्यांच्या मूळ दंतकथा, मूळ रीतिरिवाज यांच खोलवर तलाश घेत गेल्यास त्यांच्या पूर्वजांचा इतिहास मिळतो. गावगन्ना क्षत्रिय लोक असून ते सारे एकमेकांचे बंधू लागत होते. त्यांच्यात उच्चनीच असा भेदाभेद नसून त्यांच्या प्रत्येक गावाला समता, स्वतंत्रता व समाधानता या त्रैसिद्धीमुळे सुख आणि आनंद याचा लाभ होत असे.

हरएक खेड्यात महार, कुणबी, माळी, रट्ठ आणि धनगर, क्षत्रिय, शेतकरी, असून ते बलीभक्त असल्यामुळे दरसाल आपल्या खेड्यास बरकत यावी व बलीने खेड्यातील प्रत्येक माणसास दीर्घायुष्य देऊन सुखी ठेवावे या हेतूने गावातील सारी रयत मिळून बळीयज्ञ करीत. हे पाच क्षत्रिय पांढरीत राहून काळी कसून धान्याचे उत्पादन काढीत. गावात कुंभार, लोहार, सुतार, न्हावी, धोबी हे पाच बलवंत. बलवंतचा अपभ्रंश बलुते असून त्यांचे महत्त्व फार असे. प्रथम प्रत्येक गावात सारे क्षेत्रवासी रयतेचा एकच समूह असून ते आपणास क्षत्रिय म्हणवून घेत. पुढे त्यांच्यात जसजशी सुधारणा होत गेली तसतसा गावचा कारभार चौखट होऊन त्यामुळे गावात कुणबी सभा, बहतीसभा व रयतसभा अशा तीन सभा स्थापून त्या सर्वांच्या मताने गावगड्याचा कारभार चाले. यालाच ग्रामपंचायत म्हणतात. ही पंचायत रयतेचे राज्य असून ती सारी बलवंत असल्याने तिच्या गावराज्यास ''बळीराज्य'' म्हणत. अशा प्रकारे बळीराज्य हिंदुस्थान देशात गावगन्ना असल्याने या देशाला बलिस्तान हे नाव पडले. या अफाट बलिस्तानात प्राचीन काळात जे राज्यकर्ते होते ते म्हणजे सांप्रतचे कुणबी, मराठी, माळी वगैरे शूद्र व महार, मांग, चांभार वगैरे अतिशूद्र लोकांचे पूर्वज होते. याचा तुम्हाला अभिमान वाटायला

पाहिजे; हे सांगायला नको. आपल्या भावी सुधारणेत या इतिहासाची आवश्यकता असून आणि तो असल्यावाचून पुढे पाऊल टाकता येत नसून भूतकाळातील आपल्या पूर्वजांचा पुरुषार्थ व वर्तमान काळातील आपले नीचत्व यांची पक्की ओळख झाल्याशिवाय आपणास इष्ट सुधारणा करता येणार नाही.

# २

# इतिहास

### १. बहामनियन नाईट्स

भूतकाळात घडलेल्या घडामोडी, त्या कशा घडल्या, कोठे घडल्या, का घडल्या व केव्हा घडल्या, त्यापासून बढतीची स्थिती आली का गळतीची स्थिती आली याची एकंदर हकीगत गोळा करून ज्या ग्रंथात मांडलेली असते त्यास नामा बखर ही नावे असून भट भाषेत इतिहास पुराण असे नाव आहे. तथापि जगातील मानवाच्या गतकालात बऱ्या व वाईट घडलेल्या सत्य गोष्टींचे दर्शन ज्या ग्रंथाने होते त्यास इतिहास म्हणतात. भट लोक इतिहासास उपपुराण समजत असून मागे असे असे घडले याविषयी गवशानी थापिष्ट कथा व गप्पीष्टक गोष्टी रचून ठेवलेल्या. राजाला पुरोहिताने सांगाव्यात त्यास आधार तोच. थापाड्या पुरोहित किंवा त्याचा गप्पाड्या ऋषी हेच गुरू होते. पुरोहित व ऋषिगुरू बढाईखोर असल्यामुळे त्यांच्या पुराणांना इतिहास म्हणता येत नाही. याविषयी इतिहास तलाशी अमेरिकन आणि युरोपियन लोकपुराणांचा तलाश घेऊन असा निर्वाळा देतात, की पुराण ही निव्वळ मतलबी पुस्तके असून त्यात ब्राह्मण लोकांचा महिमा सांगून तो लोकांच्या मतावर ठसवून ब्राह्मणास ईश्वरापेक्षा भूदेव श्रेष्ठ समजून त्याची पूजा-अर्चा करावी अशी शिकवण दिली आहे.

यास्तव, असा तर्क संभवतो की, प्राचीन पुराणात अल्लारशीनी अनेक दंतकथा व कल्पित गाथा रचून त्या घुसडून त्याचा चिवडा बनवून टाकला आहे. त्यांनी ब्रह्माविषयी अनेक कल्पित गोष्टी रचून व त्या ब्रह्मानेच सांगितल्या आहेत; असा जित लोकांच्या मनावर ठसा उमटावा म्हणून त्यांनी शेषशायीचे दुसरे एक आंधळे भारूड रचले आणि त्याविषयी इराणी आर्य ब्राह्मणांनी जित लोकांस ग्रंथात सांगितल्याप्रमाणे वागण्याचा उपदेश केल्यामुळे ब्रह्मपुत्र स्वतःस जेते समजून जित

मानवाचे भूदेव होऊन त्यास जनावरासारखे मानू लागले. आपले हे ब्रह्मकपट जित लोकांच्या ध्यानात येऊ नये याकरिता अथवा त्या ग्रंथात पाहिजे तसे फेरफार करता यावेत, गुलाम लोकांना मुळीच ज्ञान देऊ नये. असा धार्मिकपणाचा डौल घालून त्यास धर्मग्रंथ वाचणेची मनाई केली. आपल्या आर्यभटादी जातीशिवाय वेदादी धार्मिक ग्रंथांचा मुखडा कुणास दाखवावयाचा नाही असे वाचाळ व मूर्ख ब्राह्मण म्हणत असून त्यांचेच शास्त्र असलेले जातभाई परधर्मी, इंग्लिश, फ्रेंच, जर्मन वगैर शोधक, म्लेंच्छानी द्रव्याची लालूच दाखविली की, सारे धर्मनियम व धर्मरूढी गुंडाळून आपले धर्मग्रंथ त्यांच्या हवाली करतात. याचीं भटभिक्षुकांना बिलकुल लाज वाटत नाही. भटभिक्षुकांची पुराणे ही इतिहास नसून त्यास अरेबियन् नाईट या नावासारखेच बहमनियन नाईट हे नाव चांगले शोभेल.

**२. खोटा इतिहास लिहिणारे भट**

पुराणे, कादंबऱ्या, काव्य, नाटके, प्रहसने, लळीत, लावण्या, पवाडे, मनोरंजक गोष्टी वगैरे वाङ्मयाचे प्रकार असून त्यात चरित्र ही उद्बोधक व उपयुक्त असून त्यांच्या वाचनाने व मननाने बुद्धीच्या कुप्या भरून त्या आनंद सागराकडे जाऊ लागतात. चरित्रे ही वाचकास सन्मार्गाला लावतात अशा अनेक शिष्ट, पुष्ट व दुष्ट लोकांच्या चरित्राचा एक उत्तम संग्रह यालाच इतिहास म्हणता येईल. त्यात पुराणातील देवदेवतांच्या अद्भुत पराक्रमाच्या व अघटित चरित्राच्या विलक्षण हकिगती नसून प्रत्येक गोष्ट सत्य असते.

इराणी आर्य ब्राह्मणात पायलीचे पंधरा व आधोलीचे सोळा अशी रगड खोटे रेकॉर्ड करून ठेवण्याच्या वडिलोपार्जित सवयीने विद्वान, शास्त्री, पंडित, ऋषी म्हणवून घेणाऱ्या इतिहास म्हणूंन पुराणे लिहिणाऱ्या इतिहासकाराने जुन्यात नवे, नव्यात जुने असा जुन्या नव्याचा एकमेकाशी सरासरी मेळ घालून भारेचे भारे पुराणे बनवून त्यात येथील जित् लोकांना नीच व इराणी, हूण वगैरे आर्य भटांना उच्च लेखून जिंकलेल्या इंडियन लोकांच्या दास्यत्वास साक्षात आदिनारायणाची संमती नमूद केली. पण हे भटांनी लिहिलेले ग्रंथ खोटे व अज्ञानभरित आहेत असे युरोपियन इतिहासकारांनी सिद्द केले आहे. मानवास खरा इतिहास आपल्या पूर्वजांची व त्यांच्या कार्याची माहिती देऊन त्यास स्वत्वाची जाणीव करून देतो. भटांची पुराणे ही आपले दास्यत्व ब्रह्मविहित आहे असे सांगून आमच्या मनास न्यूनगंड

निर्माण करणारी असल्यामुळे ती आपला इतिहास आहेत असे म्हणवत नाही. आजही जन्मजात सवयीमुळे भटलोक इतिहास लिहीत असतात.

### ३. बलिस्थानची सुधारणूक

जगातील कोणत्याही देशाची सुधारणा त्याच्या नैसर्गिक अनुकूलतेवर व तेथे राहणाऱ्या मानवजातीच्या बुद्धिमत्तेवर अवलंबून असून या तत्त्वानुसार आपला बलिस्तान देश सुधारणुकीच्या शिखरावर जाऊन पोहोचला होता. हा देश बलवंत बलुत्यांचा असून त्यास रानटी इराणी सप्तहिंदू, सप्त म्हणजे सात व हिंदू म्हणजे इंडि-सात बलाढ्य इंडिराजाचा देश; इंडि शब्दाचा अपभ्रंश हिंदू हा शब्द असून ग्रीक लोक त्यास इंडिस व पुढे इंडिका म्हणू लागले. इंग्रजांनी इंडियन लोकांचा खराखुरा देश म्हणून इंडिया हे नाव दिले. इंग्रज लोक ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या लोकांस नेटिव्ह म्हणजे शूद्र समजतात. शूद्र याचा अर्थ गुलाम व अतिशूद्र याचा अर्थ महागुलाम. ब्राह्मण शूद्र शूद्रादी अतिशूद्र नीच पशूसारखे मानतात. पण हे ब्राह्मण लोक आपल्या देशात येण्यापूर्वी आपल्या देशातील आजच्या कुणबी, माळी, मराठी, महार, मांग, कैकाडी, वगैरे लोकांचे एकच पूर्वज असलेले लोक सुधारणुकीचे सुख भोगीत होते. पृथ्वीतलावर असलेले सारे देश रानटी असताना आपला बलिस्थान देश सुधारणुकीच्या जोरावर आकाशाला गवसणी घालीत होता. त्याची सुधारणूक पाहूनच जगातील भिन्नभिन्न देश सुधारणुकीच्या मार्गाला लागले, असे युरोपातील इतिहासकारांचे मत आहे. त्यानंतर हजारो वर्षांनी ग्रीस देशात सुधारणूक झाली. त्या देशातील होमर नावाच्या कवीने इलियड व ओडिसी हे काव्यग्रंथ लिहिले व त्या देशाचा इतिहास हिराडटसने लिहिला. जगातला पहिला इतिहासकार हिराडटस हा असून युसिडीडीज हा दुसरा इतिहासकार असून याच्याप्रमाणे नावाजलेला इतिहास सॉक्रटीसचा शिष्य जिनोफन हा होय.

ग्रीस देशातील लोकराज्याचा नंदादीप विझण्याच्या काळात डिमॉस्थेनीस हा इतिहासकार झाला. मासिडोन देशाचा राजा फिलीफ याने सर्व ग्रीस देशातील लोकराज्ये जिंकीत असता त्यास डिमॉस्थेनिसने फार विरोध केला. पण अखेरीस फिलीप विजयी झाला. फिलीपच्या मुलगा अलेक्झांडर याने इजिप्त, इराण वगैरे देश जिंकून हिंदुस्थानवर स्वारी केली. ग्रीकच्या भरभराटीच्या काळात सॉक्रिटीस

प्लेटो, ॲरिस्टॉटल वगैरे विद्वान मंडळी झाली. अलेक्झांडरनंतर त्याच्या वंशजांनी एक शास्त्रीय शाळा उघडली होती. या शाळेत शिक्षण घेऊन युरोपातील कित्येक लोक शहाणे होऊन त्यांनी सुधारणुकीत भर घातली. याच शाळेत भूमितिशास्त्र बनविणारा युक्लिड, खगोल शोधणारा हिपारकस, वाफेने चालणारी गाडी तयार करणारा हेरो, हे लोक शिकून शास्त्रज्ञ बनले होते. ग्रीकमध्ये गुलाम व रोमन यांच्यात भांडणे लागून ग्रीस देशात अशांतता माजली. शेवटी ग्रीकांची सुधारणूक रोमी सुधारणुकीत विलीन होऊन तो देश रोमी लोकांचा बनला. या लोकांस ग्रीक लोक रानटी समजून त्यांची येथील इराणी ब्राह्मण जशी अवहेलना करतात त्याचप्रमाणे ते रोमी लोकांना हीन लेखून धिक्कारीत. पण याच रोमीनी ग्रीक येथील रानटी व दांडग्या गुलामांचे सहाय्य घेऊन ग्रीकची धूळधाम केली. ग्रीसीत लोकांचा रोमीन लोकांनी कित्ता घेऊन आपल्या साम्राज्यातील प्रजासत्ताक राज्यासंबंधाने एकंदर सर्व युरोप, एशिया व आफ्रिका या खंडांतील देशांत विद्या, ज्ञान व धन यांची वाढ करून प्रजेला सुख दिले की, त्यांच्यामध्ये लिव्ह, प्लूटार्क, टासिटस वगैरे इतिहासकार व नामांकित केटो, मेरीयास, सीझर, सिसरो वगैरै वक्ते होऊन ते आपल्या देशात श्रेष्ठत्व पावले. रोमीनांना कार्थेजी लोकांशी सतत झगडावे लागून आपले राज्य राखावे लागे. रोमीचा अनेक वेळा पराभव केला पण रोमी लोकांचे रणधीर व रणशूर महाप्रतापी सेनापतींनी हानीबालला (इ.स.पू. १४६) धूळ चारून कार्थेजी लोकांस यथास्थित शासन केले. इंग्लंड, स्पेनपासून, आशिया मायनरपर्यंत आफ्रिका खंडाचा, उत्तर किनाऱ्याजवळचे देश एवढा मोठा प्रदेस रोमीन राज्यात नांदत असून या लोकांनी इंग्लंड देश जेव्हा जिंकला; तेव्हा हल्लीचे इंग्रज लोक रानटी असून ते आपल्या गोऱ्या अंगाला कोळशाचा काळा रंग फासून त्यावर रंगीबेरंगी टिळे व पट्टे काढून कंदमुळे खात. या जंगली इंग्रज लोकांना रोमी लोकांनी सुधारणुकीचे धडे दिले. ते रोमी आपल्या हातात चारशे वर्षे छडी घेऊन आपल्या साम्राज्यातील लोकांस वस्त्रप्रावर्णाचा व भांड्याकुंड्यांचा उपयोग करण्याची माहिती देऊन त्या लोकास लोकसत्तात्मक राज्य करण्यास वळण लावीत होते. या रोमी लोकांच्या महाप्रतापी जुलियस सीझरने आपल्या एकंदर सर्व कारकीर्दीत अनेक देशांतील राजे-रजवाडे धुळीस मिळवून सर्वांवर वचक बसवून, आपल्या मूळ प्रजासत्ताक राज्यरूप मातेवर डोळा ठेवून, प्रजेला आपले दासानुदास करून डोक्यावर राजमुगुट धारण करण्याचा बेत केला व तो राजवाड्याकडे जावयास

निघाला. लोकसत्ताक राज्यनीतीवर ज्या ब्रूट्स्चा विश्वास होता तो जुलियस सीझरचा मार्ग रोखून उभा होता. इ.स.पू. २७ त्याने सीझरच्या पोटात खंजीर खूपसून त्याचा प्राण घेतला.

**४. ग्रीक रोमन आणि गुलाम**

सीझरचा पुतण्या ऑक्टेव्हिअन सीझर यास लोकांनी आगस्टस ही पदवी देऊन बादशहा बनवून टाकल्याने, सरदार दरकदारांची भालेराई सुरू होऊन प्रजासत्ताक राज्याची इमारत कोसळून बारा सीझरांच्या कारकीर्दीचे इ.स.४१० अखेरीस रोमन लोकांच्या वैभवाची राखरांगोळी झाली. रोमी पातशाहीचा फ्रँकन, जर्मन, ट्युटन वगैरे रानटी लोकांनी ज्याप्रमाणे इंडियन लोकांच्या बलाढ्य बलिस्थानचा रानटी इराणी ब्राह्मणांनी फडशा पाडून इंडियन सुधारणूक उचलली त्याचप्रमाणे जेत्या टोळ्यांनी रोमी सुधारणूक उचलली; पण त्यांना आपल्याकडील भटुकड्याप्रमाणे इंडियन सुधारणुकीस आपले नाव देऊन ती पुढे रेटीत रेटीत, आजपावेतो खरे पाहू गेल्यास जशी टिकविली; तशी टिकविता आली नाही. खरे पाहू गेल्यास ग्रीसन रोमन व त्यांना जिंकणारे रानटी सेक्सन, टलटन, फ्रेकन, जर्मन, इराण आणि ब्रह्मन हे फार वर्षापूर्वी एकाच कुळात जन्मले असून जन्मजात भटकेगिरी व लूटमार करण्यात प्रवीण, घुसखोरीत पटाईत असून एखाद्या देशात ते घुसले की, तो देश आमच्याच बापाचा समजून तेथील लोकांस गुलाम समजून मोठ्या तोऱ्याने व डौलाने राहात. या जातीपैकी इराणात राहणारे रानटी ब्रह्मन हे होते. यांच्याच रानटी भाऊबंदानी युरोपातील रोमीराज्य मोडून काढून साऱ्या युरोपभर धुमाकूळ घातला. त्यात मोगल, हूण, तार्तर या रानटी टोळ्यांनी सारा युरोप जाळून पोळून त्याची राखरांगोळी करून धुडगूस घातला. सर्व सुधारणुकीचा लोप होऊन आख्खा युरोप अज्ञान, दारिद्रय यायोगे पिचून गेला. ग्रीसन व रोमन लोकांचे शिखरावर पोहोचलेले वैभव कोसळून तेथील लोक सुधारणुकीतून पतन पावून रानटीपणाच्या दरीत फेकले गेले. या इतिहासावरून मनाला असा बोध होतो की, कोणत्याही देशाचे वैभव व त्याची सुधारणूक चिरकाल टिकून राहात नसून त्या देशाला केव्हाना केव्हातरी नीचत्व प्राप्त होते. ते नीचत्व कायम राहणारे नसून त्या त्या देशास पुन्हा उच्चत्व स्थापता येणे संभवनीय असते, असे आजच्या इतिहासावरून सांगता येते.

### ५.बळीराज्य येईल तेव्हा

अहो, कुणबी, माळी, मराठी, महार, मांग, कैकाडी वगैरे जातीचे पूर्वज हे प्राचीन काळात एकाच कुलाचे असून ते महाप्रतापी व विख्यात राज्यधुरंधर बलिस्थानाचा कारभार सुखाने करून साऱ्या जनतेला सुधारणुकीविषयी फूस देऊन रयतेला आनंद देत होते. त्याच वेळी सारे बलिस्थान वैभवाने सुख भोगीत होते. पण आज त्याचे वंशजास शत्रुत्व प्राप्त होऊन दुःखे सहन करावी लागत आहेत. पण त्याबद्दल हाय मोकलून स्वस्थ बसून आपली दुःखे दूर होणार नसून ती नाहीशी करण्यासाठी आपण कमरा बांधून उद्योगास लागले पाहिजे. महार, मांग, हे लोक अस्पृश्य नसून भटभिक्षुक अस्पृश्य आहेत. ब्राह्मण लोक हिंदू म्हणण्याचा बहाणा करीत असून त्यांचा धर्म त्रैवर्णाचा असून शूद्र म्हणजे रयत होय. ती हिंदू असून इंडियातील आहे. पावणेतीन हजार वर्षापूर्वी शूद्रराजा चंद्रगुप्त हा महाप्रतापी राजा होऊन गेला. त्याच्या येथे मॅगेस्थिनीस नावाचा ग्रीक लोकांचा वकील असून त्याने हिंदुस्थानची सविस्तर माहिती लिहून त्यास इंडिका इतिहास असे नाव दिले होते. त्याने अनेक लेख लिहून ठेवले असून त्यावरून त्या वेळच्या इंडियन लोकांची माहिती मिळते. तो एके ठिकाणी असे म्हणतो की, "इंडियन व त्यांच्या इंडिका देश हा कोणी जिंकला आहे हे खरे नसून ते युद्धात जिंकले गेलेले लोक नाहीत." मॅगेस्थिनीसचे हे म्हणणे सत्य असून इराणी ब्राह्मवादी विप्रांच्या स्वारीनंतर ग्रीक, इराणी, तुर्क, हूण, तार्तर, मोगल, पठाण, मुसलमान वगैरे लोकांच्या स्वाऱ्या व इंग्रज लोकांच्या स्वारीपर्यंत परकीय रानटी लोकांनी मिळविलेले जय विशेष महत्त्वाचे नसून प्रारंभी इराणी भटाब्राह्मणांनी केलेली स्वारी ही महत्त्वाची असून, त्यामुळे येथील लोकांस आजपावेतो त्याचे गुलाम होऊन राहावे लागले. त्याची ही गुलामगिरी नष्ट करणेची संधी त्यास इंग्रजांच्या स्वारीमुळे प्राप्त झाली. म्हणोन तीही फार महत्त्वाची व शुभ होय. रानटी आर्य ब्राह्मणादी विपरित विप्र काही वर्षे इंडियन लोकांवर राज्य करू लागल्यानंतर त्यांनी स्वहिताचे ब्राह्मणांकरता एक व येथील जिंकलेल्या लोकाकरता एक असे कायदेकानून करून ते त्यांच्यावर जुलमाने लादून त्यांना शूद्र, याचा अर्थ नीच, अतिशूद्र याचा अर्थ परम नीच मानून बलिस्तानात पक्के बस्तान बसविले. पण कालांतराने ते ज्या इराणातून आले त्याच देशातून येणाऱ्या रानटी लोकांनी आर्यब्राह्मणांना स्वस्थ बसू दिले नाही.

शक, कुशान, इराण वगैरे लोकांनी हिंदुस्थानातील ठिकठिकाणी असलेल्या

राज्यांवर चौफेर हल्ले सुरू करून त्यांना जेरीस आणून त्राहि भगवान करून सोडले, पण धूर्त आर्यभटांनी त्यास बाटगे आर्य बनवून टाकून आपल्यात सर्ते करून घेतले. पुढे तर मुसलमानांच्या स्वाऱ्यामुळे त्यांची चंगळ होऊन कोणी पेशवे तर कोणी कारभारी तर कोणी पंतोजी बनून मुसलमांनाकडे, जी ही हूजूर करीत चाकरी करून आपली पोटे भरू लागले. पण यांच्या बापजाद्यांनी ज्या इंडियन वंशाच्या प्रतापी थोर लोकांवर शूद्रादी अतिशूद्ररूपी गुलामगिरी लादली ती आजपावेतो टिकून धरून कितीक राजे आले आणि मेले. कित्येकांना म्हसनवटीत पुरले आणि जाळले. तरी भटांनी आपली पकड जराही ढिली पडू दिली नाही. ती आजपावेतो जशीच्या तशीच आहे. आर्यभट लोकांनी इराणातून येऊन येथील दैत्य राक्षस मारून मोठमोठे पराक्रम ब्राह्मणांनी केले हे पुराणात वाचायला मिळून कथाकीर्तनातही ऐकायला मिळते. पण हा भटांचा इतिहास असत्य असून, असत्य ज्ञान अज्ञानापेक्षाही भयंकर वाईट असून ठाऊक नसलेल्या वाघाच्या गुहेत शिरून तिचा शोध घेण्यात आपली प्राणहानी करण्यासारखे होय. भटांनी लिहिलेली पुराणे भटांचा इतिहास असून त्यात सत्याचा लव आहे. हे कोणालाही सिद्ध करून दाखविता येणार नाही. शूद्रादी अतिशूद्राचा म्हणजे येथील इंडियन लोकांचा खरा इतिहास अद्याप कोणी शोधून लिहिला असला तरी तो इराणीभट जसे मूळ इराणी रक्ताचे आढळत नाहीत, त्याप्रमाणे इंडियन लोकांचा मूळ इतिहास आपल्याला वाचावयास मिळत नाही. पण त्यांना त्यांच्या डोळ्यासमोर गेली दोन हजार वर्षांची ब्राह्मणादी राजेरजवाड्याची सौदेगिरी व दडपेगिरी असून ती त्यांनी हूं की चूं न करता सहन करून ते जगले. यातही त्यांचा फायदा असून ज्याप्रमाणे एखाद्या पेरूच्या बागेतील झाडांना ताव दिल्यानंतर खतपाणी घातले, तर ती बाग जशी फुलते त्याप्रमाणे शूद्रादी अतिशूद्रास ताव मिळाला असून त्यास ब्रिटीश अमदानीत विद्यारूपी खतपाणी मिळून शूद्रादी अतिशूद्रबाग जोमाने फोफावून डौलदार होईल. मग स्वप्नात प्रेमी धूर्त आर्य-धर्मलंड भिक्षुकास भट्टा, मांग, कुणबी, मराठी, माळी यांना शूद्र म्हणून नीच म्हणण्याची जुर्रत होणार नाही. त्यावेळी शूद्रादी अतिशूद्र विद्या संपादन करून ते आपल्या इंडियन पूर्वजाप्रमाणे हिंदुस्थानात लोकसत्ताक बळीराज्य स्थापन करून राज्यकारभार करू लागलेले दिसतात असे मी खात्रीपूर्वक भविष्य करतो.

# ३

# सुधारणूक

**प्राचीन काळचे आपले थोर पुरुष**

शूद्रादी अतिशूद्रानो! आपण सारे एकाच वंशाचे असून आपल्या बलिस्थानात जेव्हा गावे उभारली तेथे कालांतराने ग्रामपंचायती स्थापन होऊन तिच्या गरजेप्रमाणे महार, लोहार, सुतार, सोनार, पोतदार, वाघार, रावणार, वर्तणार, पाथार, खात्यार, चांभार, लोणार वगैरे व्यवसाय उत्पन्न होऊन ते करणाऱ्या लोकांना पुढे पुढे ती नावे रूढ होऊन गेली असली तरी त्यांच्यात तिळमात्र भेद पडला नसून ते सारे एकाच इंडियन रक्ताचे व इंडियन वंशाचे अस्सल शंभर नंबरी आहेत. ते सारे प्राचीन काळ्या इंडियन लोकांचे वंशज होत. ते ब्राह्मणासारखे द्विज व त्रिज असे असून एक जाती किंवा एक गोत्री असून प्राचीन काळापासून त्यांच्यामध्ये चर्षणी, क्षित, विश, कृष्टी, गिर असे गावगाड्याच्या व्यवस्थेमुळे पाच भेद असून चर्षणी म्हणजे गावकामगार व गावकुलाकार, क्षित-घरे करून राहणारे, विश-गावाबाहेर जाऊन दुसऱ्या गावात आपल्या गावचा माल विकणारे, कृष्टी याचा अर्थ महार असून ते शेती करणारे, गावच्या वनात अथवा डोंगरात राहून तेथेच शेती करून उपजीविकां चालविणारे, गिरी; असे पाच भेद असून त्या सर्व भेदाच्या शब्दांचा अर्थ क्षत्रिय, मानव, रयत असा आहे. बलिस्थानातील हे क्षत्रिय लोक आपल्या आई-वडिलांचा कित्ता घेऊन आपल्या रूढीत लाईक फेरफार करून कालगतीबरोबर मजल दरमजल करीत सुधारणुकीची फळे उपभोगीत होते.

सुधारणूक या शब्दाला इंग्रजी भाषेच सिव्हिलीझेशन हा शब्द असून या शब्दाने मानवाने आपल्या सर्वांगीण उन्नतीसाठी केलेली धडपड असा व्यापक बोध असून सृष्टीच्या उत्पत्तिकाळापासून तो आजपावेतो त्याने आपल्या सुखासाठी आणि जगण्यासाठी जी काही मेहनत घेऊन प्रयत्न करून आपली सर्वांगीण प्राप्ती केली

तिलाच सुधारणूक म्हणतात.

आहार, निंद्रा, भय, मैथुन या चार जीव वृत्या सर्व प्राणिमात्रांना असून त्यात आपणास अधिक सुख व अधिक आयुष्य लाभावे या स्वाभाविक इच्छेने ते सतत धडपडत असून त्यात मनुष्यप्राण्याने अभूतपूर्व यश मिळवून एकंदर सर्व प्राणीमात्रावर व सृष्टीक्रमावर वर्चस्व स्थापन केले. अशा प्रकारचे वर्चस्व इतर प्राणिमात्रावर स्थापन करता येत नसून त्यास त्यांची बुद्धीलटा अंगबठा यांची प्रतिकूलता असल्यामुळे मनुष्येत्तर प्राण्यास मानवप्राण्यासारखे कर्तृत्व व्यक्त करता आले नाही. मानवाचे कर्तृत्व हे ईश्वरकृत नसून ते त्याच्या दीर्घकालीन अनुभवाने दीर्घदर्शी प्रयत्नाने आणि तीव्र बुद्धिमत्तेने केलेल्या सुधारणुकीचे फलित होय. पशुपक्ष्यांना आपल्या आहारात बदल करावसा वाटत नाही. मनुष्य प्रथम कच्चे मास व फुले खात होता तो आज नानाप्रकारची पक्वान्ने बनवून सुंदर ताटात थाटामाटाने जेवतो. पशुपक्ष्यांचे पूर्वज जसे झोपत होते, तसे आज त्यांचे वंशज झोपतात. मनुष्यप्राणी पूर्वीच्या माणसाप्रमाणे झाडाच्या खोलीत किंवा गुहेत न झोपता सुंदर इमारतीत तो झोपू लागला. प्राचीन काळच्या पशुपक्ष्यांना जे भय होते तेच भय आजच्या पशुपक्ष्यांना वाटते. मनुष्यप्राणी बंदुका, तोफा बनवून निर्भय होऊ पाहतो. मैथुनसुखासाठी त्याची पशुपक्ष्यांसारखी परंपरागत रीत नसून त्यातही त्याने बदल करून आपल्या सुखात वाढ केलेली आहे. सारांश, पशुपक्ष्यांच्या आहार, निंद्रा, भय, मैथुन या स्वाभाविक गोष्टीचा मुळचा पणा होता तसाच आहे. त्याप्रमाणे माणसाचा मूळचा स्वभाव जसा अडाणी होता तसा राहिला नसून त्यात पुष्कळ सुधारणूक झाली आहे. प्राचीन काळी इंडियन लोकांच्या सुधारणुकीचे प्राचीनत्व आजच्या शूद्रादिअतिशूद्रांच्या चालरीतीचा व आचारविचारांचा खोलवर तलाश घेत गेल्यास ते सिद्ध होते.

**अडाणी आर्यन टोळ्या**

आपल्या बलिस्थानात आर्यन भट घुसण्यापूर्वी येथील क्षत्रिय लोक आनंदात व सुखात राहात असून प्रत्येकजण नीतीधर्म पाळून एकमेकांशी बंधुभावाने वागून गुणवान, शीलवान व ज्ञानवान स्त्रीपुरूषास उत्तेजन देऊन निर्बल व अबल मानवावर खट व उद्धट भटाप्रमाणे अत्याचार व व्यभिचार न करता आपल्या बळाचा व ज्ञानाचा उपयोग परोपरकाराकडे करीत असे. येथील सर्व लोकांना समता, स्वातंत्र्य,

बंधुत्व या मानवधर्माच्या महान तत्त्वांचे बाळकडू मिळत असल्याने त्यांची प्रत्येक पिढी उत्तरोत्तर शहाणी व बलशाली निपजून ती प्रगतीचा मार्ग आक्रमीत बलिस्थानच्या सुधारणेत भर घालीत असे. हे क्षत्रिय त्यांच्या ठायी धाडस, साहस, शौर्य, प्रामाणिकपणा, भूतदया वगैरे गुण वास करीत असून त्यांच्या सर्व देशांतील खेडोपाडी बळीराज्याच्या तत्त्वावरून स्वावलंबी व स्वायत्त लोकसत्ताक राज्ये चालू असून त्या राज्यात चोरी, शिंदळकी, दरोडेखोरी, वाटमारी, फंदफितुरी वगैरे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगार लोकांस देहदंडाची शिक्षा मिळत असे. तेथील लोकामध्ये ग्रीक, रोमन लोकांसारखी दुसऱ्या मानवास पकडून किंवा बाजारात विकत घेऊन त्याच्याकडून गुराढोरासारखे काम करून घेणेची रीत किंवा दुसऱ्याच देशावर स्वाऱ्या करून तेथील लोकांना गफलतीने व मायावी रीतीने जिंकून त्यांना शूद्रादी अतिशूद्र म्हणून पशूसारखे वागविण्याची आर्यभटासारखी वहिवाट नव्हती. यावरून येथील प्राचीन इंडियन लोक सभ्य व सज्जन असून सुधारलेले होते याचे दाखले भटा-भिक्षुकांनी पुराणादी बनवलेल्या खिचडीतही सापडतात.

प्राचीन काळी इंडियन लोक छोटी मोठी गावे बसवून राहात असून लंका, त्रिपुरा यासारखी सुवर्ण नगरेही त्यांची होती. त्यांना सर्व गोष्टींचे ज्ञान असून ते कलाकौशल्याची कामेही करीत असत. ग्रहांचे वेध घेणे, ग्रहणे वर्तविणे. पंचांग तयार करणे या गोष्टी रानटी आर्यांच्या नसून इंडियन लोकांच्याच आहेत. ते मौल्यवान वस्त्रे व बहुमोल अलंकार वापरीत असत. आणि याच लोकांचे आपण सारे शूद्रादी अतिशूद्रांच्या जातीतील लोक असून प्राचीन काळी त्यांच्या पूर्वजांच्या नाग, सर्प, गिधाड वगैरे पशुपक्ष्यांच्या नावाच्या टोळ्या असून त्याच्या नावावरून त्यांच्या वंशजास देवक प्राप्त झाली असावीत. आज त्यांच्या वंशजांच्या ज्या ज्या जाती आहेत त्या जातीतील जी कुळे आहेत आणि त्या कुळाची जी देवक आहेत त्यावरून त्यांच्या पूर्वजांच्या सुधारणुकीचा थोडाफार अंदाज बांधता येतो. शूद्रदिअतिशूद्र बंधूंनो! असे आपले पूर्वज गुणी व ज्ञान असे श्रेष्ठ दर्जाचे मानव असून त्यांचे पूजन स्तवन आपण या काळातही हरघडी करून "इडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवो" अशी इच्छा व्यक्त करीत असतो. शितावरून भाताची परीक्षा करावी किंवा तोंडातून "त" शब्द काढला की ताकभात ओळखावे या म्हणीला धरून भटांनी येथील आपल्या इतिहासाची पुराणांच्या रूपाने बनविलेल्या खिचडीची माहिती घेऊन ती चांगली की वाईट हे ठरवावे. बनविलेल्या पुराण

खिचडीत तांदूळ कोणत्या देशाचा, डाळ कोणत्या प्रदेशाची, ती तुरूची की म्हसूची आहे, बदाम, पिस्ते, मनुके अफगाणी की इराणी, वेलदोडा, मिरी, जायफळे, लवंगा, जावा सुमात्राहून आणल्या की येथल्याच, मिरची ताजी हिरवी की वाळलेल्या लाल, मिरची, मीठ वगैरे सर्व पदार्थ या देशातले आहेत की इराणी देशातले आहेत. इराणी ब्राह्मणांनी पुराणांची खिचडी तर छान बनवली असून तिच्यात दोन गुण असूनं ती भटांनी खाल्ली की तो भूदेव बनतो व भटेतरांनी तिचा नमुना चाखला तरी तिचे सारे विष त्याच्या अंगात भिनून तो पशू बनून भट लोकांचे पाय धुऊन त्या घाणेरड्या पाण्याला तीर्थ समजून ते पिण्याचे वेड लागते. असा पुराण खिचडीचा महिमा असून त्याचा अनुभव खल्लडे व भाबडे अशा शूद्रादी अतिशूद्रातील निरुद्योगी रिकामटेकड्या व बायाबापड्यास राम, विठ्ठल, विष्णू मंदिरात घेत असून भटांनी बनविलेल्या पशुतुल्य प्रपंचात भर टाकीत आहेतच. देव, देवके, पोथ्यापुराण ही इराणी भटांनी आपल्या उपजीविकेसाठी बनविलेली साधने असून त्यायोगे देव देवाचा छंद, पूर्वीचा जन्म आणि मेल्यानंतरचा जन्म याची वासना आणि स्वर्ग नरकाचे भय उत्पन्न झाल्याने देवावर सर्वस्वी अवलंबून राहण्याची व उद्योग न करण्याची शूद्रांना सवय लागते; हे सर्व खरे असले ती पोथ्या पुराणातूनही आपल्या धुरंधर आणि प्रतापी पुरुषाचा शोध घेता येत असून ह्या विषयी योग्य तो बोध घेता येतो.

**बलिस्थान ही आमची जन्मभूमी आहे**

आपल्या पूर्वजांनी आर्यभट ब्राह्मणांशी शेकडो वर्षे मुकाबला करून त्यांना अनेक वेळा पिटाळून योग्य तो धडा देऊन आपल्या बलिस्थानचे स्वातंत्र्य राखले होते. कश्यप हा शूद्रादी अतिशूद्राचा मूळ पुरुष पुराणात सांगितला असून तो शूद्रादी अतिशूद्राचा कुलस्वामीही समजला जातो. त्यास जे पुत्र झाले ते फार पराक्रमी व इंद्रजीत होते. वृत्त, विप्रचित, अंधक, हिराण्यक्ष, हिरण्यकश्यपु, प्रल्हाद, विरोचन, बळी, राव वगैरे रथीमहारथी हे कश्यपाचे वंशज असून त्यांनी इराणी आर्य भटाद्विजांचा अनेकदा पराभव करून त्यांच्या इंद्रास इराणी देशात हाकलून लावले आणि साऱ्या पृथ्वीचे इंद्रपद शेकडो वर्ष उपभोगिले. हा इतिहास मत्स्य पुराणाच्या १७ व्या अध्यायात मिळतो. अल्लड व खुल्लड वेदात देखील अनार्य लोकांच्या प्रचंड आणि अभेद किल्ले सुवर्णांनी मढविलेली नगरे, त्रिपूर नगरचा

रचना, अनार्यांची सिंहासने, त्यांच्या स्त्रियांचे सौंदर्य, त्यांची इतरांशी वागण्याची रीत, त्यांच्या राज्यांची राज्यव्यवस्था, त्यांनी केलेले यज्ञ, याग, इतर परराज्याशी करीत असलेला व्यवहार, लोकांचे व्यवसाय, राजे-रजवाड्यांची प्रजेशी वागणूक, तेथील लोकांची बुद्धिमत्ता वगैरे सर्व गोष्टींची माहिती मिळते. ती नीटपणे समजून घेतल्यावर आम्ही शूद्रादी अतिशूद्र अनार्य कुलात मिळते. याचा अभिमान बाळगला पाहिजे. आपल्या बलिस्थानाचा इतिहास आपल्या इंडियन रक्ताच्या प्रत्येक थेंबात इराणी भट, द्विज, आर्य, यवन, म्लेच्छ, तुर्क, मोगल, हूण, बैराग्याच्या पराक्रमाचा इतिहास नसून् निर्भेळ आपल्या पूर्वजांच्या वैभवाचा इतिहास आहे. आणि म्हणून् पूर्वजांच्या इतिहासाच्या अनुरोधाने आपण आपली अभेद्य एकी करून सुधारणुकीच्या मार्गाला लागले पाहिजे.

आपल्या बलिस्थानातील इंडियन मानवांचा जन्म कोठे व कसा झाला, केव्हा झाला याचा थांगपत्ता किंवा त्याजविषयी एखादा पुरावा अद्यापपोवतो गवसला नसला तरी त्याविषयी अनुमान करता येत असून इंडियन लोक हिंदुस्थानातच जन्मले असून ते येथेलेच मुळचे रहिवाशी होत. एकंदरीत पाहता आज आपण जसे शूद्र व अतिशूद्र या अवस्थेत किड्यासारखे वळवळत आहो तसे आपले पूर्वज नसून ते महाप्रतापी व कीर्तिमान असून ते पुरते सुधारणुकीचे भोक्ते, त्यांचा हा देश जसा आकाशाएवढा मोठा, तशीच त्यांच्या देशाच्या सुधारणुकीची कीर्ती आकाशभर दुमदुमत होती. तिची सर या भूतलावरील कोणत्याही देशात आली नसून तेथेच पहिल्याने सुधारणुकीचा उदय होऊन येथूनच पुढे तिचा प्रकाश जगभर पसरून रोमसाम्राज्यात अस्त झाला.

**ग्रीकन रोमन लोकांची सुधारणूक**

या पृथ्वीतलावर सृष्टीक्रमाच्या रहाटीनुरूप प्रत्येक मानवसमाजाची व त्याच्या देशाची सुधारणूक मानवजातीच्या सुखात व ज्ञानात भर घालीत असून एकेकाळी आपल्यापासून अतिदूर असलेल्या अमेरिका खंडातील काही देशांची सुधारणूक होऊन पुढे ती लोप पावून तेथील मानवास अवनत दशा येऊन रानटी अवस्था प्राप्त झाली तरी तिला मनुष्यजातीची आद्यस्थिती म्हणता येत नाही. पुरातन काळा इजिप्त, मेसोपोटेमिया, ग्रीस, रोम वगैरे देशांची सुधारणूक झाली असून तेथील लोक जोतिषशास्त्र, वैद्यकशास्त्र, गणितशास्त्र वगैरे शास्त्रांत फार वाकबगार होते

असे युरोपियन इतिहासकार सांगतात. हल्ली इजिप्त, ग्रीस, इताली वगैरे प्राचीन काळी सुधारलेले देश मागासलेले आहेत. यावरून मानवाची सुधारणूक ही एखाद्या मानव समाजात किंवा एखाद्या देशात अविच्छिन्नपणे चालू असते असे म्हणता येत नाही. सुधारणुकीच्या देशात व तेथील सुविद्य मानवांची स्वतंत्रता; रानटी, बुभुक्षित, आडदांड, लोभी, क्रूर व महत्त्वाकांक्षी अशा मानव लांडग्यांनी हिरावून घेऊन काहींना हाकून देऊन काहींना गुलाम करून आपण त्या देशाचे मालक बनले व तेथील लोकांची सुधारणूक उचलून आपण मजेत राहू लागले. अशा रानटी लोकांचेच भाऊबंद असलेल्या लोकांनी बलिस्थानावर अनेकदा स्वाऱ्या करून मूळच्या सुविद्य व सुशील क्षत्रियास जिंकून त्यांना गुलाम करून नाना प्रकारे त्यांचे हाल केले. कित्येक वेळी महार मांगाची कातडी सोलून ''त्वचं कृष्णमारंधयंत'' उभे जाळले. याविषयीचे दाखले वेदांत असून पुराणातही गवसतात. यानंतर काही काळानी इराणी आर्य ज्या देशातून आले त्या देशात पर्शियन सुधारणूक उदयास येऊन तिचा सूर्य मध्यान्ही तळपत असताना ग्रीकन लोकांनी इराण्यांचा मॅरेथान येथे धुव्वा उडवून त्यांनी आपला देश सुधारणुकीच्या मार्गाला लावला. पुढे यवनी जातीचा ग्रीस बादशहा फिलीफ होऊन त्याचा मुलगा अलेक्झांडर याने मोठा पराक्रम करून पर्शियनांचा पुरता समाचार घेऊन तो हिंदुस्थानात उतरला. त्याने येथील भटभिक्षुकांची पुरी खोड मोडून तो आपल्या देशाकडे जाण्यास निघाला. वाटेतच तो मरण पावला. त्याच्या कारकीर्दीत ग्रीस देशाच्या सुधारणुकीची दुंदुभी जगभर गाजत राहून तेथील ज्ञान, कला व शस्त्रे ही पूर्णावस्थेत जात असता ग्रीस देश रोमी लोकांनी जिंकून आपल्या साम्राज्यास जोडला. या बलाढ्य रोमीकांचे बलाढ्य साम्राज्य हूण, फ्रँक, तार्तर, मोगल, ट्युटन या रानटी लोकांच्या टोळ्यांनी खिळखिळे होऊन जेर झाले. ओदावकर या रानटी टोळयाच्या नायकाने रोमन बादशहास हाकून लावले. रोमन पातशाहीची दुसरी पाती त्यानंतर कानतन्तीनोपल येथे एक हजार वर्षे टिकून होती. पण तीही मुसलमानांनी जिंकून घेतली. त्यामुळे तेथील ग्रीस लोक स्वसंरक्षणासाठी रोम शहरात येऊन राहिले. त्यांनी आपल्या बरोबर जुनी पुराणी पुस्तके आणली होती. त्याकडे तेथील पंडिताचे लक्ष गेल्याकारणाने आजपर्यंत ग्रीकांचे गुप्त झालेले ज्ञानधन उजेडात येऊन ते युरोपातील सर्व देशात पांगू लागले. पीटार्क बोक्याचीओ या विद्वान मंडळीनी फार परिश्रम करून ग्रीस व रोमन बादशाहीत तयार झालेली पुस्तके मिळण्याची खटपट सुरू केली. ग्रीक विद्येचा

ओघ इंग्लंडपर्यंत जाऊन पोहोचला व आजपावेतो अप्राप्त झालेले प्राचीन ज्ञानभंडार उघडून त्यात काय आहे हे पाहण्याची इंग्लिश लोकांस उत्कंठा उत्पन्न झाली.

यायोगे इंग्लिश लोकांनी आपली व आपल्या देशाची अभूतपूर्व सुधारणा करून आपले साम्राज्य जगभर स्थापले. यामुळे इंग्रजी साम्राज्यावर सूर्य मावळत नाही अशी म्हण पडली. सांप्रत आपल्या देशात इंग्रजाचेच राज्य चालू असून ते शूद्रादी अतिशूद्रांना आपले पशू जिणे दूर करण्यास व अज्ञान हटविण्यास फार उपयुक्त आहे का की मनुकायद्याने शुद्रादिअतिशूद्रास विद्या शिकून ज्ञान संपादन करण्यास व उद्योगधंदा करून धन साठविण्यास आजपावेतो बंदी होती. यायोगे ते अज्ञानी व दरिद्री होत जाऊन पशुकोटीत राहणेची त्यांना सवय लागून ते गुलामगिरीत सुख मानण्याचे पुण्य समजू लागले. आता आपण इंग्रजी विद्या शिकून ज्ञान वाढवून आपली व आपल्या बलिस्थानाची शान वाढविली पाहिजे.

**गुलामगिरीचा इतिहास ध्यानी आणा:**

आज युरोप खंडातील जे देश सुधारणुकीच्या गोष्टीत नावलौकिकास चढलेले दिसतात ते सारे देश रोमन साम्राज्य नष्ट झाल्यावर चवदाव्या शतकापावेतो अज्ञानाधंकारात बुडून गेले होते. तथापि तेथील शहाण्या लोकांचे ग्रीक व रोमन लोकांच्या प्राचीन काळच्या जार्ण झालेल्या ग्रंथाकडे लक्ष लागल्याने त्याविषयी मनस्वी जिज्ञासा उत्पन्न होऊन त्यांच्या अध्ययनास प्रारंभ होऊन त्यांच्या देशाची सुधारणा होऊ लागली व भौतिकशास्त्रातील निरनिराळ्या गोष्टी हुडकून काढण्याचा त्यांना जबरदस्त छंद लागून ते शोध लावू लागले. जो तो अनुभवसिद्ध व प्रयोग सिद्धांत मांडू लागला.

कोणी मानवप्राण्याचे, कोणी पशुपक्ष्याचे कोणी झाडाझुडपाचे, कोणी भूमीचे, कोणी समुद्राचे, कोणी आकाशाचे, कोणी ग्रहताऱ्यांचे शोध पावून आपल्या देशाच्या व मानवजातीच्या ज्ञानात भर घालू लागले. कित्येक लोक अमेरिकेचा शोध घेऊ लागले तर किती एक लोक हिंदुस्थान, चीन वगैरे देशांत जाऊ लागले. काही दक्षिण ध्रुवाभोवती तर काही उत्तर ध्रुवाभोवती फिरू लागले. काही विलक्षण माणसे दोन्ही हाताला पंखे बांधून पक्ष्याप्रमाणे आकाशात भरारी मारण्याचा प्रयत्न करतात, तर काही माणसे तोफेच्या तोंडी बसविलेल्या गोळ्यात बसून चंद्रावर जाण्याचे मनोराज्य आखतात. यावरून मानवाची बुद्धी आकाशाएवढी कशी अफाट

व अतर्क्य आहे याचा बोध होतो. प्राचीन ग्रीकन व रोमन लोकांनी लिहून ठेवलेल्या जीर्ण ग्रंथाची येथील सनातन्यांनी जुन्या ग्रंथात जशा खोट्या व कल्पित गोष्टी घुसडून ते निरुपयोगी करून टाकले तशी दुर्दशा होमर, प्लेटो, अरिस्टाटल, हिरोडोट, ल्युसिपस, युक्लिड, हीरो, टालेमी वगैरे पंडितानी लिहून ठेवलेल्या ग्रंथांची झाली नाही. ग्रीकन लोकांच्या ज्ञानाचे तंत्र समजल्यावर युरोपियन लोक विश्वाची वाफ, अग्नी आणि वीज पकडू लागले असून सूर्यमंडळालाही वेठीस धरू पाहात आहे. म्हणजे कोणी पक्ष्याप्रमाणे आकाशात १०-२० फर्लांग फेरफटका मारून समाधान मानून राहिला असे बोलवत नाही. तो चंद्रावर केव्हा जाईल हे जरी सांगवत नाही; तरी तो चंद्रावरच काय आकाश पोकळीत अनेक सूर्यमंडळे असलेल्या एखाद्या पृथ्वीसारख्या ग्रहावर येणार नाही असे म्हणवत नाही.

गेली चार-पाचशे वर्षे युरोप खंडातील निरनिराळ्या देशांतील विद्वान शास्त्र-पंडितांनी सत्याचा शोध घेऊन आपापल्या देशांतील सुधारणुकीत भर घालण्याचा दीर्घोद्योग करून आपला देश भौतिक शास्त्राच्या शिखरावर नेल्याचा ते खटाटोप करीत आहेत. सांप्रत तर एखाद्या घोड्याच्या रेसप्रमाणे युरोपातील निरनिराळ्या देशात सत्याचा शोध लावून सुधारणुकरूपी घोड्यांची रेस सुरू असून तीत इंग्रजांचा घोडा वीन असून त्याचा बोलबाला साऱ्या जगभर पसरू लागला आहे. मानवाच्या रानटी अवस्थेत फरक पडून ते सुधारणुकीच्या मार्गाला लागले. खुद्द इंग्रजांच्या ग्रेट ब्रिटनमध्ये पूर्वी कधीही नव्हता असा सुधारणुकीचा उत्कर्ष झाला असून रसायन, पदार्थविज्ञान, भूगर्भ, सृष्टीज्ञान, सजीवज्ञान, ज्योतिष, वगैरे गोष्टींत मोठमोठे शोध होऊ लागले. या योगे लोकांची जिज्ञासा अतिशय वृद्धिंगत होऊन आचार, नीती, मानवधर्म, वगैरे बाबतीत सुधारणूक होत असून ते खरेखुरे मानवप्राणी बनत आहेत. ह्याची कल्पना अक्कलशून्य अर्थहीन वेद पठण व शुष्क जाल निर्माण करणाऱ्या पळीपंचपात्री वाजविणाऱ्या आणि हजारो वर्षे आम्हास शूद्र म्हणून हिणविणाऱ्या लोभी भट भटाळांना होणे कठीण आहे.

सांप्रत आपल्या बलिस्थानावर इंग्रज बहादुरांचे राज्य असून रयतेची सुधारणा करून ते तिचे सुख वाढवित आहे. इंग्रज लोक उपरे असले तरी ते आजपर्यंत राज्य असलेले उपरे इराणी आर्य ब्राह्मण; दुराण पठाण व तुराणी मोगली, हूण यांच्यापेक्षा लाखपटीने बरे असे बोलणे भाग पडते. का की बाहेरून इंडियन घुसणारे इराणी ब्राह्मण, पठाण हूण हे असून या बेकार व बेदरकार लोकांनी आमच्या

इंडियन पूर्वजांस जिंकले व आम्ही आर्य, अस्सल रक्ताचे जेते म्हणून श्रेष्ठत्वाचा तोरा मिरवून येथील लोकांस हीन, नीच, शूद्र समजून त्यांच्यावर राज्य केले. असा या उपऱ्यांचा इतिहास असून तो येथील मूळच्या इंडियन लोकांच्या वंशजास पशूकोटीत नेणारा आहे. त्यांनी लादलेली गुलामगिरी झुगारून देण्यास इंग्रज लोकांचे राज्य उपयुक्त असून शूद्रांनी ताबडतोब जागे होऊन विद्या शिकण्याची जलदी करून हजारो वर्षे पशुजीवनाचे जिणे टाकून द्यावे व सुधारलेला माणूस म्हणून जगण्याचा चंग बांधावा. असे आपण न करू तर पशूत आणि आपल्यात काही एक फरक राहणार नाही.

४

# गुलामगिरी

**आडदांड पशू कुत्र्याची एक गोष्ट**

एकंदरीत सर्व प्राणिमात्रांना जगण्याची टाहोळी आणि सुखाची डोहळी ही जन्मजात आदत असून त्यामुळे जगण्यासाठी आवश्यक असलेले अन्न व सुखास कारणीभूत होणारी चीज पैदा करण्यास ते हर वखत धडपड करीत असून अन्न मिळविण्याकरिता नाना तऱ्हेचे उद्योग करून पोटाची भूक भागवून, काम भुकेसाठी स्त्रीशी रत होऊन मनसोक्त सुख भोगून प्रजोत्पादन करीत असतात. आणि ही तलखाली सर्व प्राणिमात्रांना जन्मसिद्ध असते. याविषयी तुमची खात्री म्हणून येथे उदाहरणाकरिता एका उंडारलेल्या बुभुक्षित जंगली कुत्र्याची गोष्ट असून ती तुमच्या मनात ठसावी या उद्देशाने सांगतो. आता कान देऊन ऐका.

एका कुत्र्याला एके दिवशी काही एक खायला न मिळाल्यामुळे त्याच्या जीवाची फार तगमग होऊन तो पिसाळलेल्या कुत्र्यासारखा इकडे तिकडे धावत असता दुसरा एक कुत्रा सशाच्या मांसावर ताव मारीत असल्याचे पाहून त्याने खाण्यात रंगून गेलेल्या कुत्र्यावर झेप घेऊन त्यास खाली पाडून चावे घेऊन मॅव मॅव विजयी स्वर काढून घुसळून काढू लागला. खाली पडलेला कुत्रा हैराण होऊन कसाबसा कलवंडून त्याच्या तडाख्यातून निसटून कॅव कॅव असे पराभूत स्वर काढून दूर पळून गेला. तो गेल्यावर त्याची शिकार तो उन्मत्त कुत्रा खाऊन ढेकर देत चालू लागला. पुढे त्यास कुत्रा व कुत्री दिसली. त्यांच्या जवळ तो कुत्रा गेला. व पहिल्या कुत्र्याशी लढाई करून त्यास पिटाळून लावले.

या गोष्टींवरून 'बळी तो कान पिळी'' हा न्याय अनादिकाळापासून आजपावेतो अविच्छिन्नपणे पशुपक्षी वगैरे प्राणिमात्रास चालू असून मानव प्राण्यातही तो हजारो वर्षे होता, असे कार्मेलियस टासिटस या विद्वान रोमन इतिहासकाराने

आपल्या ग्रंथात लिहून ठेवले. त्यानंतर कान्स्टांटीनोपल येथील जास्टियन नावाच्या बादशहाच्या कारकीर्दीच्या वेळी होऊन गेलेल्या थिओडोशिअस या विद्वान इतिहासकाराने पूर्वीची माणसे कशी होती याचे नमुने आपल्या ग्रंथात नमूद करून सांगितले की, पूर्वीची माणसे आणि पशू यांच्या वागणुकीत तफावत नसून मानवामध्ये सुधारणुकीचा गंधही नव्हता. कित्येक विद्वांनानी मानव जातीतील कुटुंबव्यवस्थेत सर्वांना लागू पडण्यापूर्वी पशूप्रमाणेच स्त्रीपुरुषांचा संबंध असून पशुसारखे खातपीत होते. परंतु कालांतराने आपल्या आचार-विचारात बदल करून पशुत्वाचा त्याग केला. त्याच्या या बदलास सिव्हिलायझेशन म्हणतात.

मानवप्राणी आपल्य बुद्धीच्या जोरावर हळूहळू सुधारत जाऊन एकंदर सर्व सजीवसृष्टी व निर्जीवसृष्टी ही आपल्या जगण्यास व सुखास कशी साधनीभूत होईल याचा शोध घेऊन क्रूर प्राण्याची झगडा करून, अज्ञात गोष्टींच्या संकटास तोंड देऊन अनुभव व ज्ञान संपादन करीत करीत त्याने आपले स्वामित्व एकंदर सर्व चराचर सृष्टीवर स्थापन करून इतर प्राण्यांना जे साधले नाही अशा तऱ्हेचे कर्तृत्व केले. ते साध्य करण्यापूर्वी लक्षावधी मानवप्राणी क्रूर पशूशी व सृष्टीच्या अज्ञात संकटाशी झुंजता झुंजता ठार झाले असतील बरे! आणि अशा अवस्थेत मानवप्राणी हजारो वर्षे मानवेतर प्राण्यांशी आणि सृष्टीशी लढला. ही लढाई करीत असता मानवेतर प्राण्याचे व भौतिक नियमाचे अनुभवसिद्ध ज्ञान मिळवून त्याच्या जोरावर सृष्टिपदार्थ व पश्वादिक प्राणी सर्वथैव आपल्या कक्षात राहून ते सर्व मानवांच्या जगण्यास व सुखोत्पत्तीस साधनभूत व्हावे अशा प्रकारचा त्यांच्यावर प्रचंड विजय संपादून त्या सर्वांना आपल्या गुलामगिरीत डांबून टाकले. हे मानवकर्तृत्व असून त्याचे हे कर्तृत्व एवढ्यावरच थांबले नसून त्याने एकंदरीत सर्वसामान्य मानवाच्या तर्कबुद्धीस काही एक उमगणार नाही अशा तऱ्हेच्या कल्पित व खुळसट ज्ञानाच्या प्रचितीवर आकाशातल्या प्रभुबापाची चांदताऱ्यावर राहणाऱ्या अलिशां अल्लाची त्याचप्रमाणे ब्रह्मांडाचा निर्माता म्हणून विष्णूला कल्पून त्यास चारीमुंडी चीत करून त्याच्या बेमटातून ब्रह्मदेवास जन्म देवून व या ब्रह्माच्या तोंडातून ब्राह्मणास उत्पन्न करून त्यांच्या मार्फत अनाडी मानवास आपल्या गुलामगिरीत जखडून टाकले, खरे पाहू गेल्यास पश्वदिक प्राणी आणि मूळ मानवप्राणी यामध्ये काही एक फरक नसून हिंस्त्र पशूपेक्षा तो गलिच्छ हिल्लाखोरी करीत होता.

## २. पश्वादिक प्राणी आणि मानवप्राणी

वाघ या प्राण्याची हिंस्त्र पशूत गणना होत असून तो कोणाचे सहाय्य न घेता स्वत: शिकार करून ती खाऊन स्वत:चे रक्षण स्वत:च्या बलावर करीत असतो. त्याच्याच जातीचा किंवा अन्य जातीचा हिंस्त्रपशू त्याच्यावर शत्रू म्हणून चालून आला तर तो त्याच्याबरोबर लढतो. यावरून कोणत्याही प्राण्याच्या जगण्यास किंवा सुखात जो काही अडथळा येतो तो दूर करण्यास जो धवशा घालावा लागतो त्यास लढाई हे नाव असून ती प्राण्यांच्या उपजत गुणाबरोबरच अंगावास करीत असून गवताळ रानात एकटे दुकटे हरण चरण्यास जात नसून चारा खाण्यास त्यांचा कळप असतो. या कळपातील प्रत्येक हरणास कळपाचा आधार वाटतो, तथापि एखाद्या वाघाने कळपातील एखाद्या हरणावर झडप घातली तर कळप फुटून त्यातले प्रत्येक हरण घाबरून सापडेल त्या मार्गाने पळून जाते. पळून जाणे हा एक जीव बचावाच्या लढाईतला भाग असून दुर्बल प्राण्यास तो नाखुशीने मंजूर करावा लागतो. हिंस्त्रपशू ते भक्षक व अहिंस्त्रपशू ते भक्षक ही नैसर्गिक वस्तुस्थिती असताही दोघेही एकाच जंगलात गुजराण करीत असून दोन वाघ हे भक्ष्य कोणाचे तुझे की माझे? किंवा ह्या वाघिणीचे सुख घेण्यास ती कोणाची? तुझी का माझी? या कारणास्तव एकमेकांशी झगडून लढाई करून निकाल लावून घेतात. अशीच अवस्था प्राचीन काळच्या रानटी मानवाची असून प्रत्येक लहान लहान मानव टोळी व तिची प्रत्येक वस्ती दुसऱ्या मानव टोळीशी व वस्तीशी भांडत असून प्रबल टोळीने दुर्बल टोळीवर हल्ला करावा, त्याचा शेवट दुर्बल टोळीतील तरण्याबांड पोरी पकडल्या जाऊन विजयी जवानांनी त्यांच्यावर त्या मारण्याच्या पंथावर येई पावेतो जबरदस्ती जुगलून आपला माज घालवून सुख भोगीत. त्या तरुण जवान पोरी जीवापुरत्या या पशुजबड्यातून कशाबशा वाचल्या, तरी पकडून आणलेल्या इतर स्त्रीपुरुषांबरोबर त्यांना दगडीने ठेचून ठार करत. अत्याचार करणाऱ्या नराधमाच्या टोळीच्या तडाख्यातून पुढे त्या एकंदरीत सर्व टोळीतील प्रत्येक उघडेनागडे लहान-थोर स्त्री-पुरूष झाडदेवीभोवती फेर धरून हातात झावळी घेऊन टुरटुरी गाणे म्हणत दमल्यावर खाईराचा देवीपुढे नैवेद ठेवून त्यांचा म्होरक्या प्रत्येकाच्या ओंझळीत मासाचे तुकडे घालून मग ते जेवण करून चंगळ करीत. या रांगड्या मानवांचे ससे, हरीण व डुक्कर पकडून आणलेल्या दुसऱ्या टोळीतील मानवाचे मांस मासे व झाडांची फुले हेच खाद्य पदार्थ होत. त्यावेळी त्यांना रोटी माहीत

नव्हती.

कालांतराने मानवप्राण्यास अग्नीचा शोध लागून तो दगडमातीची भांडी तयार करून मांस व इतर खाण्याचे सृष्टपदार्थ उकडून, भाजून खाऊ लागला. शेतीचा शोध लागून अन्नधान्याची पैदास होऊ लागल्याने शेतीचे काम करण्यास बैल व माणसे लागू लागली. बैल व माणसे पकडून त्यांच्याकडून शेतीची कामे करवून त्यांच्यावर धटिंगण माणसे त्यांना ठार मारून त्यांचे मांस न खाता धनीपणा गाजवू लागले. दुसऱ्या टोळीतील पकडून आणलेल्या जनावरांची व मानव स्त्री-पुरुषांची वाटणी आपल्या टोळीतील मानवास केल्यावर तो मालक बनून त्या जनावरांचा व स्त्री-पुरुषांचा कामाने पिट्टा पाडी. चार पायांच्या जनावरास जिव व दोन पायाच्या मानवास जिद्रस समजून त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करी. त्याच्या मालकास एखादे जनावर किंवा मानव नाठाळ वाटल्यास तो त्यांना बाजारात नेऊन विक्री. अरब लोक जिद्रसास गुलाम म्हणतात. भट लोक शूद्र म्हणतात. ग्रीकन लोक स्लेव्ह व इतर युरोपियन लोक जित्रांबांपेक्षा अधिक महत्त्व नसलेल्या जिद्रसास सर्व्हिटर म्हणतात. जिद्रसाच्या स्थितीलाच गुलामगिरी म्हणतात. गुलामगिरी, शूद्रगिरी, स्लेव्हरी, सेव्हिड्युल आणि दासपणा हे शब्द एकाच अर्थाचे आहेत. गुलामगिरीची चाल पश्वादी प्राण्यांत कधीही चालू असलेची दिसत नसून शहाणपणाचा डौल मिरविणाऱ्या मानवप्राण्यातच आढळून असून ती मानवाच्या अंगी जन्मजात असलेल्या स्वतंत्रता या आवडीचा चकाचूर करणारी व त्यास स्वाभिमानशून्य बनवून पशुकोटीत नेऊन बसविणारी असल्यामुळे ती अधम व अमानुष असून दुष्ट मानवातील बेवकूब बुद्धीची व पिशाच विचाराची निशाणी होय.

### ३. ॲरिस्टाटल आणि ग्रीकनांचे गुलाप

या चालरीतीबरहुकूम ग्रीक देशामध्ये मानवाच्या मनुष्यपणास शरम वाटेल अशा प्रकारची वागणूक सुधारणुकीचा डौल मिरविणाऱ्या ग्रीकन लोकांची असून ते गुराढोराच्या बाजारात जशी गुरांची खरेदी विक्री होत तशी गुलामाची खरेदी विक्री ज्या बाजारात होते तेथे जात व गुलामाची खरेदी किंवा विक्री स्लेव्हर यांचे मार्फत करीत. ग्रीकन लोक शरीरश्रम करीत नसून डोके चालवीत असत. हे गुलामाकडून गुराढोराप्रमाणेच कामे करून घेत व आपणास पडणारे कष्ट वाचवून

डोक्याची कामे करीत. मानव जे श्रम करतो, त्यायोगे त्याचे शरीर धडधाकट बनत असले तरी त्याच्या बुद्धीची चलाखी मंद होते. असा येथील भटलोकासारखा सिद्धांत ग्रीकन लोकांचा असल्यामुळे ते कष्टाची सर्व कामे गुलामाकडून घेऊन आपल्या बुद्धीस मिळत असलेला निवांतपणा व अवसर आपल्या देशाच्या सुधारणुकीत खर्च करीत. यामुळे मानवांचा नीतीधर्म, राज्यधर्म वगैरे विषयांसंबधी अनेक शास्त्रग्रंथ तयार झाले. सुंदर कपडे व इमारती तयार होऊन मानव सुधारणुकीचे सिद्धांत बसविता आले. हे कर्तृत्व ग्रीकन लोकांस करता येऊन त्यांनी आपला देश वैभवाच्या शिखरावर चढविला. तथापि गुलामांना सुख न मिळता रात्रंदिवस मरेपर्यंत शेतीत काम करूनही त्यांना पोटभर अन्न मिळाले नाही. त्यांच्या साऱ्या कष्टाची फळे ग्रीकन लोकच चाखीत असत. अशा प्रकारे गुलामाचे कष्ट, ग्रीकन लोकांच्या जगण्यास व सुखास मदत करीत असल्यामुळे एक ग्रीकन पंडीत ॲरिस्टाटल याने भटभिक्षुकांच्या मनूसारखे सांगितले की ग्रीकनांनी बुद्धी श्रमवावी आणि गुलामांनी शरीर कष्टवावे. गुलाम जनता ही समाजव्यवस्थेच्या पाठीचा कणा असून त्यांची गुलामगिरी ही राज्यव्यवस्थेतील प्रमुख विभाग होय. अशा प्रकारची समजूत येथील भटभिक्षुकाची असून ते सांगतात शूद्र हे द्विजांचे ईश्वरविरहित दास असून त्याचे शूद्रत्व समाजाच्या पावित्र्याचे रक्षण करते. अस्पृश्यता धर्मविरहित असून गरती स्त्रियांची अब्रू राखण्यास वेश्या जशा अप्रत्यक्ष मदत करतात; त्याचसारखी अस्पृश्यता द्विजजातीचा मंगलपणा रक्षण्यास उपयुक्त आहे. यावरून ग्रीस देशाचे ग्रीकन यवन व इंडियामधील इराणी आर्य ब्राह्मण हे सख्खे जुळेबंधूच होते हे सिद्ध होते.

ग्रीकन लोकांना रोमन लोकांनी जिंकल्यापासून तेथील गुलाम लोकांचे फारच हाल होऊन त्यांना आपले जिणे नकोसे झाले होते. रोमनांनी ग्रीकनांना जंकिले खरे. तथापि आपल्या देशातील भटांचे इराणी पूर्वज ब्राह्मण हे इंडियन लोकापेक्षा सुधारणुकीत मागासलेले, कमी ज्ञानाचे व हीन बुद्धिचे क्रूर होते तसे रोमन लोक ग्रीकनपेक्षा कमी हुशार होते. परंतु भटाभिक्षुकांनी जशी इंडियन लोकांची सुधारणूक उचलून बलिस्थानावर आपले स्वामित्व स्थापले तद्वत ग्रीकन लोकांचे ज्ञान घेऊन आपले बस्तान जिंकलेल्या प्रदेशावर बसविले हे जे ते रोमी लोक आपल्या देशात आलेल्या इराणी ब्राह्मणाचे वंशज जे भटकडे इंडियन लोकांना शूद्र, अतिशूद्र, नकटे, काळे, उंद्रे, दास वगैरे शब्दांनी हिणवतात. तसेच आस्त्रिया, पोलंड, जर्मन,

इंग्लंड वगैरे युरोपातील देशांच्या रहिवाशांना स्लाव्ह अथवा स्लेव्ह शब्द वापरून हीन गुलाम समजत होते. जिंकलेल्या लोकांना जित समजून त्यांना पक्षपातीपणाने वागवून त्यांच्याकरता एक व आपल्या लोकांकरता एक असा कायदा करून कारभार करीत होते. रोमन साम्राज्यातील कित्येक शहरातील गुरांच्या बाजारासारखी गुलामांची ओपन मार्केटमध्ये खरेदी विक्री होत असे आणि ती कायदेशीर मानली जात असे.

### ४. रोमन साम्राज्यात गुलामांचे हाल

रोमन हे ग्रीकन लोकांचे भाऊबंद असून त्यांनी हजार दीडहजार वर्षे राज्य केले. मध्यंतरी या शहाण्या लोकांच्या साम्राज्यावर गाथन, फ्रँकन वगैरे रानटी टोळ्यांनी वारंवार हल्ले करून ते खिळखिळे करून एका रानटी टोळ्यांचा नायक आडोॲकर याने रोमनांचा बादशहा रोम्युलस आगस्टयुलस यास पळवून लावले. रोमनांनी दुसरी पाती कान्स्टांटिनोपल येथे होती. तीही तुर्कांनी धुळीस मिळविली. रानटी प्यूटन हे तेथील ब्राह्मण लोकांचे भाऊबंदी रोमीचे राज्य करू लागले. पण त्यांना तेथील बहुसंख्य गुलामास येथील भट लोकाप्रमाणे खच्ची करता न आल्याने दंगेधोपे बंड होऊन त्यांची सत्ता लयास गेली. या प्यूटन लोकांनी जिंकलेल्या लोकावर त्यांना गुलाम समजून नानाप्रकारचे अत्याचार केले.

गुलामगिरी नष्ट होण्यासाठी येशू महात्म्याने व महमद पैगंबराने आपली सारी हयात खर्च करून मानवप्राण्यामध्ये जन्मजात असलेल्या स्वतंत्रता, समता व बंधुता या गुणांची लोकांना जाणीव करून देऊन गुलामगिरीचा धिक्कार केला. तथापि त्याचे प्रयत्न वाया गेल्याने व अलेक्झांड्रिया येथील रोमीचे राज्य लयास गेल्याने अज्ञानांची अवकळा रात्र सुरू होऊन स्वर्ग, नरक, देवधर्म, गंडेदोरे, साधुसंत वगैरे कृष्णपक्षात प्रकाश पाडणाऱ्या चांदण्यासारखे घनदाट अंधार निर्माण करणाऱ्या अंघाईटींनी युरोपातील सारी मानवजात कुविचार, कुविद्या व कुश्रद्धा यांनी भारावून गेली होती. त्यात मानवधर्म जाणत नसलेल्या ब्राह्मण लोकांच्या आर्य इराणी पूर्वजाप्रमाणे, रानटी असलेले ट्युटन, ब्रेहन व कुलटिन लोकांच्या टोळ्यांनी लूटमार व बायाबापड्यांवर अत्याचार करून सर्व मानवांना गांगरून टाकले होते. त्यातच ख्रिस्तधर्माच्या गुरूनी येथील भटभिक्षुकासारखी लूटमार चालविली होती. या परिस्थितीला सारे लोक कंटाळून गेले होते.

ब्राह्मण धर्माचे धर्मगुरू पालखीत बसून दिवसाढवळ्या मशाली पेटवून ज़से गावोगावी मिरवून लोकाकडून पाद्यपूजा करवून अमाप दक्षिणा लुबाडतात, तसेच ख्रिस्ती धर्मगुरू पोप महाराज आपल्या शिष्यगणास बरोबर घेऊन वाजत-गाजत संचार करीत व गुलामगिरी ही धर्मविहित आहे असे सांगत. लोकही पिशाचवत असलेली गुलामगिरी नाहीशी करण्यास विनवीत, तेव्हा पोपचा पढतमूर्ख शिष्यगण उपदेश करीत की, ''गुलामगिरी नष्ट केल्यास प्रभूचा कोप होईल. पुढील जन्मी गुलामगिरी नको असल्यास पोपगुरू महाराजांकडून रोटीचा तुकडा ब्रॅन्डीचा एक घोट घेऊन खा. पापाची क्षमा व स्वर्गातली खुर्चीही मिळण्यासाठी महाराजाकडून सर्टिफिकेट घ्या. रोटी, ब्रँडी आणि सर्टिफिकेटस विकून पोप महाराजांनी लोकांची लूटमार करून गडगंज संपत्ती मिळविली. अशा कठीण समयी इरस्मस व अर्धा महात्मा लूथरला पुढे सरसावून बुद्ध यासारखे गुरूस विरोध करून आंधळ्यासारखे कुमार्गाने चालणाऱ्या मानव समाजास सुमार्गावर आणण्याचे महान कार्य करून त्यांनी धर्मक्रांती घडवून आणली. लूथरला मी अर्धा महात्मा म्हणतो, का की त्याने चेटूक या खोट्या विद्येवर विश्वास ठेवून आपल्या अनुयायांकरवी अनेक चेटकीचे खून करवून कित्येक चेटकिणींना पकडून झाडास बांधून जिवंत उभे जाळले.

लूथरने मख्खीवाद ओळखून बायबलमधील वचनांचा आपल्या सोईप्रमाणे व मताप्रमाणे अर्थ घेऊन पोपमहाराजांची सौदेगिरी लोकांपुढे व्याख्यानाच्या द्वारा मांडून लोकांत जागृती करू लागला. त्यामुळे त्यास पुष्कळ अनुयायी मिळून त्याच्या भाषणांस हजारो लोक जमा होऊ लागले. त्यांच्या या चळवळीने प्रोटेस्टँट पंथ स्थापन झाला. या पंथाचा अंगीकार करून एलिझाबेथ राणीने इंग्लंडमधील गुलामगिरी नाहीशी करण्याचा पाया घातला, पुढे काही शतकांनी इंग्रजी लोकांनी गुलामगिरी ही कायद्याने बंद पाडली.

इंग्लंड देश हा, युरोपच्या पश्चिमेस सिलोनसारखे समुद्रातले एक बेट असून प्राचीन काळी तेथील गोरे लोक अंगाला कोळशाचा काळा रंग फासून त्यावर चुन्याचे पांढरे पट्टे ओढून वाघासारखे डुर डुर, घुर घुर आवाजाची भाषा वापरून एकमेकांशी बातचीत करत असत. ही रानटी अवस्था बऱ्याच काळ येथे रूढ असून नार्मन लोकांचा राजा ड्यूम विल्यम याने इंग्लंडवर स्वारी करून इंग्रजांना जिंकून आपले राज्य स्थापिले. एव्हापासून त्याच्यात सुधारणूक होऊन त्याच्या इतिहासास प्रारंभ झाला. त्याच्या इतिहासात दोन राजे व दोन राण्या यांच्या कारकीर्द फारच

गाजली जाऊन लोकांना माणुसकीचे हक्क मिळवून गुलामगिरी लयाच्या मार्गाला लागली.

कोलंबस हा एक समुद्रावर फिरणाऱ्या वास्को-ड-गामासारखा फिरता खलाशी असून त्याने स्पेनच्या राणीकडून थोडीशी चिरीमिरी घेऊन इंडियाचा जलमार्ग शोधण्याच्या ईर्ष्येने निघाला खरा पण तो चुकून इंडिज बेटास लागला. परत स्पेनला आला, त्यानंतर निरनिराळ्या देशांतील युरोपियन लोक अमेरिकेत जाऊन तेथील लोकांना हुसकावून त्यांच्या जमिनी बळकावून आपण उद्योग करून राहू लागले. हे उपरे वसाहतवाले येथील ब्राह्मण लोकाप्रमाणेच असून त्यांनी अमेरिकेतील मूळच्या इंडियनास वेठीस धरून त्यांच्याकडून जनावरासारखे भयंकर कष्ट घेऊन आपल्या सुखात व संपत्तीत भर टाकून त्याच्यावर मालकशाही गाजवून त्यांना नाना प्रकारे छळू लागले. त्यांच्या छळाला कोट्यवधी इंडियन बळी पडले. कित्येकांना गोळ्या घालून तर कित्येकांना जिवत जाळून ठार मारले. त्यांच्या असल्या अघोरी अत्याचाराला भिऊन कित्येक इंडियन लोकांनी आत्महत्या केली. आज या बिचाऱ्या इंडियनाची लोकसंख्या थोडी उरली असून ती केव्हा नामशेष होईल हे सांगवत नाही.

### ५ अमेरिकन निग्रोंची गुलामगिरी

गेल्या दोन तीनशे वर्षात गुलामाचा व्यापार करणाऱ्या हलकट व्यापाऱ्यांनी अमेरिकेतल्या कोट्यवधी निग्रोंना पकडून त्यांना अमेरिकेतल्या वसाहतवाल्या गोऱ्या मालकास विकून अब्जावधी रुपये कमाविले. आज अमेरिकेत निग्रो गुलाम कोट्यवधी असून कुत्र्याला जे जिणे आहे ते त्यांना नसून गुराढोरापेक्षाही नीचपणाने वागविण्यात येते. स्त्री गुलामाची स्थिती तर फार शोचनीय असून निग्रो लोक अशिक्षित मागासलेले असले तरी त्यांच्या जातीत माणुसकीला साजेसे बरेच आचारविचार असून चालरीतीप्रमाणे स्त्रियांना एखाद्या देवीप्रमाणे वागविण्यात येत असून, कित्येक स्त्रिया सुंदर, कुलीन व अब्रुदार असून त्यांना गावात मोठा मान असतो. अशा स्त्रियांपैकी कृष्णवर्णाच्या, तारुण्याने मुसमुसलेल्या दणकट निग्रो स्त्रिया पकडून त्यांना अमेरिकेतील श्रीमंत गोऱ्या मालकास गुलामांचा व्यापार करणाऱ्या दुष्ट व्यापाऱ्यांनी मुबलक पैसा घेऊन विकले. हाय! हाय!! या दीन दुबळ्या स्त्रियांचे हाल तुम्हास काय सांगावे पाहा, सांगताना मला रडू येते.

गोरा मळेवाला किंवा कारखानवाला मालक स्त्री गुलामावर लाजलज्जा सोडून बेशक अत्याचार करून तिला गरोदर ठेवतो. पुढे ती बाळंत झाल्यावर तिला जी मुले होतात ती आपलीच मुले मानत नसून त्यात नीचच समजतो. एकदा गोरा मळेवाला मालक आपल्या गुलाम स्त्रीस नांगराला जुंपून तिचा कामाने पिट्टा पाडून तीस आसोडाचे फटके तिच्या अंगातून रक्ताच्या चिळकांड्या उडेपर्यंत देऊन, मध्येच त्यास कामलहरी येताच तिचे काम थांबवून, तिला झाडाखाली नेवून नग्न करून बोका मांजरीला पळविण्यापूर्वी तिला चावाचाळी करून मॅवच्या फूत्काराने घाबरवून उलथीपालथी करून धामधुमी माजवून तिच्याशी रत होतो; तशी बोकेशाही काळ्या निग्रो स्त्रीवर गोरा मालक चालवून तिच्या काळ्या गोड गालावर, स्तनांवर दाताचे चावे घेवून नखाने ओरखडून टण्ण स्तनावर घणासारख्या बुक्या मारून तिला आपल्या कवळीत लपटून तिची दमछाट होईपर्यंत मुरमाड जमिनीवर घुसळून रक्तबंबाळ करतो. अशा प्रकारे अघोरी कामसुख घेतल्यावर त्या स्त्रीस पुन्हा शेतीच्या कामाला जुंपतो. अशी तऱ्हेवाईक रीत पश्वादी प्राणिमात्रात नसल्याने अमेरिकेतील गुलामांच्या मालकांना पशू म्हणणेदेखील लज्जास्पद होय!

बंधूनो! माझे भाषण ऐकताना तुम्ही रडता का? डोळे पुसा, अमेरिकेतील गुलामांच्या स्थितीबद्दल तुम्हाला इतके दु:ख होते, तर आजपावेतो स्वत:ची स्थिती कळून न आल्याने ती कळल्यावर तुमचा ऊर दडपून तुम्ही धाय मोकलून रडत बसला पण आपली दु:खे दूर होणार नसून त्यासाठी आपण एक होऊन आपणावर लादण्यात आलेल्या शूद्रत्वाच्या भट गुलामगिरीचा चेंदामेंदा केला पाहिजे. जुन्या काळातील रानटी माणसांची गुलामगिरी मिसरी, बाबोलीयन लोकांतील गुलामगिरी, आर्यन रोमींची गुलामगिरी आणि अमेरिकन गोऱ्याची व आपल्या देशातील ब्राह्मण गुलामगिरी यात काही एक भेद नसून, असला तर स्थान स्थिती आणि काळ यात असून निग्रो गुलामाप्रमाणे आपण शूद्र लोक हजारो वर्षे गुलामगिरीचा अनुभव घेत असून निग्रो गुलाम आणि शूद्र गुलाम दोघेही दु:खी आहेत. निग्रोंना लोकांनी अमेरिकेतील भटांच्या भाऊबंदास विकले. तर भट लोकांच्या आर्य इराण्यांनी आपल्या इंडियन पूर्वजास गफलतीने जिंकले. यामुळे त्यांच्या वंशजास परंपरेने शूद्रत्व प्राप्त झाले. हे शूद्रत्व नष्ट करण्यास इंग्रजी राज्यात आपणास उत्तम संधी मिळाली असून ती न दवडता आपण आपली गुलामगिरी नष्ट करण्याकरता एक

होऊन झटू. भट लोकांचा देव, धर्म व पुराणे ही आपल्या डोक्यात न्यूनगंड निर्माण करून गुलामगिरी पक्की करीत असल्याने ती सारी आपल्या उकीरड्यात गाडून विपरीत आर्यभट्टादी विप्रांनी शूद्रादी अतिशूद्रास अकरमासी असून अस्पृश्य आहेत; असे पुराणात लिहून ठेवले आहे पण ते सत्य नसून इराणी आर्यद्विजच खरेखुरे अकरमासी व अस्पृश्य होत. यांच्या गुलामगिरीच्या मगरमिठीतून सुटण्यासाठी मी भरलेल्या तळीला एकजुटीने हात लावा. आणि आपल्या पूर्वजांचा जयजयकार करा.

# सावित्रीबाईंची जोतिबास पत्रे

पत्र क्र.१

१०-१०-१८५६

सत्यरुप जोतिबास्वामी यास,

सावित्रीचा शिरसाष्टांग नमस्कार,

पत्रास कारण की,

माझ्या तबियतीत अनेकदा उलटा पालटी होऊन ताळ्यावर आली आहे. या दुखण्यात भाऊने अपरिमित श्रम घेऊन माझी सेवा केली आहे. यावरून तो किती प्रेमळ आहे हे दिसून येते. मी परिपूर्ण दुरुस्त होताच पुण्यास येईन. काळजीत असू नये. फातीमास त्रास पडत असेल पण ती कुरकूर करणार नाही. अस्तु. येथे बोलण्यात बोलणे चालले असता असे घडले की, भाऊ म्हणाला, तू व तुझा नवरा वाळीत असून तुम्ही उभयता महारमांगादी अंत्यजाकरता जी कर्मे करता, ती पतित असून आपल्या कुलास बट्टा लावणाऱ्या आहेत. यास्तव सांगतो की, तुम्ही नवरा बायकोने जातीरूढीस अनुसरून व भट सांगेल त्याप्रमाणेच आचरण करावे. त्यांचे बेलगाम व असंमजस बोलणे ऐकून आई खटकन उतरून काळवंडली. भाऊ तसा दयाळू पण कोत्या बुद्धीचा असल्यामुळे त्यानी तुम्हास व मला दूषणे देऊन आपली निंदा करण्यास कमी केले नाही. आईस वाटले, ती त्यास रागे न भरता ऐकवणी करती झाली की, तुला देवाने रसवंतीसारखी काया दिली असता तिचा असा दुरुपयोग करावा हे चांगले नाही. आईचे बोलणे ऐकून भाऊ उगा राहिला व लज्जा पावून मुकाट्याने बसून राहिला. मी त्याच्या मताचे खंडन करून बोलले. भाऊ तुझी बुद्धी कोती असून भट लोकांच्या शिकवणीने दुर्बल झाली आहे. तू शेळी, गाय यांना जवळ घेऊन कुरवाळतोस, नागपंचमीस विषारी नाग पकडून त्यास दूध पाजतोस. महार मांग हे तुझ्या सम मानव असतात. त्यास अस्पृश्य समजतोस त्याचे कारण सांग? असा त्यास प्रश्न केला. भट लोक सोवळ्यात असता तुझा विटाळ मानतात. तुला महारच समजतात. माझे बोलणे ऐकून तो लज्जित झाला व पुसू लागला, महारमांगांना तुम्ही कशासाठी शिकवता? याविषयी लोक तुम्हाला अपशब्द देऊन त्रास देतात. हे मला ऐकवत नाही. मी त्यास इंग्रज लोक

महारमांगासाठी काय काय करतात ते सांगून विद्याहीनता ही पशुत्वाची खूण आहे. भट लोकांच्या श्रेष्ठत्वास आधारभूत विद्या हीच होय. तिचा महिमा मोठा आहे. जो कोणी तिला प्राप्त करून घेईल त्याची नीचता दूर पळून उच्चता त्याचा अंगीकार करील. माझे स्वामी देवमाणूस आहे. त्याची सर या देशी कोणाला येणार नाही. महारमांगांनी शिकावे व माणूस म्हणून जगावे या कारणास्तव भटगुळांशी झगडत खटाटोप करणारे जोतिबा स्वामी महारमांगांना शिकवितात व मीही त्यास शिकविते. पण त्यात अनुचित काय आहे? आम्ही उभयता मुलींना शिकवितो, बायांना शिकवितो, महारमांगांना शिकवितो, हेच ब्राह्मणांना अपायकारक होणार, या समजुतीच्या कारणास्तव ते आमच्या माणूस धर्माच्या कामास अब्रह्मण्यम् अब्रह्मण्यम् करीत निंदा कुटाळक्या करतात व तुझ्या सारख्याच्या मनात किल्मीष पेरतात.

तुला स्मरत असेल की, माझ्या नवऱ्याचा गुणग्राही इंग्रज सरकारने एक समारंभ घडवून त्यात त्यांच्या कार्याचा गौरव करून, आदरसत्कार घडवून दुर्मती दुर्जनास लाजविले. तुला मी खात्रीपूर्वक बोलते, माझा नवरा तुझ्यासारखा वारकऱ्याप्रमाणे नुसते हरिनाम घेत वाऱ्या करीत नसून प्रत्यक्ष हरीचे काम करीत आहे. त्यास मी मदत करते. हे काम इतके आल्हादकारक होते की, त्यायोगे मला परमानंद होतोच होतो. याव्यतिरिक्त मनुष्याची सीमा दृग्गोचर होते. माझे बोलणे, भाऊ व आई एकाग्र चित्ताने ऐकत राहिली होती. भाऊ पश्चात्ताप पाऊन याचना करता झाला. आई बोलली, सावित्री तुझ्या जिव्हेत सरस्वती नांदत असावी. तुझे ज्ञान ऐकून मी कृतार्थ झालो. दोघांच्या उद्गाराने मात्र माझे अंत:करण समाधानाने भरून आले. यावरून तुमच्या ध्यानात येईल की पुण्यात ''आपल्या-विषयी'' दुष्टावा माजविणारे विदूषक पुष्कळ आहेत. तसेच येथेही आहेत. त्यांना भिऊन आपण हाती घेतलेले कार्य का सोडून द्यावे? सदासर्वदा कामात गुंतावे. भविष्यातले यश आपलेच आहे. अधिक उणे काय लिहावे ही विज्ञापना.

आपली

**सावित्री**

**पत्र क्र.२**

नायगाव, पेटा खंडाळा, जि. सातारा
ता. २९ ऑगस्ट १८६८

सत्यरूप जोतिबा स्वामी यांस,

सावित्रीचा शिरसाष्टांग दंडवत,

पत्रास कारण की, आपले पत्र पावले. इकडील सर्व मंडळी खुशाल आहेत. मी येत्या पाच तारखेपर्यंत पुण्यास येईन. काळजी करू नये. येथे एक अघटित वर्तमान घडले की, गणेश नामे एक ब्राह्मण यास पोथी पुराणांचा नाद असून गावोगाव फिरून पंचांग सांगून उदरनिर्वाह करत करत गावी येता झाला. परंतु येथील नुकतीच वयात आलेली सारजा नामे पोरीवर त्याची प्रीती जडली असोन, त्यापासून तीस सहा महिने दिवस गेले आहेत. त्याचा बोभाटा होऊन गावातील दुरमती दुष्ट टवाळांनी त्या उभयतास आणून मारपीट करून गावातील गल्लीबोळातून वाजत-गाजत मिरवत ठार मारण्यास चालविले. ही भयंकर गोष्ट मला कळताच मी तेथे धावत पळत गेले व त्या लोकांस इंग्रज सरकारचे भय दाखविले व त्याना क्रूर कर्मापासून वळविले. सदुभाऊने तोडमोडी दावून बोलणे केले की, या भटुकड्याने या महारणीने आमचे गाव सोडून जावे. हे उभयतांनी कबूल केले. या उभयतांस मी वाचविले. तेणेकरून लोकांस अद्भुत वाटले. ती उभयंता मला देवी समजून माझ्या पाया पडून शोक करू लागली. यांचा शोक उणा होईना. त्यांची कशीबशी समजूत घालून या उभयतांस तुमचेकडे पाठविले आहे. अधिक दुसरे काय वर्तावे. कळावे ही विज्ञापना.

आपली
**सावित्री जोतीबा**

**पत्र क्र.३**

ओतूर जुन्नर,
२० एप्रिल, १८७७

सत्यरुप जोतीबा स्वामी यास
सावित्रीचा शिरसाष्टांग दंडवत,

पत्रास कारण की, गेले १८७६ साल लोटल्यानंतर दुष्काळाची तीव्रता अधिक वाढून सर्वजण व जनावरे चिंताक्रांत होऊन गतप्राण होत धरणीवर पडू लागली आहेत. माणसांना अन्न नाही, जनावरांना चारापाणी नाही. यास्तव कित्येक देशांतर करून आपले गाव टाकून जात आहेत. कित्येक पोटची पोरे व तरण्याताठ्या पोरी विकून परागंदा होत आहेत. नद्या, नाले, ओढे, शुष्क व कोरडे ठणठणीत होऊ मृगजलानी व्याप्त झाले आहेत. झाडाझुडपांनी पाने वाळून ती भूमीवर पडली आहेत. भूमीला भेगा पडल्या असून त्यातून अंगाला झोंबणाऱ्या झळाया बाहेर पडतात. अनेक लोक क्षुधित व तृषाक्रांत होऊन भूमीवर पडून मस्त आहेत. कित्येक निवडुंगाची बोंडे अन्न म्हणोन खातात व मूत्र पाणी म्हणोन पितात व संतोष पावतात. देहत्यागापूर्वी भुकेची तहानेची इच्छा पुरवितात व मृत्यूच्या स्वाधीन होतात, असे इकडचे भयानक वर्तमान आहे.

सत्यशोधक मंडळीनी या भागातील लोकास, अन्न, धान्य पुरविण्यास्तव, धीर देण्यास्तव दुष्काळनिवार कमिट्या स्थापल्या. भाऊ कोंडाजी व त्यांच्या उमाबाई मला जीवापलिकडे सांभाळतात. ओतुरचे शास्त्री, गणपती सखाराम, डुंबरे पाटील वगैरे आपल्या समाजाचे सत्यशोधक तुम्हास भेटण्यासाठी येणार आहेत. तुम्ही साताऱ्याहून ओतुरला येऊन नगरला गेले असते तर बरे होते. रा. ब. कृष्णाजी पंत लक्ष्मणशास्त्री हे आपणास विश्रुत आहेत. त्यांनी माझ्या समवेत दुष्काळी गावात जाऊन दुष्काळाने हैराण झालेल्या लोकांना द्रव्यरुपाने मदत केली. दुसरी चिंतेची बाब अशी की, सावकारांना लुटावे, त्यांची नाके कापावी अशी दुष्ट कर्मे या भागात घडत आहेत. तस्मात मोठेमोठे दरोडे पडत आहेत. हे श्रवण करून कलेक्टर येथे आला. त्याने मसलत केली. गोरे सार्जंट पाठवून बंदोबस्त बसविला. ५० सत्यशोधक पकडून नेले. त्याने मला बोलविले. तेव्हा मी उत्तर केले की आमच्या लोकावर आळ व कुभांड घेऊन कैदेत ठेवले ते सोडा. केलक्टर न्यायी आहे. तो गोऱ्या फौजदारास रागे भरून बोलला की, पाटील का दरोडे घालतात? त्यांना

सोडून दे, कलेक्टर दुष्काळ पाहून कष्टी झाला व कळवळून त्याने आपल्या केंद्रात ज्वारीच्या चार गाड्या पाठविल्या आहेत. तुम्ही जे लोक कल्याणकारी कार्य करीत आहात यास माझ्या हातून सदासर्वदा सहाय्य होत जावो व मी आपल्या दिव्य कर्तव्यकर्म, सेवा कार्यास सहाय्यभूत होवो, एवढीच माझी इच्छा आहे. अधिक उणे काय वर्तावे ही विज्ञापना-

**सावित्री जोतीबा**

# सावित्री जोतीबा विरचित

## बावन्नकशी सुबोध रत्नाकर

१८९१

## सावित्री जोतीबा विरचित

## अथ बावन्नकशी सुबोध रत्नाकर ।।प्रारंभ।।

### ।। उपोद्घात ।।

जयाचे मुळे मी कविता रचिते।।
जयाचे कृपे ब्रह्म आनंद चित्ते।।
जयाने दिली बुद्धिही सावित्रीला।।
प्रणामा करी मी यती जोतिबाला ।।१।।

रची काव्य सोपे भुजंगप्रयाते
मनी वृत्त आखून गाणे लिहीते
भ्रतारास अर्पी बहू आदराने
नसे ते इहीहो परी चिंतनाने ।।२।।

करी शूद्रसेवा दिले धैर्य त्यांना
क्रियाशील नेता अशा जोतिबाचा
नसे जात ज्याला तसे पंथ काही
तया वंदुनी सावित्री काव्य वाही ।।३।।

वदे सर्व शूद्रांस सावित्री भावे
सदोदीत हे काव्य आन्हीक व्हावे
कुळाची कथा गीत ग्रंथी लिही मी
गुलामी जनाचा इतिहास नामी ।।४।।

## ॥ सिद्धता ॥

इतिहास शोधी मनी इंडियाचा
अधर्मी इराणी जयी. जंगलीचा
तार्तरी रानटी लोक होते
जिताच्या सधर्मी घुसुनी रहाते ॥५॥

टिळा लावला आर्य जेते म्हणूनी
म्हणे उच्च आम्ही कडू शूद्र योनी
गुलामी रूढी लादुनी धर्म सांगे
पशुतल्या जीणे स्त्रिया शूद्र भोगे ॥६॥

मनुष्यत्व सारे हिरावून भक्षी
तयाला असे वेद ही सर्वसाक्षी
अहंकारी भूदेव मग्रूर झाले
तयी वेळेला बुद्ध जन्मास आले ॥७॥

अती भांडणे ब्रह्मे बुद्धात झाली
जयाची ध्वजा ब्रह्म लोका मिळाली
समाजात कल्पीत चौवर्ण बांधी
अमर्याद जाती तसे पंथ साधी ॥८॥

स्वधर्मी अती भिन्नता वर्ण जाती
तिथे स्थीरता ना वसे ऐक्य नीती
फिरे शिष्यिणी शंकराचार्य मेळा
पुकारे रुढी मूर्ख आचार पाळा ॥९॥

स्वत: भोगती सौख्य नाना अपार
कशी पुण्य बुद्धी तया लाभणार
मनी पाप सारे मनी भोग इच्छा
तशी स्वर्ग इच्छा धरी मोक्ष वांछा ॥१०॥

जना गांजती तर्कही ज्ञान सारे
मना भ्रष्टवी जीर्ण पोथी पिडा रे
असे सोंग हे ढोंग त्रीविप्र मंत्री
पुजा नाम संध्या जपे माळ तंत्री ॥११॥

अविचार अज्ञान मूर्खत्व जेथे
कसे काय राहील धर्मत्व तेथे
गुलामी कवाडी स्वधर्मीस कोंडी
करी व्यर्थ धर्मांध आक्रोश तोंडी ॥१२॥

मनू वर्ण कल्पी विषारी विकारी
अनाचार रूढी सदा बोचणारी
स्त्रिया शूद्र सारे गुलामी गुहेत
पशूसारखे राहती ते कुपात ॥१३॥

पुढे मुस्लमानी ख्रिस्ती रोज झाले
तयांनी कितींनी स्वधर्मी बाटविले.
तिथे भाटगीरी हिंदू या मिषाने
करीती स्वये चाकरी लीनतेने ॥१४॥

अधर्मी पराज्यी तिथे राज मंत्री
अती शूद्र झाले स्वधर्मी कुपात्री
स्वधर्मी अती यातना शूद्र भोगी
असे पशूतुल्य जीणे अभागी ॥१५॥

म्हणोनी शिवाजी स्वराज्या उभारी
समाजी अतीशूद्र लोकास तारी
मनुष्यात आणि सुखी ठेवी त्यांना
परी शिवसत्ता पुढे लाभली ना ॥१६॥

## ।। पेशवाई।।

पुढे पेशवाई तिचे राज्य आले
अनाचार देखी अती शूद्र भ्याले
स्वथुंकी थुंकाया गळा गाडगे ते
खुणा नाश या ढुंगणी झाप होते ॥१७॥

स्वराज्यी स्वधर्मी परी व्याघ्र दाढी
असंतोष त्यांचा कुणाही न काढी
प्रजेला एकसारखे वागवीती
तरी शूद्र सारे स्वधर्मी रहाती॥१८॥

तुला बोलवी रावबाजी धनी ग
स्वपत्नीस धाडी निर्लाजा पती ग
छळे ब्राह्मणाला अशी स्त्रैणशाही
मुखा बोलती ही जळो पेशवाई ॥१९॥

पहा शंकराचे लुटी पूज्य क्षेत्र
अशी माजली पेशवाई विचित्र
पुढे जाहली मूर्खसत्ता विनाश
नसे दुःख कोणा नसे सुख आस ॥२०॥

छळी स्त्रीस शूद्रा बहू पेशवाई
अशा कारणे इंग्रजी राज्य होई
ध्वजा इंग्रजी लाविता बाळ नातू
तया निंदती रोरवातील जंतू ॥२१॥

मिळे इंग्रजी फूस शूद्रादिकांना
लढाई कराया जमे जाति नाना
पराभूत हो पेशवाई करूनी
तिथे आणती शूद्र आंग्लाई शहाणी ॥२२॥

## ।। आंग्लाई।।

करी इंग्रजी नोकरी ते अशूद्र
परी शूद्र स्त्रीया रहाती अशूद्र
तयी आंग्ल सत्ता उदे-हिंद देशी
प्रजेला सुधारी मराठी प्रदेशी ॥२३॥

इतिहास सत्ये घडे ते टिपीतो
तसा जोतिबाचा इतिहास ज्ञातो
अशी अव्वली इंग्रजी रम्य साची
तशी स्फूर्तिदायी कथा जोतिबाची ॥२४॥

मनुष्ये शिकाया असे पात्र प्राणी
वदे आंग्लशाही अभीजात वाणी
म्हणोनी शिकाया डोळे आपणाला
स्त्रिया शूद्र सारे शिके वाचयाला ॥२५॥

पहा गर्जतो इंग्रजीचा नगारा
तसा वाटतो सत्तेचाही दरारा
अडाण्यास देती शिकाया सुसंधी
दरोडे, खुनी, चौर्य गुन्ह्यास बंदी ॥२६॥

प्रभू येशू ख्रिस्ती भटांची प्रशाला
लळा लावुनी शिकवी शूद्र बाळा
म्हणे मेंढरे ही कशी ख्रिस्त हाकी
फुका बोलती ही उगा बोंबठोकी ॥२७॥

असे शूद्र ''युगानुयुगे'' अभागी
नसे सूख काही सदा दु:ख भोगी
पशूसारखे मौन होऊन राही
अशा या दशेची कुणा लाज नाही ॥२८॥

जया जन्म-मृत्यू कळेना जराही
म्हणोनी पशूसारखे कष्ट नाही
नसे बुद्धि ज्याला नसे ज्ञान काही
अशा मानवाला कधी सूख नाही ॥२९॥

म्हणे बांध शेती पहा या विहीरी
पहा पीक माझे कशी छान ज्वारी
मला गौरकांता तशी गोड पुत्री
असा दंभ ज्याला नसे तो सुपात्री ॥३०॥

करी जो बहू पाशवी दृष्ट कृत्ये
पराच्या सुखाचा करी द्वेष नित्ये
मनी लोभ ठेवी परस्त्री धनाचा
सदाचार नाही पशू हाच साचा ॥३१॥

अशा मानवाला नसे धर्म नीती
पशूसारखी त्याजला हीन वृत्ती
तयाचा हा जन्म वायाच गेला
तसा शूद्र हा शून्य माणूस झाला ॥३२॥

पहा इंग्रजीच्या सत्तावीस साली
जनी कोड सत्ताविशी उक्त झाली
असा लोभ हा काळ सुधारणेचा
पुणे स्वगृही जन्म रे जोतिंबाचा ॥३३॥

## ॥ जोतिबा॥

चिमा थोर माता पिता गोविंदाजी
तयाचे कुशी जन्मला जोतिबाजी
सती धन्य माता यती धन्य पीता
तया वंदिते आदरे जोतिकांता ॥३४॥

नऊ मास झाले चिमा माय मेली
चिमू जोतिची फार आबाळ झाली
परी त्याजला मानवी झोप घ्याया
मिळाली सगुणा महादेव-माया ॥३५॥

मिळे ज्ञान पाद्री निधर्मी विजाती
तिथे वाढला खेळला बाळ जोती
सगुणा दयासागरी ज्ञान वाढे
तसे काढतो, घोकतो अंक पाढे ॥३६॥

पुढे गावठी जोति शाळेत जाई
गुरूजीकडूनी धडे पाठ घेई
परी शिक्षणाला दुष्ट खीळ मारी
तया छेदुनी मुन्सिलीजीट तारी ॥३७॥

करी जोति शेती घडे लग्न त्याचे
घेई इंग्रजीचे धडे छान वाचे
मला आऊला पाठ देई शिकाया
असामान्यतेचा भरी भव्य पाया ॥३८॥

खरे ज्ञान संपूर्ण घेऊन जोती
मनी स्फूर्ती सूचीर सेवा सुचिती
मुलींना तशी शूद्र मुलास शाळा
मुळारंभ ऐसा गुंफीतो सुमाळा ॥३९॥

करी फार कौतुक पाद्री विधर्मी
परी त्रास देती शहाणे स्वधर्मी
मला निंदती शेण धोंडेही मारी
अशा संकटाला खुबीने निवारी ॥४०॥

स्वतःच्या विहीरी महारास वाटा
मनुष्यत्व दावी तयाचा सुवाटा
दलीतास आदेश सद्बोध साचे
न भूतो चमत्कार जोती युगाचे ॥४१॥

पथा चूकल्या कामिनी पोटुशीना
प्रसूतिगृही सोय मोलाचि नाना
सूईणी, दवा, पाणी खाणे, पिणेही
व्यवस्था अशी सर्व सावित्री पाही ॥४२॥

शिशु आश्रमी पाळणे हालविती
अशा दिव्य कार्यात तल्लीन जोती
एका रात्रि मारेकरी दोन आले
परी जोतिला पाहुनी लीन झाले ॥४३॥

तुकाराम जैसा तसा संत जोती
सुधा ज्ञान देई जना रीतिभाती
पुढारी क्रियाशील द्रष्टा प्रसिद्धी
वदे जोति रूढी असे ती असिद्धि ॥४४॥

समस्तांस सोपा सत्यधर्म दावी
वदे उच्च वा नीच कोणी न भावी
किती पुस्तिका पुस्तकेही लिहीली
तशी काव्यसारंग गाणीहि केली ॥४५॥

म्हणे जोतिबा इंग्रजी माय पान्हा
पिवूनी बळी हो अभिजात कान्हा
प्रयत्ने धडे शिक्षणाचे करी रे
संसारात शांती समाधान घेरे ॥४६॥

अनायास संबोधिती शूद्र सारे
मुगाली इरी काकेयी आर्य गोरे
अशा कल्पनाचा इतिहास कावा
सत्यासत्य संशोधुनी बोध घ्यावा ॥४७॥

## ॥ उपसंहार॥

पुराणे कथा दर्शनि खूप वाची
असे इंडिया शूद्र व्याख्या तयाची
अहा जोत जोती जळे शूद्र कार्या
तयांचा प्रणेता वदे जोति भार्या ॥४८॥

निराधार दु:खी स्त्रियांचा पुढारी
दुबळ्या अडाणी जनांचा-मदारी
कृती तैसा खरा ज्ञानयोगी
स्त्रिशूद्रा करीता इही दु:ख भोगी ॥४९॥

जरी जन्मला शूद्र माळी म्हणोनी
खरा म्हार तो त्यास माळी न मानी
चिरंजीव जोती मनु उच्च झाला
नमस्कार माझा अशा जोतिबाला ॥५०॥

मनी कल्पना छान गोष्टी रचावे
जना ग्राह्य होईल ऐसेच गावे
मनी इच्छुनी काव्य केले स्वभावे
तुम्ही गाऊनी त्यातले सत्य घ्यावे ॥५१॥

जरी यातले थोडके ज्ञान झाले
तरी या श्रमाचे खरे चीज झाले
मला काव्य माझे कसे सत्य सांगा
मनोहार का रम्य तुम्हीच सांगा ॥५२॥

॥ इति बावन्नकशी सुबोध रत्नाकर समाप्त ॥

मिती शुक्ल पक्ष १५ शके १८१३ रात्री २ वाजून
२० मिनिटानी ही पोथी लिहून पुरी केली असे॥

सही/-

**सावित्री जोतिबा फुले. द. खु.**

मातुश्री

# सावित्रीबाईंची भाषणे

**विषय :**

उद्योग

विद्यादान

सदाचरण

व्यसने

कर्ज

**प्रकाशक :**

शास्त्रीमहाघट

१८९२

वत्सल प्रेस

**बडोदा**

१

# उद्योग

उद्योग याचा अर्थ म्हटला म्हणजे यत्न असून सदासर्वकाळ मेहनत करणे. या सदराखाली विद्याभ्यास करणे, शेतीत राबणे, व्यापारधंदा करणे, की ज्या योगाने आपली उपजीविका होऊन इतरांच्या उपजीविकेला हातभार लावता येईल. मनुष्यमात्राच्या सुखाला साधनभूत असे सर्व उद्योगधंदे या सदरात येत असून त्या योगे मनुष्याची सुखबुद्धी होत असते. मनुष्याच्या सुखात भर घालणारे पैसा हा एक मुख्य साधन असून त्याची गरज सर्व मानवांना असून ती उद्योगातून भागत असल्याविषयी सर्वांस विदित आहे. ''दे रे हरि पलंगावरी'' किंवा ''बाबा हे जांभूळ माझ्या हाताजवळ पडले ते माझ्या तोंडात टाक.'' असे म्हणणारा माणूस आळशी मनुष्य आहे असे कोण म्हणणार नाही? यासाठी दिवसभर न थकता उद्योग करणे हा मनुष्याचा उत्तमधर्म असून तो त्याचा खरा कल्याण करणारा मित्र होय. या मित्राशिवाय कल्याण करणारा दुसरा कोणी मित्र जगाच्या पाठीवर नसतो याची प्रत्येकानी खूणगाठ बांधून ठेवावी.

हा मित्र आपली उपजीविका करणारा व आपल्या सुखात भर घालणारा असल्यामुळे उद्योगाचीच संगत धरून त्यावर भरवसा ठेवल्यास, तो आपल्या उपयोगी सतत पडेल हे मी निश्चयाने तुम्हांस सांगत आहे. देव हा एक काल्पनिक सहाय्यकर्ता आहे असे बहुतेक लोक समजतात. पण हा सहाय्यकर्ता सत्य नसून बेभरंवशाचा असून मानव व उद्योग यांत भेद पाडून त्यांच्यात शत्रुत्व उत्पन्न करून माणसास आळशी बनवितो. पापपुण्याप्रमाणे मनुष्याला परिस्थिती प्राप्त होत असून त्यास सुखदु:खे प्राप्त होत असतात. ह्या प्रालब्धाच्या कल्पनेमुळे महार, मांग, कुणबी, मराठी या साऱ्या जातींतील लोक नीच ठरून हजारो वर्षे नीच राहिले. ज्ञानधारी व अर्थधारी लोकांच्या ब्रह्माला त्यांना सुखी करता येत नसून लोकांच्या

पूर्वसंचितात ढवळाढवळ करता येत नाही. त्याला दैन्यामध्ये काहीच ढवळाढवळ करता येत नसल्याने शूद्रादी अतिशूद्र लोकांनी पूर्वसंचित समजून पशूंच्या जीवनाचे जगावे, असे पक्के होऊन त्याप्रमाणे आजतागायत जगत असून त्यांना आपण मनुष्यप्राणी आहे याचा विसर पडला व ते पशूंप्रमाणे गुलामगिरीचे उद्योग करू लागले. त्यांच्या उद्योगात ज्ञान नसून ढोर मेहनत असते ती त्यांना फक्त जगण्यास मदत करीत असते. यावरून उद्योग दोन प्रकारचे असून एकक विचारी उद्योग व दुसरा विचार नसलेला उद्योग. अभ्यास करणे हा एक उद्योग आहे. या उद्योगात डोळे, कान व बुद्धी या इंद्रियांची जरुर असते. "देग माई भाकरी मला" असे ओरडत भीक मागणे हाही एक उद्योग पण त्यास विचार नसलेला उद्योग म्हणतात. हात पाय वगैरेंचा उपयोग होणाऱ्या उद्योगास बुद्धीचेही सहाय्य लागत असते. मनुष्य प्राणी मानसिक व शारीरिक उद्योग करू लागल्याने त्याच्या उद्योगातून फार उत्तम प्रकारची फळे उत्पन्न झाली असून, याचा विचार केला असता मन थक्क होऊन भिंगरीसारखे भुंगायला लागते. युरोपियन लोकांनी उद्योग करून घड्याळे, दुर्बिणी, आगबोटी, आगगाड्या, गिरण्या यांचा शोध लावून जिकडे तिकडे उद्योग सुरू केले. त्यांचे हे उद्योग त्यांच्या अचाट बुद्धीची फलनिष्पत्ती असून, त्याचा उपयोग मनुष्यत्व वाढविण्यासाठी असून परंपरेने अज्ञानात खितपत पडणाऱ्या शूद्रादी अतिशूद्रास उद्योगी बनविण्यास उपयुक्त होणारा आहे; यात यत्किंचित संदेह नाही. युरोपियन लोक देवावर विश्वास ठेवणारे असते तर ते अशा तऱ्हेंने अद्भुत गोष्टी न करते. त्यांच्या उद्योगात वेळेचे फार महत्त्व असून ते कोणतेही काम वेळच्या वेळी करीत असून, आपल्या आयुष्याचा काटेकोरपणे हिशेब करतात. इंग्रज लोकही पूर्वी रानटीच होते. परंतु रोमन लोकांच्या सहवासाने ते उद्योगी बनले. यामुळे त्यांचा देश उद्योगाचे कोठार बनून, तेथील लोकांचे सुधारणुकीचे पाऊल पुढे पुढे पडून ते विद्या, कला व उद्योगधंदे यांत प्रबल झाले. आपल्या देशात थोडेसे इंग्रज लोक व्यापाराला आले आणि त्यांनी एक प्रचंड राज्य स्थापन केले. हा त्यांच्या दृढ उद्योगाचा व बुद्धीशक्तीचा चमत्कार आहे. त्यात दैवाचा संबंध नाही. दैव, प्रालब्ध यावर विश्वास ठेवणारे लोक आळशी व भिकारी असून त्यांचा देश नेहमीच दुसऱ्याच्या गुलामगिरीत राहतो; याचे ढळढळीत उदाहरण म्हणजे आपला हिंदुस्थान होय.

युरोपियन लोक म्हणतात, दोन हजार वर्षांपूर्वी हा देश सुधारलेला

येथील लोक उद्योगी होते व ज्ञानी होते. पण इराणी, हूण, तार्तर लोकांच्या म्हणजे त्यांनाच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य ही नावे असून त्यांची साऱ्या सुधारणेचा विध्वंस केला. येथील लोकांना शूद्रादी अतिशूद्र बनवून त्यांना दैवदेवतांचे नादी लावून दैवावर भरंवसा ठेवण्यास शिकविले. या द्विजाच्या आगमनाने येथील लोकांचा अध:पात होऊन ते पशुतुल्य बनले. इंग्रजी लोकांच्या आगमनाने येथील शूद्रादी अतिशूद्रांना हळूहळू विद्येची गोडी लागत असून त्यांचे क्रमक्रमाने पाऊल उद्योगाकडे पडत चालले आहे. यावरून आपण सारे शूद्रादी अतिशूद्र लोक पशुजीवनातून खऱ्या मनुष्यजीवनाकडे जात आहोत असे खचित अनुमान करता येते. उद्योग हा ज्ञानस्वरूप असून आळस हा दैवाचा मित्र आहे. उद्योगी मनुष्य आपले सुख वाढवून लोकांना सुखी करण्याचा प्रयत्न करतो. तर दैववादी, ऐतखाऊ आळशी मनुष्य सदोदित दु:खी राहून लोकांच्या सुखात माती कालविण्याचे कृत्य करतो. आळस दरिद्रीपणाने लक्षण आहे. ज्ञान, धन आणि मान यांचा तो वैरी असून आळशी मनुष्यास या तिन्ही गोष्टी मिळत नाहीत. तर एवढी हानी होत असून त्यास मनुष्यत्वही कंटाळून सोडून जाते. अशी मनुष्याची वाईट स्थिती आळस हा अवगुण करीत असतो. यासाठी उद्योग करीत राहणे हे मनुष्याचे आद्य काम असून तो त्यायोगेच सुखी होईल हे मी तुम्हांस खात्री देऊन सांगतो. इंग्रजी सरकार येथील शूद्रादी अतिशूद्रास ज्ञान देऊन उद्योगी बनविण्यास झटत आहे ही चांगली गोष्ट असून त्याबद्दल सरकारचे आभार मानले पाहिजेत. सरकारने काय करायला पाहिजे, हे मी सरकारला सांगितले आहे.

२

# विद्यादान

बहुत माणसांजवळ दया, उदारता, परोपकार वगैरे सद्‌गुण असून तारतम्याने व दूरदृष्टीने त्यांचा सदुपयोग न होता त्याचा भलताच परिणाम घडून आलेला आढळतो. गुन्हेगारास दया दाखविणे. हे गुन्हेगाराच्या दुष्ट कार्यात भाग घेणे असे होईल. दान देणे हे चांगले असले तरी ते आपण मोठे दानशूर आहोत हे दाखविण्याच्या भावनेने दिले असल्यास ते सत्पात्री गेले असे होत नसून केलेले दान घेणाऱ्यास ऐतखाऊची सवय लावण्याचे कृत्य करते. द्रव्यदानासारखेच अन्नदानाच्या योगाने दुर्गुणांना वाढवून त्याचे परिणाम समाजास भयंकर भोगावे लागतात. दया, दानधर्म इत्यादीसंबंधी माणसाचे अंगी जी प्रवृत्ती आहे तिचा उद्देश दुसऱ्याच्या दुःखात वाटेकरी होऊन त्यांचे संकट किंवा आपत्तीत मदत करणे हा असून त्याप्रमाणे परोपकारी वृत्तीचा मनुष्य दुसऱ्यास मदत देत असतो. परंतु दुःखे, संकटे, आपत्ती ही कोणास येतात; तर ती आळशी, व्यसनी व मूर्ख माणसावर येतात. बऱ्याच अंशी त्यांच्यावर आलेली आपत्ती या त्यांच्याच अवगुणामुळे आलेल्या असून त्याला ती एक शिक्षाच असून तीमुळे दुर्गुणी मनुष्याचे दुर्गुण नष्ट होण्यास उपयोग होतो असा अनुभव येतो. सरकार गुन्हेगारास जबर शिक्षा करते या भयाने गुन्हेगार लोक चोरी, जबरी वगैरे गुन्हे करण्यास वचकतात व त्यापासून दूर राहतात. तसेच दरिद्रीपणा, दुःखे, हालअपेष्टा इ. शिक्षेचे भय बाळगल्यास मनुष्याची सुधारणा होऊन आळस, अविचार, उधळपट्टी इ. दुर्व्यसने यापासून मनुष्य दूर होऊन उद्योगी बनेल. तो परावलंबी राहणार नाही. यावरून दया दानधर्म करण्याचा ज्यांना छंद आहे अशा लोकांनी आपल्या क्रियेचा काय परिणाम होईल, याचा विचार करून ती कृत्ये केली पाहिजेत. सत्कृत्यापासून सुद्धा समाजावर वाईट परिणाम घडण्याचा संभव असतो.

मनुष्य सुधारला म्हणजे त्याला दुसऱ्याची मदत घेण्याची लाज वाटावी. एखादेवेळी आपणावर प्रसंग पडला तर दुसऱ्याचे मदतीवर आपली उपजीविका निरुपायास्तव करणे भाग पाडले, तरी त्याची हाय न घेता माझ्यावर आलेले संकट मी उद्योग व श्रम करून निवारण करण्यास कसा समर्थ होईन; याची त्याला काळजी लागावी. पैसा धर्म करण्यास दात्याला गोड लागावे पण ते घेत्याला रुचू नये अशी समजूत झाली म्हणजे दान, धर्म, दया, उपकार इत्यादी गुणांपासून समाजावर दुष्ट परिणाम उत्पन्न न होता कल्याणकारी कायदा होईल.

आळस, परावलंबन वगैरे दुर्गुण न वाढण्यास व मनुष्याच्या अंगचे सद्गुण वाढण्यास उपयुक्त असा कोणता धर्म असेल; तर विद्यादान होय. विद्या देणारा व विद्या घेणारा असे दोघेही या धर्माच्या योगाने खरीखुरी माणसे बनतात. या धर्माच्या शक्तीमुळे मनुष्यातील पशुत्वाचा लोप होतो. विद्या देणारा धैर्यशाली, निर्भय बनून विद्या घेणारा सामर्थ्यशाली शहाणा बनतो. इंग्रज भट लोकांना विद्यादान करून लोकांना शहाणे करतात. हे खरे शहाणे भट. आमचे भट लोकांना अशिक्षित ठेवण्यात तरबेज खरे. तथापि ते पक्के मूर्ख होत. इराणी हिंदुस्थानात घुसले व हिंदुस्थान आपल्याच बापाचा मानू लागले. हूण आले तेव्हा इराणी म्हणाले, ''हा देश तुमचा नाही.'' पण हूण घुसले व आपल्याच बापाचा मानून राहू लागले. मोगलाच्याही बापाचा हिंदुस्थान होता की काय, कोण जाणे! जेथे त्यांनी आपले पाय येथे रोवले तेथे इतिहास असा आहे की, हिंदुस्थान हा इंडियन लोकांचा असून त्यांच्यावर परकीयांनी राज्य केले. त्याला कारण अज्ञान हेच होय. दोन हजार वर्षे इंडियन लोक अज्ञानात राहून पशुजीवन जगावेत हे महदाश्चर्य नसून भटभिक्षुकांचा तो कावा आहे. तो आपणास इंग्रजी ज्ञानाने उमगला असून विद्यादान करणेविषयी व विद्या प्राप्त होण्यास लोकांस मदत करणेविषयी लोकांची वासना बळावेल, त्या वेळी आम्ही सुधारण्याच्या मार्गास लागू. यामुळे समाजाचे हित होऊन प्रत्येकाचे सुख वाढेल. इंग्रज सरकारने ज्ञानदानासाठी शाळा काढल्या; पण त्या थोड्या असून त्या तेवढ्यावरच राहिल्या तर सारा हिंदुस्थान शिकलेला होण्यास आणखी दीडशे वर्षे लागतील, अशी माझी ठाम समजूत आहे. तरी देखील मी म्हणते की, सरकारने शिक्षणप्रसाराचा आपला वेग वाढवून सारे लोक विद्या शिकल्याशिवाय त्याने येथून जाऊ नये. महार, मांगादी शूद्र अतिशूद्र-प्रत्येक गावात बारा बलुते, बारा आलुते व धनगर, माळी, कुणबी इत्यादी लोक राहत आहेत. त्या लोकांजवळ ज्ञान, कला,

चिवटपणा वगैरे गुण आहेत पण त्याचा उपयोग आजपर्यंत सरकारने करून घेतला नाही. त्यांच्या गुणांकडे हेळसांड व दुर्लक्ष करून राजे लोकांनी राज्ये केली. शूद्रादी अतिशूद्रांजवळ नि:संशय अनेक गुण वसत असून अज्ञानामुळे त्यांना आपल्या बुद्धीचा व कौशल्याचा उपयोग कसा व कोठे करावा हे माहीत नाही. अगर माहीत असल्यास आपल्या देशात आपण काय उत्पन्न केले असता ते लोकांना उपयोगी पडेल की नाही, लोकांना कोणती वस्तू केली असता देशाला व आपल्याला बरकतं होईल हे त्यांच्या मनी उमजत नसून कळत नाही आणि सरकारही त्यांना काही कळवीत नाही, तशा शूद्रादी अतिशूद्र जातींतील लोकांचा असा मूर्ख स्वभाव आहे की, त्यास कोणी मार्ग दाखविल्याखेरीज ते स्वत:च्या अकलेने किंवा धाडसाने कोणताही उद्योग करायास धजत नाहीत. त्यांचा स्वभावही मनमिळावू नसून वाईट बनलेला असून त्यांना आपण कसे सुधारावे हे उमजत नाही व अशा अज्ञानामुळे ते अर्धपोटी तर कधी कधी पूर्ण पोटी उपाशी राहिले आहेत. या लोकांना उपजीविकेचा मार्ग दयाळू सरकारने दाखवून किंवा खेड्यातील धनिक माणसाने प्रत्यक्ष धंदे उभारून खेड्यातील कामगिरांनी आपल्या गुणांचा धनिक माणसास उपयोग होईल असे वर्तन ठेवले पाहिजे. आज जर असे वर्तन त्याने ठेवले नाही, तर त्या परिस्थितीचा दोष त्यांचेच माथी येतो हे सांगणे नलगे.

३

# सदाचरण

सदाचरण हे मनुष्यास अधिक सुख प्राप्त करून घेण्याचे व्रत आहे. या व्रताने सर्व संसार दु:खाचा नाश होतो. हे व्रत करावयास द्रव्य फार पाहिजे असे कितीएकास वाटते. परंतु द्रव्याचा आणि सदाचरण व्रताचा काही संबंध नाही. सदाचरणावर पूर्ण निष्ठा पाहिजे. मनुष्याने सर्वकाळ काही तरी परोपकार, सत्कार्य करण्याचा उद्देश मनात धरून ते चिकाटीने तडीस जाण्याची काळजी घेतली पाहिजे. सदाचरणी मनुष्यावर लोकांचा विश्वास बसतो. हा खराखुरा मनुष्य आहे; तो खोटे बोलत नाही अशी लोकांत खात्री असल्यामुळे त्याच्याशी खोटे बोलण्यास ते भितात. यास्तवे सदाचरण हा गुण अंगी बिंबवण्यासाठी आपल्या भोवताली वावरत असलेल्या मनुष्याचे आचरण कित्यासारखे गिरविले पाहिजे. म्हणजे आपणास, सदाचारणाचे व्रत चांगले असून त्यायोगे त्याचे फळ मिळेल व आपला संसार सुधारेल याची खात्री पटेल.

पुणे शहरात बल्लाळपंत गोवंड्ये हे एक गृहस्थ राहात. ते सदाचरणाचे व्रत करीत असून दुराचरणाचे वर्तन करण्यास नेहमी भीत असत. त्यांची स्त्री गंगामाई, गंगेसारखी निर्मळ व तांदळासारखी धवल असून तीही फार सदाचरणी आहे. लोकांना मदत देण्यास सदोदित दक्ष असते. या सदाचरणी उभयतांस एक पुत्र झाला तेव्हा त्यांनी आपल्या पुत्राचे नाव 'सदाशिव' ठेवले. तो मुलगा दिवसानुदिवस मोठा होत चालला हे पाहून त्यांनी आपल्या पुत्रास पंतोजीच्या शाळेत विद्या शिकण्यासाठी पाठविले. आपल्या पुत्रास शिकविणे हे मातापित्यांचे कर्तव्य आहे. जे मातापिता आपल्या पुत्रास किंवा कन्येस शिकवीत नाहीत ते आपल्या पुत्राचे व कन्येचे शत्रू असतात असे समजावे; आणि म्हणूनच आईबापांनी आपल्या मुला-मुलीस विद्या शिकवावी. विद्येच्या योगे सदाचरणाचे व्रत पार पाडण्यास ते

समर्थ होतात.

बल्लाळपंत आपल्या लाडक्या पुत्रास उपदेश देई की, हे सदाशिवा, विद्या हे मनुष्याचे श्रेष्ठधन आहे. एका संस्कृत ग्रंथात म्हटले आहे की-

"विद्यवित्तविहीनेन किंकुलीनेन दोहिनाम्
अकुलोनोपि यो विद्वान् दैवतैरपि पूज्यते"

याचा अर्थ असा की, विद्या-धन-रहित जो मनुष्य; तो मोठ्या कुळातला असला तथापि त्यास कोणी पुसत नाही. तुच्छ समजतात. हीन कुलीन असूनही तो विद्यावंत असेल तर त्याची पूजा देवही करतात. तो लोकांत मान्यता पावतो.

मुलगा सदाशिव, बापाचा उपदेश, "नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे." असे करीत नसे, तो आईबापाचा उपदेश ह्दयात कोरून ठेवीत असे. तो सरकारी शाळेत लिहिणे, वाचणे, गणित, व्याकरण, खगोल व भूगोल शिकला. मनापासून अभ्यास केल्याने निरनिराळ्या इयत्तेत पास झाला. सदाचरणी आईबापाचा मुलगा दुराचारी क्वचित निपजायचा. सदाशिव धीट, बोलका व हुशार असल्याने गोरासाहेब कलेक्टर त्यावर प्रसन्न झाला. नंतर त्यास मोठी बक्षिसे, वस्त्र अलंकार दिले आणि तो सरकार कामास योग्य आहे असे मनात आणून, त्याला कमाविसदाराच्या हाताखाली नेमले. कमाविसदाराच्या हाताखाली काम करणारे कारकून लाचखोर असतात. सदाशिवास एका कामाकरता एका श्रींमत शेतकऱ्याने लाच देण्याचे भाषण केले. सदाशिवाने उत्तर दिले, 'पाटील असले दुष्ट भाषण करू नये. जे होणे ते मी पहाणीच्या वेळेस होईल. लाच कोणी देऊ नये व लाच कोणी घेऊ नये. सरकारी काम इमानाने व प्रामाणिकपणाने केले असता समाधानाचा अलभ्य लाभ प्राप्त होतो. सदाशिवाला कलेक्टरचे हाताखाली दप्तरदाराची जागा दिली. तो कलेक्टरसाहेबाचे स्वारीबरोबर प्रांताची पहाणी करी. पहाणीच्या वेळेस जमीन ज्याप्रमाणे असेल त्याप्रमाणे यथान्याय प्रती करून जमिनीवर धारा बसवीत असे. तेणे करून त्यावर सरकारचा विश्वास पूर्ण बसून तो मोठा अधिकारी झाला. या रीतीने लहानपणापासून त्याने विद्येचा अभ्यास करून सदाचरणाचे व्रत अंगीकारले. तेणे करून चांगले काय व वाईट काय हे त्यास समजू लागले. सत्कार्य काय, दुष्टकर्म काय हे कळू लागले. लोकांत त्याची मान्यता झाली.

# ४

# व्यसने

व्यसन हे मनुष्यास अधिक दु:खे प्राप्त करून देण्याचे दुष्कृत्य आहे. कोणत्याही व्यसनाने संसारसुखाचा घात होतो. दारू, भांग, अफू, बिडी, चिलीम वगैरे व्यसने बहुत असून त्यापासून शरीराची, पैक्याची व संसाराची मात्रा होते. व्यसनापासून मनुष्यांची बुद्धी भ्रष्ट होते व माणुसकी नष्ट होते. तस्मात व्यसन हे मनुष्याची प्रतिष्ठा वाढविणारे नसून मनुष्यत्वास बाध आणणारी खोड आहे. यास्तव ती विलंब न करता सत्वर सोडून द्यावी.

दारू हे व्यसन बहुत कालपर्यंत मनुष्यामध्ये वास करीत असले तरी त्या मनुष्याची आतडी नासते. गांजा-तंबाखू चिलमीत भरून त्यास आग लावून ओढीत राहणारे व्यसनी फार दिवस जगत नाहीत. त्यांचे शरीर दुर्बल बनते. माजूम या कुंजीपासून उन्मत्त वायू होऊन मनुष्य धुंद होतो. अंती तो हातपाय झाडून तडफडून मरतो. मनुष्य व्यसनाने बुद्धिहीन झाला म्हणजे त्याच्या जवळचा लत्ता-कपडा पैसे वगैरे जे काही संसारोपयुक्त सामान असेल; ते हळूहळू दुसरीकडे जाते. हे व्यसनी मनुष्यास समजत नाही. कोणत्याही व्यसनाने मनुष्याचा विचार पिंड धुंद होतो. व्यसनाच्या कैफात तो आपले मनुष्यत्व विसरून जातो व कैफाच्या धुंदीत मी कोण, माझी योग्यता काय हे त्यास समजत नाही. त्याचे मन जनावराप्रमाणे वापसून चालता उठता, खाता, पिता हवा तसा बडबडतो. मग लोकही त्याची हवीतशी टिंगल व कुचेष्टा करू लागतात. सभ्य माणसे त्यापासून दूर राहतात. व्यसनाधीन झालेल्या मनुष्यास आपले व्यसन सोडून देणेची फार मारामार पडते. व्यसन न सुटल्यामुळे पैशाची हानी व संसाराची परवड होऊन व्यसनी लोक लवकरच धुळीस मिळतात; हे उदाहरणाने सिद्ध करून सांगते.

उसळी नावाचे एक गाव आहे. या गावात दारुडे बहुत असून गावच्या

पाटलास दारूचे व्यसन जडले होते. तेणे करून गावात अनाचरण होऊ लागले. पाटील विद्याहीन असल्यामुळे त्यांच्या भोवती मूर्ख मित्रमंडळींचा गोतावळा जमला होता. सज्जन लोक त्याच्यापासून दूर होऊ लागले. त्याला चांगल्या लोकांचा सहवास मिळेनासा झाला. व्यसनाने अनेक दोष व न्यूने अंगी जडतात. ''मद्यपीच्या घरी अवदशा वास करी'' या म्हणीप्रमाणे पाटलाच्या घरात अवदशा शिरून त्याच्या प्रपंचास अवकळा प्राप्त झाली. चारदोन मित्रांसमवेत यथेच्छ दारू घ्यावी ती अंगी भिनली की मनास वाटेल ते भकावे. जुगार खेळावे. दंगामस्ती करावी व रांडांची पाळे हुडकावी. त्याचे हे पशुतुल्य अत्याचार गोऱ्या अधिकाऱ्याच्या कानावर गेले. त्याने त्याची पाटिलकी काढून घेतली व त्याचे मुलाचे स्वाधीन केले. तदनंतर पाटील लवकरच छाती फुटून मेला. यास्तव मनुष्यांनी सावध राहून व्यसनाला हुंगूनही पाहू नये. कैफी लोकांची संगत आपणास न लावण्याविषयी खबरदारी घ्यावी. आपण विद्या शिकावी व आपल्या मुलाबाळांना विद्या शिकविण्याची काळजी घ्यावी. विद्या नसणे हे नाशाचे व अनर्थाचे मूळ आहे. विद्या नसल्याने सत्यासत्य ओळखता येत नाही. तुकारामबुवानी सांगितले की.....

''सत्यकर्मे आचरे आचरे:सत्यकर्मे आचरे रे।
सत्यकर्मे करीत हित:वारेल दु:ख असत्याचे।
सत्य रुचे भलेपण: वचन ते जगासी।
जेणे वाढे अपकीर्ती: सर्वार्थी ते त्यजावे।
तुका म्हणे खोटे वर्ज्य: निंद्य कर्म काळीमा॥

कैफापासून बहुत तोटे होतात. जुवे खेळण्यापासून काय अनर्थ घडतात. ''रांडेचा जो संग करी। त्याचे पूर्वज नर्कद्वारी।'' दारूबाज, जुवेबाज व रंडीबाज ही मनुष्ये माणुसकीला लाथाडून लावतात. ती दुराचारी बनतात. या तीन बाजीपासून मनुष्य दूर राहील तर त्याचे कल्याण होऊन तो समाधानी पावेल. या तीन बाजींमुळे कैक सुखी माणसे दु:खी होऊन वेडे झाले व कुत्र्याच्या मौतीने मेले. अब्रूदार माणसांना कोणतीही वाईट व्यसने नसतात. हे नेहमी पाहावे व त्यापासून धडा घ्यावा.

५

# कर्ज

"ऋण काढून सण सांजरा" या म्हणीत वेडेपणाचा अर्थ भरलेला आहे. या अर्थापासून आपणास बहुत बोध होऊन शहाणपणा शिकता येईल. ऋण काढून सण साजरा करावयाचा आणि ऋणाच्या दाढेत पडून आपल्या संसाराला घोर लावावा हा वेडेपणाच नव्हे काय? प्रत्येकाला संसारात एखादी गरज भागविण्यासाठी ऋण काढावे लागते. पण ऋणकोस त्याचा फार त्रास होतो. अनेक वेळा अपमान, अडचणी सहन कराव्या लागतात. सर्व कर्ज बाजारात अनुभव समान असतात व तेणे करून सर्वांचे मत असे की, "शहाण्यांने कर्ज काढू नये." यात अनुभवाचा अंतरभार झालेला आहे. प्रत्येक खेड्यात कर्जबाजारी लोक असतात. त्यात कित्येक कामधंदा करीत नाहीत. आळशी असतात. आपण काही तरी उद्योग करून जगावे व कुटुंबातील माणसास थोडाफार हातभार लावावा अशी त्यास बुद्धीच होत नाही. आरामात सुख मिळावे असे त्यास वाटते व ते न मिळाले म्हणजे दुसऱ्या मनुष्यास दोष लावतात व आपला निरोद्योगी अवगुण झाकू पाहतात. काही लोक कर्ज काढतात व आपल्या अंगी असलेले उद्योग, चातुर्य, धाडस, बुद्धी, पराक्रम, उत्साह हे षट्गुण हरवून बसतात. म्हणोनिया सावित्री वदे-

शेटजीचे कर्ज जो घेई
तयाचे सुख दुरू जाई
संकटाने हैराण होई
बेजार होई कर्जदार॥
कर्जाने लागतेसे चिंता
घालवी सारी मालमत्ता
संसारात वाढवी गुंता
आली अहंता ऋणकोची॥

कर्ज काढणे हे अनर्थाचे मूळ असून ते सर्वस्वाचे दिवाळे काढते कसे ते पहा-

एका खेडेगावात दोन कुळंबी गावाशेजारी सरकारची धान्य पिकविणारी शेते करून मुला-लेकरासुद्धा सुखाने राहात असतात. एकाचे नाव होते खंडोबा व दुसऱ्याचे नाव होते पिरोबा. दोघांनाही चिलीपिली मुले होती. लग्नाला आलेल्या मुली होत्या. दोघांचाही संसार सुखाने चालला होता. दोन्ही घरे आनंदात नांदत होती. गावतही त्यांचे वजन होते.

त्या गावात एक परदेशातून गृहस्थ आला. ते वेळी त्याचे जवळ फाटका जोडा, फुटका लोटा, ठिगडी बंडी, जोडाचे धोतर इतकी काय ती त्याची दौलत होती. त्याची ही दशा पाहून खंडोबा, पिरोबा यास दया आली. त्यांनी त्यास लहानसे घर बांधून दिले. काही उसने पैसे देऊन त्याजकडून दुकान करविले. काही दिवसांनी तो गरीब दिसणारा मनुष्य आपली व्यापारी विद्या चालवून गावातील रयत लोकास वाढीदिडीने कर्ज देऊन घरातील चीजवस्तू गहाण ठेवून हजारो रुपये कमवून शेठ बनला. या शेठकडून खंडोबा व पिरोबा यांनी पाचपाचशे रुपये एकोत्र्याचे भावाने मुलीच्या लग्नाप्रीत्यर्थ कर्ज म्हणून घेतले. दोन तीन वर्षे खाते चालले. तेणे करून चक्रवाढी व्याजाने हिशोबाने शेठजीने दोघाकडे ५०० चे दीड हजार सुरती रुपये केले. कर्ज फिटावे म्हणून दोघेही दरसाल शेतात जे उत्पन्न होईल ते सर्व शेटजीस देत असत. पण ते वहीत जमा केले जात नसे. कर्ज, त्याचे व्याज व त्यावर चक्रवाढी व्याज हे चक्र थांबत नव्हते. चिडून खंडोबा व पिरोबा शेठजीशी भांडू लागले. शेठजीने अमीन कोर्टात फिर्याद केली. निकाल शेटजीतर्फे लागला. दोघांच्या जमिनीवर सरकारी टाच आणून जाहीर लिलाव करून आपला सारा पैसा वसूल करून घेतला. तेव्हा ते दोघेही कुळंबी आपले गाव सोडून बायकामुलासुद्धा निघून देशांतरास गेली. त्याची खंत शेठजीस तिळमात्र वाटली नाही. कर्जामुळे लोक तसे देशोधडीस जातात हे खंडोबा पिरोबा यांच्या गोष्टींवरून कळून येते.

# परिशिष्टे

## परिशिष्ट १

# सावित्रीबाईंच्या संग्रहातील उपलब्ध झालेले इतर साहित्य

१. **श्री ग्रहलाघव**

श्री. भास्कर नारायण गोडबोले आवृत्ती (५-१२-१८८७) ज्योतिष व खगोल शास्त्रावरील एक महत्त्वपूर्ण व दुर्मिळ ग्रंथ - मुखपृष्ठावर सावित्रीबाईंचे नाव व तारीख. पान ६७ वर चंद्रग्रहण आकृती व मोडी स्वाक्षरी, पान ७९ वर सूर्यग्रहण आकृती व इंग्रजी शब्दप्रयोग व इंग्रजी सही. या आकृत्या पुस्तकातील गणितावरून सावित्रीबाईंनी काढल्या आहेत. त्यामुळे सावित्रीबाईंचा या विषयातील अभ्यास दिसून येतो. इंग्रजी हस्ताक्षर उत्तम होते हे समजून येते.

२. **म्हणीविषयी चार शब्द**

ले. विद्याधर वामन भिडे (१८९१). या छोट्या पुस्तकात पान १० वर सावित्रीबाईंची इंग्रजी सही (१-९-१८९२). पान २१ वर स्वत: रचलेली म्हण व ''सावित्री'' अशी संक्षिप्त सही, आणि रामदासांचा दुरुस्त केलेला खालील श्लोक-

**रामदासांचा श्लोक**

जगी सर्व सूखी असा **कोण** आहे?<br>
विचारी मना तूच शोधोनि पाहे<br>
मना त्वांचि रे **पूर्व**संचीत केले<br>
तयासारिखे **भोगणे** प्राप्त झाले

सावित्रीबाईंनी दुरुस्त करून खालीलप्रमाणे लिहिला

जगी सर्व सूखी असा **एक** आहे?<br>
विचारी मना तूंच शोधोनि पाहे

मना त्वांचि रे **ज्ञान** संचीत केल्रे
तयासारिखे **सौख्य** हे प्राप्त झाले

केवळ तीन शब्द बदलून श्लोकाच्या अर्थात व्यापकता आणून शिक्षणाचे जीवनातील महत्त्व सावित्रीबाईंनी पटवून दिले आहे.

३. **शुकबाहात्तरी**
विठ्ठल सखाराम अग्निहोत्री (१८४९). मुखपृष्ठावर सावित्रीबाईंची मोडीत सही व १-३-१८५३ ही इंग्रजीत तारीख. पान १०, ३१, ९४, ९६, ९८, १०७, १३१ वर खुणा. शेवटी कापडी कव्हरवर सही.

४. **हिंदुस्थानचा इतिहास**
(१८६१) मूळ लेखक मरेसाहेब. अनुवाद - विष्णु परशुराम शास्त्री. मुखपृष्ठावर सावित्रीबाईंची इंग्रजीत सही. पान २३८, २३९, २४० वर खुणा व ३१० वर मोडीत सही.

५. **अभंग शतके - नीतिशतक**
(१८८२). बा. मा. समर्थ. पहिल्या पानावर सावित्रीबाईंची मोडीत सही व वाचताना केलेल्या काही खुणा (पा. ८) १-८-८८ अशी इंग्रजीत तारीख.

६. **अथ सांग रुद्र पारं**
(१८८०) नारो अप्पाजी गोडबोले - संस्कृत पोथी पहिल्या पानावर सावित्रीबाईंची सही.

७. **भूगोलपत्रक**
(मुंबई इलाख्याचे) (१८८९) पहिल्या पानावर सावित्रीबाईंचे नाव व तारीख व वाचताना केलेल्या खुणा.

८. **शालापत्रक**
(ऑगस्ट १८६४) अंक ४, मुखपृष्ठावर सावित्रीबाईंचे नाव व आतील पानावर वाचताना केलेल्या काही खुणा.

९. **सिहासन बत्तिशी**
(१८९२) पहिल्या पानावर सावित्रीबाईंची सही.

१०. **गद्यरत्नमाला**
(१८८८) ले. गोविंद शंकर शास्त्री बापट. या पुस्तकात पान नं. २३, २५, २८, ४७, ५७, ६०, १२३, १२५,१२६, १३२, १३४, व १४१ वर वाचताना खुणा.

११. **इसापनीति (१८४८)**
पान ६५, ७१, ८४, ८८, ९०, ११५, १५७, २१३ व २५४ वर वाचताना केलेल्या खुणा. पान १५७ वर कानडी शब्द व पान २५४ वर उर्दू शब्द लिहिले आहेत. हे सावित्रीबाईंनी लिहिले असावेत असे मला वाटते. अधिक शोध चालू आहे.

१२. **सॉक्रेतिसाचे चरित्र (१८७३)**
कृष्णशास्त्री चिपळूणकर पान १ (इंग्रजीसाठी). २, ३, ४, ५, ६, ७, १२, १४, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २६, ४२, ४३ आणि ५३ यावर वाचताना केलेल्या खुणा.

सावित्रीबाई फुले यांच्या संग्रहातील वर नमूद केलेल्या पुस्तकांपैकी काही पुस्तके नायगाव या माहेरगावी आणि काही पुस्तके दत्तोबा यादव (सातारा) यांचेकडे मिळाली आहेत. श्री. रामजी विन मंजाजी माळी उर्फ ''रामजी बुवा'' हे श्री. दत्तोबा यादव यांचे चुलत आजोबा, विठ्ठल मंदिर, भायखळा, मुंबई येथे त्यांचे वास्तव्य असे. त्यांच्या मृत्यूनंतर श्री. दत्तोबा यादव यांनी त्यांचेकडील कागदपत्र व इतर साहित्य करंजे (सातारा) येथे आणले आणि श्री. यादव यांचेकडून श्री. दादासाहेब झोडगे व त्यांचेकडून डॉ. माळी यांना मिळाले.

## परिशिष्ट २

## मान्यवरांच्या शब्दांत सावित्रीबाईंची थोरवी

१. राजकीय महर्षि - मामा परमानंद
२. गोविंद गणपत काळे
३. धनंजय कीर
४. डॉ. बाबा आढाव
५. डॉ. मा. प. मंगुडकर

### १. राजकीय महर्षि - मामा परमानंद

"परंतु आपले सारे जीवन जनतेच्या नि:स्वार्थ सेवेसाठी वेचणाऱ्या जोतिबांच्या व त्यांच्या पत्नीच्या निष्काम सेवेची जाणीव ठेवून त्यांना जीवन वेतन मिळत जाईल अशी कृपा करून महाराजांनी व्यवस्था करावी. जोतिबांपेक्षाही त्यांच्या पत्नीचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल. तिची योग्यता काय सांगावी? आपल्या पतीबरोबर तिने संपूर्ण सहकार्य केले व त्यांच्याबरोबर राहून वाट्याला येतील त्या हालअपेष्टा भोगिल्या. उच्च वर्णातील उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रियांतही अशा प्रकारची त्यागी स्त्री आढळून येणे कठीण आहे. त्या उभयतानी लोककार्यात आपले सारे जीवन खर्च केले, अशांना खरे सांगावयाचे म्हणजे आपल्यावर राज्य करणाऱ्या सरकारकडून जरूर ती मदत मिळणे आवश्यक आहे. परंतु आपण ब्रिटिश सरकारच्या म्हणजे परकीयांच्या राज्यसत्तेखाली वावरत आहोत. अशा गोष्टीकडे त्यांचे लक्ष जावे अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे."

मामा परमानंद आणि त्यांचा कालखंड
लेखक - बु. बा. कुलकर्णी
पृ. २६८

२. **गणपत गोविंद काळे (एक समकालीन)**

"आता सावित्रीबाईसंबंधाने लिहावयाचे म्हणजे त्या माऊलीचे एखाद्या लेखकाने स्वतंत्रच चरित्र लिहिले पाहिजे. ज्योतिराव जे एवढ्या मोठ्या योग्यतेस चढले त्याचे बरेच मोठे श्रेय त्यांच्या सुपत्नीस दिले पाहिजे."

"स्त्रियांविषयी एक स्वतंत्र मासिक काढण्याबद्दल सावित्रीबाईंनी सुचविल्यावरून वाळवेकरांनी "गृहिणी" या नावाचे एक मासिक काढले होते."

आम्ही पाहिलेले फुले-
पुरोगामी सत्यशोधक, अंक जुलै ते डिसेंबर, १९८१
पृ. २० व २१.

३. **धनंजय कीर**

"सावित्रीबाईंचे अलौकिक कार्य - एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या उद्धारासाठी व्यतीत केलेले सावित्रीबाईसारखे अन्य आदर्श नि उदात्त उदाहरण क्वचितच आढळून येईल. पंडिता रमाबाईंचे पांडित्य नि भरारी त्यांच्या ठायी नसेल परंतु मंगल धडाडी, निर्व्याज मानवता आणि भारतीय धवलता त्या गुणांत रमाबाई त्यांची बरोबरी करू शकल्या नाहीत."

राष्ट्रवीर - संपादक - दाजीबा देसाई,
सुवर्ण महोत्सव विशेषांक १९२१-१९७१.
बेळगाव

४. **डॉ. बाबा आढाव -**

"सावित्रीबाईचे संपूर्ण जीवन क्रांतिकारक आहे."

- जीवन शिक्षण - शिक्षणशास्त्र संस्था, पुणे
जानेवारी - फेब्रुवारी १९८१, पृ. ३१.

५. **डॉ. मा. प. मंगुडकर-**
''सावित्रीबाई फुले : एक युगस्त्री''
''सार्वजनिक कार्यासाठी बाहेर पडलेली भारतीय पहिली स्त्री''
''स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेली १९ व्या शतकातील एकमेव स्त्री''
''स्त्री-मुक्ती चळवळीच्या आद्य प्रणेत्या''

जीवन शिक्षण-शिक्षणशास्त्र संस्था,
पुणे-जानेवारी-फेब्रुवारी १९८१,
पृ. ३२ ते ३४.

६. ''ती आदर्श भारतीय स्त्री होती. तिने आपल्या पतीबरोबर छळ आणि वनवास भोगण्याची आपल्या मनाची तयारी केली होती. ज्या समाजाची गुलामगिरीतून मुक्तता करून त्याचा उद्धार करण्याचे व्रत त्या दोघांनी घेतले होते. त्या समाजाच्या हातून अनन्वित छळ सोसण्याची त्यांनी आपली सिद्धता केली.''

-म. जोतीराव फुले-पृ. ३२

७. ''तिचे (सावित्रीबाईचे) कार्य म्हणजे हिंदुस्थानातील स्त्रियांच्या सार्वजनिक जीवनातील एक युगप्रवर्तक अशीच घटना होती.''

-म. जोतीराव फुले-पृ. १०१.

८. ''आपली पत्नी आपले कार्य चालू ठेवील नि मुलगा त्या कार्यासाठी जीवित व्यतीत करील असा त्यांना विश्वास वाटत होता. त्या साध्वीने सुमारे पन्नास वर्षे पतीसंगे कडूगोड झेलले होते. जिवापाड कष्ट केले होते.''

-म. जोतीराव फुले-पृ. ३००

९. **पंढरीनाथ सीताराम पाटील-**
(म. फुले आद्य चरित्र लेखक व थोर व्यासंगी)
''सावित्रीबाईंच्या भारतीय स्त्रीच्या उत्थानासाठी केलेल्या सहृदय कार्याशी तुलना करता येणारे एकही उदाहरण १९व्या शतकात सापडत नाही.''

१०. **प्रा. गं. बा. सरदार-**

"सावित्रीबाई या महात्मा फुल्यांच्या फक्त पत्नी आहेत असे नाही. महाराष्ट्रातल्या स्त्री-मुक्ती चळवळीतल्या त्या आद्य प्रणेत्या आहेत."

-डॉ. माळीकृत क्रांतिज्योती
"सावित्रीबाई फुले" पुस्तकाच्या प्रकाशन
समारंभाचे भाषण-
पुणे, दि. २४-१०-१९८०.

परिशिष्ट ३


## सावित्रीबाई फुले जीवन कालपट आणि कार्य-

| | |
|---|---|
| ३ जानेवारी १८३१ — | सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव या गावी जन्म. |
| १८४० — | जोतीराव फुले यांच्याबरोबर विवाह. |
| १८४१ — | शिक्षणास प्रारंभ. |
| १८४७ — | नॉर्मल स्कूलमधून शिक्षक प्रशिक्षण. |
| १ जानेवारी १८४८ — | पुणे येथे भिडे वाड्यात मुलींच्या पहिल्या शाळेची स्थापना, सावित्रीबाई शिक्षिका झाल्या. |
| १ मे १८४९ — | पुणे येथील उस्मानशेख यांच्या वाड्यात प्रौढांच्या शाळेची स्थापना आणि सावित्रीबाईंचे अध्यापनकार्य. |
| १८४९-५० — | पुणे-सातारा-नगर या जिल्ह्यांत शाळांची स्थापना आणि त्यातील काही शाळांत शिक्षिका म्हणून कार्य. |
| १८४९ — | शूद्र अतिशूद्रांच्या शिक्षणासाठी पती जोतीरावांबरोबर गृहत्याग. |
| १८५२ — | शाळांची तपासणी व आदर्श शिक्षिका म्हणून अभिप्राय. |
| १२ फेब्रुवारी १८५३ — | मेजर कँडी यांच्या हस्ते फुले दांपत्याचा विश्रामबागवाड्यात गौरव आणि सर्व शाळांचा एकत्र पार पडलेला बक्षीस समारंभ. |
| १८५३ — | बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना आणि सावित्रीबाईंचे यासाठी कार्य. |
| १८५४ — | काव्यफुले हा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध. |
| १८५५ — | शेतकरी व मजूर स्त्रीपुरुषांसाठी रात्रशाळा व अध्यापन कार्य. |


| | |
|---|---|
| २५ डिसेंबर, १८५६— | जोतिबांची भाषणे हे पुस्तक प्रसिद्ध केले. |
| १८६४ — | अनाथ बालकाश्रम चालविला. |
| १८६८ — | घरचा हौद अस्पृश्यांसाठी खुला. |
| १८७५ ते १८७७ — | पुणे परिसरात बावन्न अन्नछत्रे उघडून सत्यशोधन समाजातर्फे चाललेल्या दुष्काळ निवारण कार्याचे नेतृत्व. |
| ४ फेब्रुवारी १८८९ — | दत्तकपुत्र यशवंतरावांचा ससाण्यांच्या मुलीशी मिश्रविवाह. |
| १० मार्च १८९७ — | प्लेगने क्रांतिज्योतीचे महानिर्वाण. |


परिशिष्ट ४

## काव्यफुले या संग्रहातील सावित्रीबाईंनी मोडी लिपीत लिहिलेल्या काही कविता




८





परिशिष्ट ५


श्रीगणेशायनमः पुष्पदंतउवाच म
हिम्नः पारंतेपरमविदुषोयद्यसदृशीस्तु
तिर्ब्रह्मादीनामपितदवसन्नास्त्वयि
गिरः अथावाच्यः सर्वःस्वमतिपरि
णामावधिगृणन्ममाप्येषस्तोत्रेहरनि

## परिशिष्ट ६

शुकबाहात्तरी (१८४९) ले. विठ्ठल सखाराम अग्निहोत्री – मुखपृष्ठावर सावित्रीबाईंची स्वाक्षरी

# शुकबाहात्तरी.

आश्रयदेणारेमंडळीसाठीं

विठ्ठलसखाराम अग्निहोत्रीयांणीं

आपल्येछापखान्यांत छापिलीअसे.

शके १७७०

कीलकनामसंवत्सरे


मुकाममुंबई

सन् १८४९


इसवी.

परिशिष्ट ७

अथसांग-प्रारंभ ( १८८० ) लेखक नारो मापाजी गोडबोले-संस्कृत पोथी मुखपृष्ठावर सावित्रीबाईंची स्वाक्षरी



परिशिष्ट ८



# नीतिशतक

॥१॥ धवळलें जगदाकार ॥ अंधार तो निरसला ॥१॥
लपोंजातां नाहीं ठाव ॥ प्रगट पाहे पसारा ॥२॥
खरियास दिवस आला ॥ वादी वोला न पुरे ॥३॥
तुका म्हणे जीवें साटीं ॥ पडिली मिठी धुरेसी ॥४॥


॥२॥ दीप न देखे अंधारा ॥ आतां हेंचि करा जतन ॥१॥
नारायण नारायण ॥ गांठीं धन बळकट ॥२॥
चिंतामणी पाशीं चिंता ॥ नखवा ही नयेल ॥३॥
तुका म्हणे उभय लोकीं ॥ हेंचि निकी सामग्री ॥४॥

॥३॥ सत्य सत्यें देतें फळ ॥ नाहीं लागतचि वेळ ॥१॥
ध्यावें देवाचे ते पाय ॥ थीर सकळ उपाय ॥२॥
करावीच चिंता ॥ नाहीं लागत नखता ॥३॥
तुका म्हणे भावें ॥ शरण म्हणवितां बरवें ॥४॥

॥४॥ उंसवाद बिनां वाढली गोडी ॥ गुळसाकर हे त्याची परख

नीतिशतक (१८८२) वा. मा. समर्थ. प्रथम पृष्ठावर सावित्रीबाईंची मोडीत स्वाक्षरी,

## परिशिष्ट ८


(१८)

॥२६॥ लहानपण देगा देवा ॥ मुंगी साखरेचा रवा ॥१॥
ऐरावत रत्न थोर ॥ तया अंकुशाचा मार ॥२॥
ज्याचे अंगीं मोठेपण ॥ तया यातना कठीण ॥३॥
तुका म्हणे जाण ॥ व्हावें लहानाहुनि लहान ॥४॥

1-8-88

॥२७॥ नीचपण बरवें देवा ॥ न चले कोणाचाही दावा ॥१॥
महापुरें झाडें जातीं ॥ तेथें लव्हाळें राहती ॥२॥
येतां सिंधूच्या लहरी ॥ नम्र होतां जाती वरी ॥३॥
तुका म्हणे कळ ॥ पाय धरिल्या न चले बळ ॥४॥

॥२८॥ मुंगी होउनि साकर खावी ॥ निजवस्तूची भेट घ्यावी ॥
वाळवंटी साकर पडे ॥ गज येउनि काय रडे ॥२॥
जाला हरिदास गोसावी ॥ अनर्था मायिक क्रिया दावी ॥
पाठ पाठांतरिक विद्या ॥ जनरंजवणी संध्या ॥४॥
प्रेम नसतां अंगा आणी ॥ दृढभाव नाही मनी ॥५॥
ब्रम्हज्ञान वाचे बोले ॥ करणी पाहातां न निवडी डोळे ॥६॥
मिथ्या भगल वाढविली ॥ आपुली आपण पूजा घेतली ॥७॥
तुका म्हणें धाकुटें व्हावें ॥ निजवस्तूसी मागुनी घ्यावें ॥८॥

नीतिशतकं (१८८२) प्रस्तावना पृष्ठ ८ वर सावित्रीबाईंची संक्षिप्त स्वाक्षरी व १-८-८८ अशी इंग्रजीत तारीख.

## परिशिष्ट ९

**श्री ग्रहलाघव – ले. श्री. भास्कर नारायण गोडबोले आवृत्ती ३ री (५-१२-१८८७) ज्योतिष व खगोलशास्त्रावरील ग्रंथ, मुखपृष्ठावर सावित्रीबाईंचे नाव व तारीख.**

१-१-१४

श्री

# ग्रहलाघव

गणेशदैवज्ञकृत संस्कृत करणग्रंथ उदाहरणासहित.

यांचें मराठी भाषांतर

कृष्णशास्त्री गोडबोले व वामन कृ॰

यांनीं केलें

नारो आप.

यांचे रत्नप्रसा.

भास्कर नाराय.

यानी छापून प्रसिद्ध

आवृत्ति ३री

पुणें पेठ सदाशिव

ता. ५ दिजंबर १८८७.

किंमत १

सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें हक्क ठे॰

## परिशिष्ट ९

### श्री ग्रहलाघव – पृष्ठ ६७ व ७९ वर चंद्रग्रहण व सूर्यग्रहण या सावित्रीबाईंनी काढलेल्या आकृत्या.

### चंद्रग्रहणाधिकार.

(६७)

नि अंगुलें=) २२ अंगुलें २८ प्रति अंगुलें ×१०(=२२४ अंगुलें ..४० )× ग्रास १६ अंगुलें ४८ प्रति अंगुलें=३७७५ अंगुलें २४ प्रति अंगुलें; त्याचें वर्ग मूळ ६१ अंगुलें २५ प्रति अंगुलें×५(=३०७ अंगुलें ० प्रति अंगुलें)÷६ =५१ अंगुलें १० प्रति अंगुलें; यास चंद्रबिंबानें (११ अंगुलें ७ प्रति अंगुलें) भागून ४ घटी ३६ पळें ही मध्य स्थिति झाली.

### खग्रास मर्दस्थिति.

मर्दनथा नतुदलांतरखग्रहाभ्याम् ॥ ५॥

अर्थ:– मानैक्य खंडाबद्दल छाद्य आणि छादक यांच्या बिंबांच्या वजाबाकीनें अर्ध आणि ग्रासाबद्दल खग्रास घेऊन पूर्वीं प्रमाणें मध्यस्थिति आणांवी म्हणजे ती मर्दस्थिति होते.

### उदाहरण

भूमा बिंब. २८ अंगुलें १० प्रति अंगुलें.

चंद्र बिंब ११ अं. ७ प्र. अं.

२) १७ अं. ३ प्र. अं.

८ अं. ३२ प्र. अं.

शर २ अं. ५० प्र. अं.

११ अं. २२ प्र. अं.

१०

११३ अं. ४० प्र. अं.

खग्रास० ५ अ. ५१ प्र. अ.


६५६ अंगुलें त्यानें वर्गमूळ २५ अं. २४ प्र. अं.

५

६) १२७ अं.


चंद्रबिंब ११ अं. ७ प्र. अं. ) २१ अं. १० प्र. अं.

१ घटी ५४ पळें = मर्दस्थिति.



परिशिष्ट ९

## सूर्यग्रहणाधिकार. (७१)



मानैक्यखंड १० अंगुलें २८ प्रति अंगुलें.
शर २ अंगुलें २३ प्रति अंगुलें.
१२ अंगुलें ५१ प्रति अंगुलें.
१०
१२८ अंगुलें २० प्रति अंगुलें.
ग्रास ८ अंगुलें ५ प्रति अंगुलें.
१०२८ अंगु. ४२ प्र. अं. याचें वर्गमूल ३२ अं. १४ प्र. अं.
५
६) १६१ अं. १० प्रति अंगुलें.
चंद्रबिंब ९ अं. ४९ प्र. अं.) २६ अं. ५२ प्र. अं.
२ घ. ४४ प. मध्यस्थिति.

## स्पर्शलंबन, मोक्षलंबन स्पर्श-
## काल आणि मोक्षकाल.

स्थितिरसहनिरंशाविंत्रिभंनैः पृथक्स्थंरहिनसहि
तमाभ्यांलंबनेयेतुताभ्यां ॥ स्थितिविरहितयुक्तः-
संस्कृतोमध्यदर्शः क्रमशाइतिभवेतांस्पर्शमुक्त्यो
स्तकालौ ॥५॥

**अर्थ**:- मध्यस्थितीस ६नीं गुणून जो अंशादि गुणाकार येईल तो त्रिभोन लग्नातून वजा करावा म्हणजे स्पर्श त्रिभोन लग्न होतें. मग त्या पासून नतांश आणावे; नंतर त्या नतांशां पासून पूर्वी प्रमाणें हार आणावा, आणि दर्शांत कालीन सूर्यास मध्यस्थिति घटिकांचें चालन ऋण द्यावें म्हणजे तो स्पर्शकालीन सूर्य होतो. मग स्पर्शकालीन सूर्य, स्पर्शत्रिभोन लग्न, आणि हार यांपासून पूर्वी प्रमाणें लंबन आणावें म्हणजे तें स्पर्शकालीन लंबन होतें. असेंच- मध्यस्थितीस ६नीं गुणून आलेला अंशादि गुणाकार त्रिभोन लग्नांत मिळवावा म्हणजे तें मोक्ष त्रिभोन लग्न होतें. आणि त्या पासून पूर्वी प्रमाणें हार आणावा. आणि दर्शांत कालीन सूर्यास मध्यस्थितीच्या घटिकांचें चालन मिळवावें म्हणजे तो मोक्ष कालीन होतो. मग मोक्षकालीन सूर्य, मोक्ष त्रिभोन लग्न आणि हार त्यां पासून पुनः

## परिशिष्ट १०

म्हणीविषयी चार शब्द ले. विद्याधर वामन भिडे. या पुस्तकाचे मुखपृष्ठ. पृष्ठ १० वर सावित्रीबाईंची इंग्रजीत स्वाक्षरी व १-९-१८९२ ही तारीख.

[१० ]

"म्हण"* होय. म्हणजे ज्या वचनाचा लोक नेहमी उपयोग करितात ते वचन; आणि डॉक्टर जॉनसननें जी म्हणीची व्याख्या दिली आहे तीही ह्याच अर्थाची आहे. "Short sentences frequently repeated by the people" म्हणजे लोकांनीं वारंवार म्हटलेलीं लहान वाक्यें. आतां लोकांनीं कोणत्याही वचनाचा वारंवार उपयोग करणें हेंच त्या वचनांतील ज्ञानाच्या खरेपणाचें निदर्शन होय. म्हणींतील अर्थ लोकांस कबूल आहे म्हणूनच हरएक प्रसंगी बोलण्याचालण्यात व व्यवहारांत तिचा उपयोग करतात; संसारांतील हरएक बाबतींत म्हणीचा खरेपणा कसास लागून तो निर्विवाद होऊन ठरून जातो, आणि ज्या अर्थी हा खरेपणा आधींच ठरून गेलेला असतो, त्या अर्थी लोकांचें मन वळविण्याचे किंवा लोकांची खात्री करण्याचे कामीं म्हणीचा वा-

---

* म्हणीच्या स्पानिश भाषेंत Refranes हा शब्द आहे. ह्याची उपपत्ति पुढील उताऱ्यावरून कळून येईल:- "Refranes or proverbs, a term derived a Refrenando because it is often repeated."

I. D. Israeli.

Savitri Jotiba fule 1-9-1892.

## परिशिष्ट १०

म्हणीविषयी चार शब्द या पुस्तकाच्या पृष्ठ ३८ वर रामदासांच्या श्लोकात बदल करून आणलेला व्यापक अर्थ.

[ ३८ ]

पाषाण " हे दोन चरण तुकारामाच्या अभंगांतील होत. ते इसाप नीतींतील चक्रगतीबद्दल लहान खेकड्यास रागें भरणाऱ्या वृद्ध खेकड्याप्रमाणें जे दुसऱ्यास उपदेश करीत असतात त्यांस लावतात.

" जगीं सर्व सुखी असा कोण आहे " ही अमृतोपम वाणी रामदासाची आहे. ती ज्या श्लोकांतून घेतली आहे ती येणें प्रमाणें:–


एक जगीं सर्व सूखी असा कोण आहे ?
विचारी मना! तूंच शोधोनि पाहे ।
दोन मना त्वांचि रे पूर्व संचीत केलें
कार्ये तया सारिखें भोगणें प्राप्त झालें ॥

वरील श्लोकाच्या पहिल्या चरणानें कोणा विषण्णाचें सांत्वन होत नाहीं? दारिद्र्यादि अनेक व्याधींनीं ज्यास वैताग आला आहे, असा कोणता मनुष्य हा चरण ऐकून सुखी होणार नाहीं? एकंदरींत मराठी भाषेंत ज्या कांहीं तरबाच्या मोलाच्या म्हणी आहेत त्यांच्या पैकींच ही म्हण होय.

" शितें अंथरतीं भुतें मोवतीं " हा तुकडा रामजोशाच्या प्रसिद्ध लावणींतला सर्वांस माहीत आहे.

## परिशिष्ट ११

### सुबोध रत्नाकर (१८९१) या सावित्रीबाईंच्या काव्यसंग्रहाचे मराठी लिपीतील हस्तलिखित



## परिशिष्ट ११

### सुबोध रत्नाकर १८९१-या सावित्रीबाईंच्या काव्यसंग्रहाची पाने

सावित्री जोतिबा विरचित अथ-

बावन्नकशी सुबोध रत्नाकर ॥ प्रारंभ ॥

॥ उपोद्घात ॥

॥ जयाचे पुढे मी कविता रचीते ॥ जयाचे कृपे ब्रह्म आनंद चित्ते ॥
॥ जयाने दिली बुध्दीही सावित्रीला ॥ प्रणामा करी मी यती जोतिबाला ॥१॥
॥ रची काव्य सोपे भुजंगप्रयाते ॥ मनी वृत्त आखून गाणे लिहीले ॥ भ्रतारास
॥ अर्पी बहु आदराने ॥ नसे ते इहीहो परी चिंतनाने ॥२॥ करी शुद्रसेवा
॥ दिले धैर्य त्यांना ॥ क्रियाशील नेता जशा जोतिबाला ॥ नसे जात ज्या
॥ ला तसे पंथ काही ॥ तया वंदुनी सावित्री काव्य वाही ॥३॥ वदे स
॥ र्व शुद्रास सावित्री भावे ॥ सदोदीत हे काव्य आन्हीक व्हावे ॥
॥ कुळाची कथा गीत ग्रंथी लिही मी ॥ गुलामी जनाचा इतिहास नामी ॥४॥

॥ सिध्दता ॥

॥ इतिहास शोधी मनी इंडियाचा ॥ अव्हेर्मी दुराणी जयी जंगलीचा ॥ अर्धी
॥ अर्धी राष्ट्री लोक केले ॥ जिलाच्या स्वधर्मी घुसुनी रहाते ॥५॥

## परिशिष्ट ११

२

बासार

।।टीळा लावला आर्य जेते म्हणूनी ।। म्हणे उच्च आम्ही कडू शुद्र योनी ।। गुलामी
।।रुढी लादुनी धर्म सांगे ।। पशुतुल्य जीणे स्त्रिया शुद्र भोगे ।। ६ ।। म-
।। नुष्यत्व सारे हिरावून भक्षी ।। तयाला असे वेदही सर्व साक्षी ।। अहं-
।।कारी भूदेव मग्रूर झाले ।। तयी वेळेला बुद्ध जन्मास आले ।। ७ ।। अती भां-
।।डणे ब्रह्म बुद्धात झाली ।। जयाची ध्वजा ब्रह्मलोका मिळाली ।। समाजात
।।कल्पीत चौर्‍या बांधी ।। अमर्याद जाती असे पंथ साधी ।। ८ ।। स्वधर्मी अ-
।।ती भिन्नता वर्ण जाती ।। तिथे स्थीरता ना नसे ऐक्यनीती ।। फिरे-
।।विषयणी शंकराचार्य मेळा ।। पुकारे रुढी मूर्ख आचार पाळा ।। ९ ।। स्वतः
।।भोगली सौख्य नाना अपार ।। करी पुण्य बुद्धी नया जाभगार ।। मनी पाप
।। सारे मनी भोग इच्छा ।। तरी सर्व इच्छा धरी मोक्ष वांच्छा ।।१०।। अनार्गा-
।।जनी तर्कटी ज्ञान सारे ।। मना भासनी जीर्ण पोथी पिढारे ।। असे सोंग हे
।। ढोंग नीविप्र मंत्री ।। पुजा नाम संध्या जपे माळ तंत्री ।। अनेका ११ ।। अवि-
।। चार अज्ञान मूर्खत्व जेथे ।। कसे काय राहील धर्मत्व तेथे ।। गुलामी कवाडी
।।स्वधर्मास कोंडी ।। करी व्यर्थ धर्मांध आक्रोश तोंडी ।।१२।। मनू वर्ण कल्पी
।। विषारी विकारी ।। अनाचार रुढी सदा बोचणारी ।। स्त्रिया शुद्र सारे
।। गुलामी गुहेत ।। पशू सारखे राहती ते कुपात ।। १३ ।। पुढे पुरस्क-

## परिशिष्ट ११

२

वास्कर

।।मानी खुरत्ती राज झाले।।त्यानी किलींना धर्मी बाटविले।। तिथे भाटगी-
।।री हिंदु या मिषाने ।। करीती स्वये चाकरी जीनतेने ।।१४।। अधर्मी पराज्वी ति-
।।थे राजमंत्री।। अती शुद्र झाले स्वधर्मी कृपाची ।। स्वधर्मी अती यातना शु-
।।द्र भोगी महाखोंच पशुतुल्य जीणे अभागी ।। १५ ।। म्हणोनी शिवाजी स्व-
।।राज्या उभारी ।। समाजी अतीशुद्र लोकास तारी।। मनुष्यात आणी सुखी
।।ठेवी त्यांना।। परी शिवसत्ता पुढे लोपलीना ।।१६।। . ।। ६. ।। . ।। ६.।।
।।पेशवाई।।
।। पुढे पेशवाई तिची राज्य आले।।अनाचार देखो अती शुद्र न्याले ।।स्वथुंकी
।।थुंकाया गळी गाडगे ते ।। खुणा नाशया ढुंगणी झाप होते ।।१७।। स्वराज्नी स्व-
।।धर्मी परी व्याघ्र दाटे।। असंतोष त्यांच्या कुणाही न काढे।। प्रजेला पशु सारखे
।।नागवीती ।। तरी शुद्र सारे स्वधर्मी रहाती ।।१८।।तुळा बोलवी रामबाजी धनी
।। ग ।। स्वपत्नीस धाडी निलाजी पती ग ।। छळे ब्राह्मणाला अशी कौणशाई।।
।।मुखा बोलली ही जगी पेशवाई ।। १९ ।।पहा शंकराचे तुरी पूज्य क्षेत्र ।। अ-
।।शी माजली पेशवाई विचित्र।। पुढे जाहली पूर्णसत्ता विनाश ।। नसे दुःख
।।कोणा नसे खूप आश ।।२०।। छळी रंकांस शुद्रा बहू पेशवाई।। अशा कारणे
।। इंग्रजी राज्य होई ।।ध्वजा इंग्रजी लागे तो वाळवात् ।।तया निखिती रैखाती जंतू ।।२१।।

## परिशिष्ट ११

५

बास्क२

।। मिळे इंग्रजी फुस शूद्रादिकाना ।। लढाई कराया जसे जाति नाना ।। पराभूत हो पेश-
।।वाई करुनी ।। तिथे आणती शूद्र आंग्ली धर्‍हाणी ।।२२।। ·।।६।।·।।६।।· ।।
।। आंग्लाई ।।
।।करी इंग्रजी नोकरी ते अशूद्र ।। परी शूद्र त्यांच्या रहाती अगत्र ।।तपी आ-
।।ग्ल सत्ता उदे हिंद देशी ।।प्रजेला सुखाची मयदा प्रदेशी ।।२३।। इति-
।।हास सत्ये चढे ते टिपीतो ।। तसा जोतिबाचा इतिहास झाला ।।जशी
।। असली इंग्रजी रम्य साची ।। तशी स्फूर्तिदायी कथा जोतिबाची ।।२४।। —
।।मनुष्ये शिकया असे पात्र प्राणी ।।वदे आंग्लमाही अशीआत वाणी।। म्हणोनी
।।शिकाया मिळे आपणाला ।। स्त्रिया शूद्र सारे शिके वाचयाला ।।२५।।
।। पहा गर्जतो इंग्रजीचा नगारा ।। तसा वाटतो सत्त्वचा हा दरारा ।। अज्ञा-
।।ण्यास देती शिकायासुसंधी ।। दरोडे खुनी, चौर्य गुन्ह्यास बंदी ।। अस्पृश्य शू-
।।२६।। प्रभू येशु ख्रीस्तीमतांची प्रथाला ।। उगा लावुनी शिकवी शूद्र
।। बाळा ।। म्हणे मेंढरे ही कशी ख्रिस्त हाके ।। फुका वाजती हो उगा बोंब
।। ठोके ।।२७।। असे शूद्र 'युगानुयुगे' अभागी ।। नसे सूख काही सदा दुःख
।।भोगी ।। पशु सारखे मौन होऊन राही ।। अशा या दशेची कुणा लाज नाही
।।२८।। जया जन्म मृत्यू कळेना जराही ।। म्हणोनी पशुसारखे कष्ट नाही ।।
।। नसे बुद्धि ज्याला नसे ज्ञान काही ।। अशा मानवाला कधी सूख नाहीं ।।२९ ।।


## परिशिष्ट ११

भास्कर

।। म्हणे बांध शेती पहा या विहीरी ।। पहा पीक माझे कशी छान ज्वारी ।। मला गौर
।। कांता तशी गोड पुत्री ।। असा दंभ ज्याला नसे तो सुपात्री ।। ३० ।। करी जो
।। बहू पापभारी दुष्ट कृत्ये ।। पराच्या सुखाच्या करी द्वेष नित्ये ।। मनी लोभ ठेवी
।। परस्त्री धनाचा ।। सदाचार नाही पशू हाच सांचा ।। ३१ ।। अशा मान-
।। वाला नसे धर्मनीती ।। पशू सारखी त्याजला हीन वृत्ती ।। तयाचा पाप-
।। हा जन्म वायाच गेला ।। तसा शूद्र हा अन्य माणूस झाला ।। ३२ ।। ० ।।
।। पहा इंग्रजीच्या सत्तावीस साली ।। जनी बोल सत्याविषी उक्त झाली ।। असा
।। आपदा काल सुधारणेचा ।। पुणे ग्रामही जन्मे जोतिबाचा ।। ३३ ।। ० ।। ८ ।। ० ।।
।। जोतिबा ।।
।। चिमा थोर माता पिता गोविंदजी ।। तयाचे कुशी जन्मला जोतिबाजी ।। सती
।। धन्य माता सती धन्य पीता ।। तया वंदिते आदरे जोति कांता ।। ३४ ।। नऊ
।। मास झाले चिमा माय मेली ।। चिमू जोतिची फार आबाळ झाली ।। परी त्यान
।। जसा मानवी क्लेश घ्याया ।। मिळाली सगुणा महादेव-माया ।। ३५ ।। मिळे ज्ञान
।। न पाद्री विश्वमी विजापी ।। तिथे भेटला धैवला बाल जोती ।। सगुणा
।। दयासागरी ज्ञान वाटे ।। तसे काढतो घोकतो अंकपाटे ।। ३६ ।। पुढे गा-
।। वठी आले मराठी आई ।। गुरुश्री कडुनी धडे पाठ घेई ।। परी शेतकाळजी
।। दुष्ट खोळ मारी ।। तया सोडुनी मुनशी लोजीस वारी ।। ३७ ।। ० ।।

परिशिष्ट ११

६८



बासर

॥ करी जोति भेटी घडे ज्ञान त्यांचे ॥ येई इंग्रजीचे घडे ज्ञान मजे ॥ मला आ
॥ फुला पाठ देई शिकाया ॥ असामान्य लेन्चा भन्य पध्दा ॥३८॥ स्वरे
॥ ज्ञान संपूर्ण घेऊन जोती ॥ मनी स्फूर्ति सूर्चोर सेना सानेती ॥ मुलींना न-
॥ शी शूद्र मुलांस शाळा ॥ मुलांस ऐसा गुंफीतो सुमाळा ॥३९॥ करी-
॥ फार कौतुक पाद्री विधर्मी ॥ परी त्रास देती ब्राह्मण स्वधर्मी ॥ मला निंदली
॥ शेण धोंडेही मारी ॥ अशा संकटात स्फूर्तीने निभावी ॥४०॥ स्वामीच्या विहीरी ॥
॥ महाराष्ट्र सारे ॥ मनुष्यत्व दावी तयाच्या सुनाटे ॥ दलितांस आदेश स-
॥ क्रोध साचे ॥ न भूलो जनक्वार जोती युगाचे ॥४१॥ पथ्या चुकल्या कामिनी
॥ पोटुशींना ॥ प्रसूतीगृही सोय मोलाची नाना ॥ मुक्ती, दवा, पाणी खाणे पिणेही ॥
॥ व्यवस्था अशी सर्व सांभाळि पाही ॥४२॥ मिस्र आश्रमी पाळणे हालवीती ॥
॥ अशा दिव्य कार्यात तल्लीन जोती ॥ एका रात्री मारेकरी दोन आले ॥ मुखी
॥ जोतिला पाहुनी लीन झाले ॥४३॥ तुकाराम जैसा तसा संत जोती ॥ सुधा
॥ ज्ञान देई जना रीते भाती ॥ पुढारी कियाशील द्रष्टा प्रसिद्दी ॥ वदे
॥ जोति स्वटी असे ती आसिद्दी ॥४४॥ समस्यास सापा सत्यधर्म
॥ दावी ॥ वदे उच्च वा नीच कोणी न भावी ॥ किती पुस्तिका पुस्तकेही
॥ लिहीली ॥ तशी काव्यसारंग गाणीहि केली ॥४५॥ म्हणे जोतिबा
॥ इंग्रजी माय पान्हा ॥ पिवूनी बनो हो अभिजात कान्हा ॥


परिशिष्ट ११

७

आरूफर


॥ प्रयत्न [illegible] संस्थाने करीरे ॥ संसारात शांती समाधान धरे ॥४६॥ अना-
॥ [illegible] संपत्ती शुद्र सारे ॥ पूर्ण झाली इच्छा काळ्याची आशे तोरे ॥ अशा क-
॥ल्पनांचा इतिहास व्हावा ॥ सत्यासत्य संशोधुनी बोध घ्यावा ॥४७॥ ० ॥
॥ उपसंहार ॥
॥ पूर्ण कथा इथवर सुरू वाची ॥ असे इंडिया शुद्र व्याख्या त्याची ॥ अहा
॥ जोत जोती जळे शुद्र काया ॥ सर्वांचा नेता बदे जोते भार्या ॥४८॥ निराधार
॥ [illegible] ॥ पुढारी ॥ दुबळ्या अडाणी जनांचा कदारी ॥ कुणी जैसा
॥ [illegible] ॥ स्त्रिशुद्रा करीता इथे दुःख भोगी ॥४९॥ तरी जन्मला
॥ शुद्र माळी म्हणोनी ॥ स्वरा म्हार तो त्यास माळी न मानी ॥ चिरंजीव
॥ जोती मनु-उद्ध झाला ॥ नमस्कार माझा असा जोतिबाला ॥५०॥
॥ मनी कल्पना छान गाणे रचावे ॥ जना त्रास होईल ऐसेच गावे ॥
॥ मनी [illegible] काव्य केले स्वभावे ॥ तुम्ही गाऊनी आपले सत्य घ्यावे
॥ ५१ ॥ जरी यातले थोडके ज्ञान झाले ॥ तरी या श्रमाचे खरे चीज
॥ झाले ॥ मला, काव्य माझे कसे, सत्य सांगा ॥ मनोहार का रम्य
॥ तुम्हीच सांगा ॥ ५२ ॥ इति बावन्न कशी सुबोध रत्नाकर ॥ ६ ॥
॥ समाप्त ॥ मिती शकुपक्ष १५ शके १८१८ रात्री २ वाजून २० मिनीटानी
॥ ही पोथी लिहून पुरी केली असे ॥ [illegible] ॥

परिशिष्ट १२



महिम्नस्तोत्र या संस्कृत पोथीचे सावित्रीबाईंनी मोडी लिपीत केलेले भाषांतर.

परिशिष्ट १२



## परिशिष्ट-१३

## श्री. एच्. टी. गज्जर, दस्तऐवज तपासणी तज्ञ, मुंबई यांचा अभिप्राय

File No. 1607/82

**Inquiry from the Principal, Dr. M. G. Mali,
Gargoti, Dist. Kolhapur.**

I have examined the Manuscripts written in Modi (Marathi), Marathi and English Scripts purported to have been written by Smt. Savitri Jyotiba Phule on documents detailed as under :-

(1) The letter written to Mahatma Jyotiba Phule dated 29th August 1868.

(2) The Poetry collection viz. 'Bavan Kashi Subodh Ratnakar' written in the year 1891.

(3) The hand written copy of the poetry collection in Modi viz. 'Kavya Phuie'.

(4) The signature in Modi at the end of 'Bavan Kashi Subodh Ratnakar .

(5) The signature on Page No. 1 of Book — 'Shukbahattari' (1849).

(6) The Signature on Page No. 1 of Niti Shatak (1882).

(7) Signature on the front page of 'Meshimstotra Pothi' (Year 1887).

(8) Signature on the cover page of the Book Sinhasan Battishi (printed in 1892).

(9) Signature in English on page 79 in the Grahlaghav (1887).

(10) Signature in English in Pencil on the page 1 of the Book viz. 'Murry's History of British India (1861).

II. I have examined the above referred writings and signatures with the aid of my various optical appliances such as ultra-lens, Magni-rays, Pocket Microscope, Stereoscopic Binocular Microscope, various types of magnifying glasses and the test plates. I have also examined them under diferent illuminating sources like ultra-violet rays transmitted light, oblique rays, and white fluorescent tube.

III. As a result of my careful examination, I have come to the conclusion that the above referred writings and signatures as mentioned in detail in Para I above are in the handwriting of one and the same person. I have not found any suspicious trait of forgery. The stationery material used i.e. ink, writing instrument, paper, etc., and water mark on paper show consistancy of the period in which they were written.

**H. T. GAJJAR**
Examiner if Questioned
Documents

BOMBAY.
4th Sept.,1982.

काव्य फुले


कवयित्री - सावित्री जोतिबा

सत्य सुंदर शिव थोर । गिरी शोभे जटाजूटधर । कटुनी
गंगाधर रुद्र हर । चतुर्दश विद्येचा ॥१॥ त्रिलोचन त्रि
शीर्ष शंकर । त्रिपुरांतक त्रिभुवन त्रिहर । एकची [illegible]
चा [illegible] । [illegible] करी कर्म [illegible] ॥२॥ नीलकंठ
मृत्युंजय शंकर । [illegible] [illegible] थोर । चतुः [illegible]
कला संसार । एक शोभे [illegible] फुलांचा ॥३॥ अज्ञानीस
ज्ञान देणे पूर्ण । [illegible] स्वरांत स्वर्ण । [illegible]
शेखर । ऐसे आदित्य त्रिनेत्रे ॥४॥ [illegible]
[illegible] । अशी [illegible] [illegible] [illegible] [illegible]
[illegible] असे । [illegible] सावित्रीची ॥५॥

शिव तुझे जपे स्तोत्र
शिव भावे गाऊ मी
विश्वंभर [illegible] महेशा
भक्तिभावे [illegible] ॥

सावित्री

सावित्रीबाई फुले यांचे मराठी हस्ताक्षर



सावित्रीबाई फुले यांनी
आपल्या महिराहून
जोतीराव फुले यांना
लिहिलेले मोडी लिपीतील
एक दुर्मिळ पत्र